अंदाज समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सव्विसावा अहवाल

सत्यमेव जयते

(गोरेगाव (मुंबई) येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासींना सोई सुविधा पुरविणेबाबतचा अहवाल)

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक डिसेंबर, २०१२ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
डिसेंबर, २०१२

अंदाज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सव्विसावा अहवाल

(गोरेगाव (मुंबई) येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासींना सोई सुविधा पुरविणेबाबतचा अहवाल)

अंदाज समिती
(२०१२-२०१३)

समिती प्रमुख

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

२) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
३) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स.
४) श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.
५) श्री.कालीदास कोळंबकर, वि.स.स.
६) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
८) श्री.रावसाहेब शेखावत, वि.स.स.
९) श्री.अमित देशमुख, वि.स.स.
१०) कु.प्रणिती शिंदे, वि.स.स.
११) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
१२) श्री.विलास लांडे, वि.स.स.
१३) श्री.राजीव देशमुख, वि.स.स.
१४) श्री.सुरेश देशमुख, वि.स.स.
१५) श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.
१६) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.
१७) श्री.विजयकुमार देशमुख, वि.स.स.
१८) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
१९) श्री.सुभाष देसाई, वि.स.स.
२०) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२१) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२२) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.
२३) श्री.विवेक पाटील, वि.स.स.
२४) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.
* २६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत**)
२७) श्री.अनिल भोसले, वि.प.स.
** २८) श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून**)
२९) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
३०) डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२. श्री.अशोक मोहिते, उप सचिव
३. श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४. श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)
५. श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी
६. श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी

---

* श्री.दिपक सांळुखे, वि.प.स. यांचा दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त.

** श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. यांची रिक्त झालेल्या जागी दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून नियुक्ती.

अंदाज समिती (२०१०-२०११)

समिती प्रमुख

१) श्री.दिलीप मोहिते, वि.स.स.

सदस्य

* २) श्री.संजय देवतळे, वि.स.स. **(दिनांक १९ नोव्हेबर, २०१० पर्यंत)**
३) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
** ४) श्री.सुभाष झनक, वि.स.स. **(दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून)**
५) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
६) श्री.माणिकराव कोकाटे, वि.स.स.
७) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.
८) श्री.राजीव सातव, वि.स.स.
९) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
१०) श्री.शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.
११) श्री.अब्दुल रशीद ताहीर मोमिन, वि.स.स.
१२) श्री.प्रदीप जाधव नाईक, वि.स.स.
१३) श्री.पंकज भुजबळ, वि.स.स.
१४) श्री.गिल्बर्ट मेंडोन्सा, वि.स.स.
१५) श्री.संदिप नाईक, वि.स.स.
१६) श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.
१७) श्री.चैनसुख संचेती, वि.स.स.
१८) पै.संभाजी पवार, वि.स.स.
१९) श्री.प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
२०) श्री.बबन घोलप, वि.स.स.
२१) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२२) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२३) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
२४) श्री.अबु आसिम आजमी, वि.स.स.
*** २५) श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. **(दिनांक ५ डिसेंबर, २०१० पर्यंत)**
२६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
२७) श्री. मोहन जोशी, वि.प.स.
२८) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
२९) श्री.जगदीश गुप्ता, वि.प.स.
३०) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२. श्री.र.आ.सावंत, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
३. श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४. श्री.भा.शं.गायकवाड, अवर सचिव (समिती)
५. श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी

---

* श्री.संजय देवतळे, वि.स.स. यांचा दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून समावेश झाल्यामुळे जागा रिक्त.

**श्री.सुभाष झनक, वि.स.स. यांची रिक्त असलेल्या जागी दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून नियुक्ती.

*** श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे जागा रिक्त.

अ नु क्र म णि का

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
१)	प्रस्तावना	
२)	अहवाल	
३)	समितीचे अभिप्राय व शिफारशी	
४)	बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त	

प्रस्तावना

मी अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन, मुंबईतील गोरेगाव मुंबई येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना सोई सुविधा पुरविणेबाबतचा अंदाज समितीचा अहवाल सादर करीत आहे.

मुंबईतील गोरेगाव मुंबई येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना सोई सुविधा पुरविणेबाबतचा कृषी व पदूम (पदूम), नगरविकास व उद्योग ऊर्जा कामगार (ऊर्जा), व महसूल विभागाकडून प्रश्नावलीच्या स्वरुपात माहिती मागविण्यात आली. त्यानुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात समितीने दिनांक १५ सप्टेंबर, २०११ रोजी मुंबईतील आरे कॉलनी येथे भेट देऊन पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर भेटीच्या वेळी आढळून आलेल्या बाबीच्या अनुषंगाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षी घेण्यात आल्या. समितीने मुंबईतील गोरेगाव मुंबई येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना दिलेल्या भेटीच्या वेळी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सदर अहवालात आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त केल्या आहेत.

समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून साक्ष दिल्याबद्दल श्री.स्वाधीन क्षेत्रीय, अप्पर मुख्य सचिव महसूल व वन विभाग, श्री.रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, कृषी व पदूम विभाग, श्रीमती सीमा ढमढेरे, सह सचिव, नगरविकास, श्री.संजय देशमुख, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, श्री.सिताराम कुंटे, आयुक्त मुंबई महानगरपालिका, श्री.जयंत गायकवाड, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, श्री.ए.आर.जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, श्री.विनयकुमार राठोड, पोलीस अधिक्षक, फोर्स वन आरे वसाहत, मुंबई, श्री.र.शं.शिंदे, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मुंबई यांची समिती आभारी आहे.

समितीच्या प्रदीर्घ काळ चाललेल्या बैठकीच्या वेळी आपला अमूल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

समितीने रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन : **(शामराव उर्फ बाळासाहेब पाटील)**
नागपूर, समिती प्रमुख
दिनांक डिसेंबर, २०१२. अंदाज समिती

अहवाल

अंदाज समितीने गोरेगाव (मुंबई) येथील आरे कॉलनीमधील शासकीय जमिनीचे संरक्षण तेथे होत असलेले अनधिकृत बांधकाम, तबेलेधारक, गादामे, रस्ते, टोल नाका, आदिवासींना देण्यात येणाऱ्या सोई सुविधा यासाठी शासनाने केलेली तरतूद झालेला खर्च, आरे कॉलनीच्या स्थापनेचा उद्देश, सद्य:स्थिती या बाबत अंदाज समितीने छाणनी करण्याचे ठरविले त्यानुसार संबंधित विभागाकडून समितीने प्रथम माहिती मागविली असता गोरेगाव मुंबई येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना मिळणाऱ्या सोई सुविधा संदर्भात पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाकडून समितीस खालील माहिती प्राप्त झाली.

आरे दुग्धवसाहतीत ४६ ठिकाणी झोपडीधारकांच्या झोपड्या असून सन १९९५ पूर्वीच्या जिल्हा अधिकारी यांनी केलेल्या सर्व्हे नुसार ६७२० झोपड्या आहेत अनधिकृत झोपड्या होवू नयेत म्हणून सुरक्षा विभागामार्फत अतिक्रमणावर नियंत्रण ठेवण्यात येते. तथापि, अपुरा सुरक्षा कर्मचारी व वाहना अभावी नियंत्रण ठेवणे व निष्कासन करणे जिकरीचे होते. तरी देखील वेळोवेळी सदरचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्त घेवून निष्कासन करण्यात येते. तथापि, बऱ्याच वेळा पोलीसांना बंदोबस्त देणे शक्य होत नाही. मागील ३ वर्षात म्हणजेच सन २००७ ते २००९ मध्ये एकूण २५४७ झोपड्यांचे व सन २०१० ते २०११ मध्ये एकूण १३०५ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे. आरे दुग्धवसासहतीतील तीनही चेकनाक्यावरुन झोपडी बांधण्यासाठी लागणारे साहित्य आणण्याकरिता प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तरीदेखील आरे कॉलनीच्या विर्स्तीण असलेल्या परिसरातून जंगलातील कच्च्या वाटेवरून झोपडी बांधण्यासाठी साहित्य येत असल्याची माहिती मिळताच अशा वाटा शोधुन सिमेंट कॉक्रीट पोलने त्या बंद करण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार महानगरपालिकेने अशी बांधकामे विना परवाना जाहिर करून तोडणेबाबत प्रधान सचिव, नगर विकास यांनी त्यांचे दालनात सचिव (पदूम) तसेच लोकप्रतिनिधी व मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी यांचे समवेत दिनांक ४ जून, २०११ जोरी बैठक घेवून कडक सुचना दिल्या आहेत. अशी बांधकामे निदर्शनास आल्यावर आरे प्रशासनाने महानगरपालिकेस त्वरित कळविणेबाबतही सूचना दिल्या आहेत. आरे दुग्धवसाहतील सध्या असलेल्या सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही, त्यामुळे भुतपूर्व सैनिकांची किंवा खाजगी प्रशिक्षीत सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव दिनांक ३ जून, २०११ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. आरे दुग्धवसाहतीत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्याकरिता, गस्ती घालण्याकरिता व तातडीने बांधकाम साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी दोन जीप, एक टेंपो व एक कारची आवश्यकता आहे.त्यासाठी अंदाजे रु.४०,००,०००/-

(अक्षरी रुपये चाळीस लाख) खर्च अपेक्षीत आहे. याकरिता या कार्यालयाचे पत्र आदुव/मुकाअ/शा.१(१) सुरक्षा रक्षक/१६१० दिनांक ९/६/२०११ अन्वये विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आरे दुग्ध वसाहतीमधील अतिक्रमण रोखण्याकरिता संपूर्ण जमीनीची मोजणी करून सरहद्दीवर सिमेंट कॉंक्रीटची भिंत बांधण्याकरिता शासनाकडून एकूण रुपये १९,६०,९५,६००/- इतक्या रक्कमेस मान्यता देण्यात आली आहे. सध्या जमीनीची मोजणी व संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही सुरु आहे. या कार्यालयामार्फत आतापर्यंत निष्कासित केलेल्या अनधिकृत झोपड्यांचा तपशिल सोबत (**परिशिष्ट "अ"**) जोडण्यात आला आहे.

आरे दुग्धवसाहतीमधील १९९५ पूर्वीच्या आदिवासी पाड्यांना/झोपडीधारकांना शासन मान्यतेने नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात आतापर्यंत त्यांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

आरे दुग्धवसाहतीमधील परवानाधारक / झोपडीधारक यांना स्वतंत्र मीटरद्वारे वीज पुरवठा करण्याकरिता शासन ज्ञापन दिनांक २१/५/१९९८ अन्वये २० फुट x १५ फुट (३०० चौ.फुट) आकाराचे १० भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्ट्यावर मे.रिलायन्स एनर्जी लि.(मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी) यांना देण्यात आलेल आहेत. सदर ठिकाणी विद्युत सब स्टेशन बसवून विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला असून सदर परिसरात असणाऱ्या आदिवासी पाड्यांनांही वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.

१.नवशाचा पाडा २.फुटक्या तळीचा पाडा ३.नावापाडा युनिट क्र.६, ४.वनीचा पाडा ५.खांबाचा पाडा/गावदेवी पाडा/ मटई पाडा ६.नावा पाडा युनिट क्र.१९ या ६ ठिकाणी विद्युत सबस्टेशनकरिता भूखंड मंजूरी अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता महसूल विभागाकडून मागणी करण्यात आलेली माहिती मे.रिलायन्स एनर्जी लि. यांचे कडून अद्यापी अप्राप्त आहे. मे.रिलायन्स एनर्जी लि.यांना मुख्य कार्यकारी अधिकारी आरे दुग्ध वसाहत कार्यालयाकडून दिनांक ८/३/२००४, दिनांक १२/५/२००४, दिनांक २/६/२००८, दिनांक ४/९/२००८ व दिनांक १९/३/२०११ या पत्रान्वये याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे?. तसेच विभागाचे पत्र आदुवि १६/१/जमीन/आरे /विसस्ट /४/९८/ २१६७/५.५.११ दिनांक ५/५/२०११ व शासन पत्र दिनांक १८/७/२०११ अन्वये उपस्थित मुद्यांचा खुलासा कार्यालयीन पत्र दिनांक ६/८/२०११ अन्वये विभागास सादर करण्यात आला असून शासन आदेश प्राप्त झाल्यास प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासन आदेश एएमसी १०१०/६०७/प.क्र.५२/पदुम-८ दिनांक ३०/३/२०१० अन्वये आदिवासी पाड्यात पाणी पुरवठाकरिता एकूण २० कि.मी. लांबीची (२०,००० मी.) जलवाहिणी टाकणे व एकूण १५ पंपगृह बांधणेसाठी १३६५ चौ.मी. जागा देण्याकरिता मान्यता देण्यात आली असून, बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे मार्फत पाईप लाईन टाकण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

आरे दुग्धवसाहतीमधील एकूण १३ आदिवासी पाड्यात स्त्री/पुरुष शौचालय बाधण्याकरिता शासन आदेश क्र.एएमसी १०१०/४३१४/प्र.क्र.५९/पदुम-८, दिनांक ३०/३/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र दिनांक २२/६/२०१० अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे यांना "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	आदिवासी पाड्यांचे नाव	कामाचे स्वरूप	शेरा
१)	नवशाचा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	कोंकण कृषी विद्यापीठ यांचे हद्दीत
२)	फुटक्या तळीचा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	राज्य राखीव पोलीस बल क्र.८यांचे हद्दीत
३)	जिवाचा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
४)	चाफ्याचा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	फोर्स वन यांचे हद्दीत
५)	निंबार पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
६)	लोतडे पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
७)	कोंबड पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
८)	प्रजापुर पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
९)	केल्टी पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	फोर्स वन यांचे हद्दीत
१०)	नवा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	या कार्यालयाच्या हद्दीत
११)	हबाले पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	फिल्म सिटीच्या हद्दीत
१२)	फुटक्या तडीचा पाडा	स्त्री/पुरुष करिता शौचालय	राज्य राखीव पोलीस बल क्र.८यांचे हद्दीत
१३)	नांगरमोडी पाडा	रस्ताचे बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत

आदिवासी पाड्यात एकूण २० ठिकाणी शौचालय कुपनलिका जलवाहिनी करिता शासन पत्र एएमसी १०१०/प्र.क्र.१६८/पदुम-८ दिनांक ९/७/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे व या कार्यालयाचे पत्र दिनांक १/९/२०१० अन्वये (म्हाडा) यांना "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यात आले आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	आदिवासी पाड्यांचे नाव	कामाचे स्वरूप	शेरा
	प्रजापुर डोंगरी पाडा	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	सारीपुत नगर	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	नवापाडा नं.२यु.नं.१९	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	नवापाडा नं.२यु.नं.१९	जलवाहिंनी टाकणे	या कार्यालयाच्या हद्दीत

	गांवदेवी नवापाडा नं.१यु.नं.६	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	गांवदेवी नवापाडा नं.१यु.नं.६	२ कुपनलिका	या कार्यालयाच्या हद्दीत
	भुरीखान पाडा पिकनिकपॉईट	२ कुपनलिका	या कार्यालयाच्या हद्दीत
	मटई पाडा यु.न.२५	२ कुपनलिका	या कार्यालयाच्या हद्दीत
	मटई पाडा यु.न.२५	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	कोंबट पाडा	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	खडक पाडा	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	खडक पाडा	जलवाहिनी २ कुपनलिका	या कार्यालयाच्या हद्दीत
	देवी पाडा यु.न.७	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	निंबार पाडा यु.न.७	५ शौचालय बांधकाम	या कार्यालयाच्या हद्दीत
	मोराचा पाडा यु.न.३०	---	या कार्यालयाच्या हद्दीत
	जिवाचा पाडा यु.न.३०	---	या कार्यालयाच्या हद्दीत
	चरणदेव पाडा हिल क्वाटर्स	---	या कार्यालयाच्या हद्दीत
	नागरमोडी पाडा यु.न.३१	---	या कार्यालयाच्या हद्दीत
	नागरमोडी पाडा यु.न.३१	---	या कार्यालयाच्या हद्दीत
	केलटी पाडा न.१यु.न.१८	---	फोर्स वन यांचे हद्दीत
	गट क्र.२९ व ३०	---	या कार्यालयाच्या हद्दीत

शासन पत्र एएमसी १०१/प्र.क्र.३०१/२०१०/पदुम-१०, दिनांक २/१२/२०१० अन्वये आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाड्यांना व गट क्र.१ ते ३२ येथील झोपडीधारकांना एकूण ११ ठिकाणी रस्ता दुरुस्ती, समाज मंदीर दुरुस्ती, सोलर लाईट लावणे, बोअरवेल, शौचालय व गटारे दुरुस्ती इत्यादी करिता मान्यता देण्यात आली आहे. या कार्यालयाचे पत्र दिनांक १३/१२/२०१० अन्वये सहायक आयुक्त, पी/दक्षिण विभाग, महानगर पालिका, मिठानगर, यांना "ना-हरकत" प्रमाण पत्र देण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) गांव देवीपाडा येथे बालवाडी दुरुस्ती करणे.

२) खांबाचापाडा, मटईपाडा, कोंबडपाडा, देवीचापाडा, भूरीखानपाडा, चरणदेवपाडा, खडक पाडा येथील मुख्य रस्त्याचे पेवर ब्लॉकने पुनर्बाधणी करणे.

३) आरे महानगरपालीका शाळेसाठी पाण्याची नवीन जल जोडणी करणे.

४) गाव देवीपाडा व आरे महानगरपालीका शाळा येथील पायवाट दुरुस्त करणे.

५) गट क्र.९ येथे समाजमंदीर दुरुस्त करणे.

६) देवीपाडा येथील अंतर्गत पायवाट दुरुस्ती करणे

७) देवीचापाडा, चरणदेवपाडा, खांबाचापाडा, कोंबडपाडा, नागरमोडी पाडा, गावदेवीपाडा, नवापाडा गट क्र.१९, नवापाडा गट क्र.६ येथील सोलर लाईट लावणे.

८) गट क्र.३२,३१,७ व २९ येथे बोरवेल पुरविणे,

९) गट क्र. १३ समाजमंदीर दुरुस्ती करणे.

१०) मोराचापाडा गट क्र.३० येथे पायवाट व गटारे दुरुस्त करणे.

११) शासन पत्र एएमसी २०११/प्रक्र.१०/पदुम/१० दिनांक ९/२/२०११ अन्वये २७ ठिकाणी पायवाट व गटारे, वाचनालय, व्यायामशाळा, सामाजिक सभागृह, इत्यादी करिता मान्यता देण्यात आली आहे. या कार्यालयाचे पत्र दिनांक ८/३/२०११ अन्वये सहायक आयुक्त, के/पूर्व विभाग महानगर पालिका, अंधेरी यांना "ना-हरकत" प्रमाण पत्र देण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रस्तावित ठिकाण	कामाचा तपशील	प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्रफळ
	श्री.गणेश विकास संघ, गणेश नगर	पायवाट व गटारे	-
	समर्थ मंदिरा मागे, गणेश नगर	नवीन शौचालय	१० बैठकांचे शौचालय
	श्री.गणेश विकास संघ, गणेश नगर	सामाजिक सभागृह	१५ X २० फुट
	नवनाथ नमस्कार चाळ, प्रजापूर	पायवाट व गटारे	-
	प्रजापूर, सारीपूत नगर	पायवाट व गटारे	-
	हनुमान नगर सारीपूत नगर	पायवाट व गटारे	-
	गणेश नगर	सामजिक सभागृह	२० X १० फुट
	किर्ती नगर	सामाजिक सभागृह	३० X ६० फुट
	गौतम नगर	वाचनालय	०८ X १२ फुट
	किर्ती नगर	महिला मंडळ आधार केंद्र	१० X १५ फुट
	आदिवासी डोगरी पाडा	सामाजिक सभागृह	२५ X २५ फुट
	आदिवासी डोगरी पाडा	व्यायाम शाळा	२० X १५ फुट
	सारीपूत नगर	सामाजिक सभागृह	१५ X २० फुट
	सारीपूत नगर	व्यायाम शाळा	१५ X २० फुट

	दूर्गा नगर	व्यायाम शाळा	१५ X २० फुट
	दूर्गा नगर साईश्रध्दा मंडळ	सामाजिक सभागृह	१५ X २० फुट
	दुर्गा नगर	क्रिडा केंद्र	१५ X २० फुट
	सारीपूत नगर आदिवासी पाडा	महिला मंडळ आधार केंद्र	१५ X १५ फुट
	सारीपूत नगर	वाचनालय	१२ X १८ फुट
	गौतम नगर	वाचनालय	१५ X १५ फुट
	दुर्गानगरजागृति महिला मंडळ	समाजकेंद्र	२० X १५ फुट
	दुर्गा नगर साईश्रध्दा मंडळ	समाजकेंद्र	२५ X ३० फुट
	गौतम नगर किर्ती नगर मैदान	व्यायामशाळा	३० X ३० फुट
	गणेश नगर बुध्द विहार जवळ	समाज केंद्र	१८ X १५ फुट
	गौतम नगर किर्ती नगर जवळ	वाचनालय	०८ X १२ फुट
	आदिवासी पाडा क्र.३ गणेश नगर	बालवाडी (पुर्नबांधकाम)	२० X १५ फुट
	गौतम नगर शिव मंदीर जवळ	समाजकेंद्र	२५ X २५ फुट

झोपडपट्टीपुनर्वसन प्रकल्प (SRA)

१) आरे दुग्ध वसाहतीमध्ये ४६ ठिकाणी सुमारे १८० एकरावर झोपडीधारकांनी अतिक्रमण केलेले आहे.

२) अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण व निष्कासन) यांनी सन १९९५ पुर्वीच्या ६७२० झोपड्या असल्याचे निश्चित केल्यावरुन ३३.६ एकर जमीनीवर शासनाने पुनर्वसन करण्याचा निर्णय दिनांक २८ जून, २००६ रोजी घेतलेला आहे.

३) पुनर्वसन मे.बामकोटेक प्रा.लि. या संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. त्यांनी या पोटी आरे दुग्ध वसाहतीच्या कार्यालयात अनामत रक्कम म्हणून १० कोटी दिनांक ५/६/२००६ रोजी भरणा केलेला आहे व मे. बामकोटेक प्रा.लि. यांच्याशी दिनांक १८/८/२००६ रोजी करारनामा करण्यात आला तसेच ३३.६ एकर जमीन पुनर्वसनाकरिता मे. बामकोटेक प्रा.लि. यांच्या ताब्यात दिलेली आहे.

४) नियोजित जमीन ना विकास क्षेत्रातील असल्याने तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गाला लागून असल्याने या ठिकाणी पुनर्वसन करण्यास विरोध करण्यात आला.

५) मा.राज्यमंत्री यांनी विधानसभेत विकास क्षेत्रातील जमीनीवर पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले.

६) आश्वासन पुर्तता करण्याकरिता मा.राज्यमंत्री यांनी दिनांक २५/५/२००७ रोजी बैठक घेऊन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्या ताब्यातील ३३.६ एकर जमीन पुनर्वसनाकरिता परत घेण्याचा तसेच तितकीच

जमीन देण्याचा निर्णय घेतला आहे.

७) शासनाने जमीन अदला बदलीचे आदेश निर्गमित केले परंतु त्यास मा.सचिव यांनी दिनांक २९ मे, २००८ रोजी कार्यवाही करू नये असे आदेश दिले.

८) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जनहित याचिका क्र.१५५/२००६ सद्यःस्थितीत स्थगिती आहे, पुढील तारीख अद्याप निश्चित नाही.

९) मे.रायल पॉम (इंडिया) प्रा.लि.यांनी झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता दिलेला प्रस्ताव आदुवि१६/१/ आरे/जमीन/रॉयलपामस/३२/२०१०/२७८६/ दिनांक २५/५/२०१० अन्वये शासनाकडे सादर केला आहे तो खालील प्रमाणे आहे.

सर्व झोपडपट्टी धारकांचे शासन निश्चित करेल त्याप्रमाणे मे. रायल पॉम (इंडिया) प्रा.लि.स्वतःच्या जमीनीवर पुनर्वसन करेल. त्याच्या बदल्यात बांधकामाच्या प्रमाणात चटई क्षेत्र विकासकाला देय राहील. वरील प्रस्ताव एकाच विकासकाने दिला असल्याने त्यात पारदर्शकता असल्याच्या दृष्टीने खुल्या स्पर्धेद्वारे विहीत निविदा पध्दतीने विकासकास निवड करणे शक्य होईल.

सद्यःस्थितीत एमएमआरडीएला एस.पी.ए. जाहिर करून त्यांचे मार्फत सदर झोपडपट्ट्यांचा विकास करण्याचे आदेश मा.मुख्य सचिवांनी दिले आहेत. नगर विकास विभागाकडे प्रक्रिया सुरु आहे.

आरे कॉलनी मध्ये शासन निर्णय दिनांक ३/३/१९९७, २२/१०/१९९७,९/६/१९९८ नुसार रॉयल पाम यांना पोहच रस्त्याकरिता ३० वर्षासाठी १७६९०.२ चौ.मी.जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त आरे दुग्ध वसाहतीची जागा देण्यात आलेली नाही. हॉटेल रॉयल पाम ही खाजगी मालमत्ता असल्यामुळे अनधिकृत बांधकाम, महानगर पालिका परवानगी,एस.आर.ए.बांधकामाच्या दर्जाबाबत पदूम विभागाचा संबंध येत नाही.

आरे दुग्ध वसाहतीमध्ये अवलोकन स्थळ, आरे पोलिस ठाणे जवळ वाहनतळ तयार करण्याकरिता वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आरे यांनी केलेला मागणी व मा.मंत्री (दुग्ध) यांनी दिलेल्या निर्देशान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आरे यांनी दिलेल्या परवानगीने मातीभरणी करण्यात आली आहे. या बाबत शासनाने आयुक्त, पशुसंवर्धन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीने प्रत्यक्ष पाहणी केलेली असून, समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. आरे वसाहतीमध्ये अनधिकृतरित्या डेब्रीज टाकले जाणार नाही याची दक्षता सुरक्षा विभागामार्फत घेण्यात येत आहे. आरे कॉलनीत मोठमोठी हॉटेल्स, कॅन्टीन, स्टोअर्स, सुशोभित केलेले तलाव आहेत. सदरहू जागा कोणा कोणाला लिजवर दिलेली आहे. त्यांचा कालावधी किती आहे व त्यापासून किती उत्पन्न मिळते? याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	ठेक्याचा प्रकार	भाडे (प्रति महिना)	सद्यःस्थिती

१)	श्री.किशोर लिंबाचिया	गाळा क्र.१ आरे मार्केट मेडीकल स्टोर्स/गारमेंट	१३८९/-	निविदा प्रक्रिया सुरु
२)	श्री.आरीफ मो.युनूस कुरेशी	गाळा क्र.६आरे मार्केट बेकरी व्यवसाय	१०३८/-	कोर्ट मॅटर
३)	मे.जोत्स्ना स्टोर्स	गाळा क्र.१ आरे मार्केट किराणा माल	३५०७/-	निविदा प्रक्रिया सुरु
४)	मे.जोत्स्ना स्टोर्स	गाळा क्र.१ आरे मार्केट लॉन्ड्री	३९८/-	निविदा प्रक्रिया सुरु
५)	मे.सुरश संजीवा भंडारी	गाळा क्र.१ आरे मार्केट हॉटेल	२५०००/-	८/२/२००९ ते ९/२/२०१२ पर्यंत
६)	श्री.आरीफ मो.युनूस कुरुशी	गाळा क्र.१ आरे मार्केट शॉप	१३९१/-	निविदा प्रक्रिया सुरु
७)	शैलजा प्रोव्हीजन स्टोर्स	गाळा क्र.१ आरे मार्केट किराणा माल	२८३४/-	निविदा प्रक्रिया सुरु
८)	श्री.अनिल भ.लगड	व्हेंडर स्टॉल	१०००/-	
९)	श्रीमती वनिता व.शिंदे	व्हेंडर स्टॉल	३००/-	
१०)	श्रीमती ललिता शंकर माने	व्हेंडर स्टॉल	१०००/-	
११)	श्रीमती सावित्री बापू चोरघे	व्हेंडर स्टॉल	१०००/-	
१२)	श्रीमती व्ही.बी.पावसकर	व्हेंडर स्टॉल	५००/-	
१३)	कुमारी कुमुदिनी पावसकर	व्हेंडर स्टॉल	५००/-	
१४)	श्री.ए.व्ही.शेट्टी	व्हेंडर स्टॉल	५२७५/-	
१५)	श्री.एम.आर.शेट्टी	व्हेंडर स्टॉल	१०००/-	
१६)	श्री.सी.व्ही.शेट्टी	व्हेंडर स्टॉल	१०००/-	
१७)	श्री.सी.व्ही.शेट्टी	व्हेंडर स्टॉल	४००/-	
१८)	श्री.प्रफुल्ल एल.गायकवाड	व्हेंडर स्टॉल	१२०००/-	
१९)	श्रीमती जिजाबाई नि.कांबळे आणि श्रीमती सुनंदा नि.सरदार	व्हेंडर स्टॉल	१०००/-	

२०)	श्री.एस.जे.घुगरे	व्हेंडर स्टॉल	५००/-	
एकूण रक्कम रु.(प्रति महिना)			**६१०३२/-**	

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	ठेक्याचा प्रकार	भाडे (प्रति महिना)	सद्य:स्थिती
१)	श्रीमती गिता पी.तुलसियानी	गोदाम क्र.१२,१३,१४	१/११/२००२ ते ३१/१०/२००५	शासनाच्या ताब्यात
२)	मे.बालाजी टेलिफिल्म प्रा.लि	गोदाम क्र.२,४,८,११	८/१०/२००२ ते ७/१०/२००५	नगर व दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबित पुढील सुनावणी दि.२७/०९/२०११
३)	परशुराम गुंटूका	पॅरागवत ठेका १६ एकर २८ गुंठे	१/२/२००८ ते ३१/१/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे दि.२६/७/२०११
४)	श्रीमती दिव्या दि.कापडीया	नौका विहार ठेका	४/१/२००८ ते ३/१/२०११	कोर्ट केस
५)	श्री.महादेव इश्वर साळूंखे	आरे गार्डन रेस्टॉरंट ठेका	४/१/२००८ ते ३/१/२०११	कोर्ट केस
६)	मे.निलेश एन्टरप्रायजेस	विहिरीतून पाणी घेवून जाण्याचा ठेका	४/१/२००८ ते ३/१/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे दि.२६/७/२०११
७)	श्री.आर.एच.करबुजा	ताडी ठेका	८/८/२००८ ते ७/८/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे दि.२६/८/२०११
८)	रामभिया पोपट बी.	आंबा/फणस/नारळ/चिंच ठेका	८/८/२००८ ते ७/८/२०११	निविदा प्रक्रिया सुरु
९)	राकेश जे.दुबे	पॅरागवत ठेका २६ एकर	९/४/२००८ ते ८/४/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे

				दि.२६/८/२०११
१०)	श्री.आर.एच.करबुजा	शेणखत ठेका	१/८/२००९ ते ३१/१/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे २६/७/२०११
११)	ताय्यापा मालापा टोपे	पॅरागवत ठेका ११ एकर	१/१२/२००९ ते ३०/११/२०१२	११६४००
१२)	जटाशंकर दुबे	पॅरागवत ठेका ३ एकर २० गुंठे	१/१२/२००९ ते ३०/११/२०१२	६७०००
१३)	मे.कोहिनुर एन्टरप्रायजेस	चेकनाका	१३/१/२००९ ते १२/१/२०१२	१५,७५,००७८६
१४)	मे.संक्रमण टेलिफील्म	गट क्र.२ गोदाम क्र.१,३,५,६,७,१०	१३/२/२००२ ते १२/२/२००५	शासनाच्या ताब्यात
१५)	मे.जे.डी.इंटरनॅशनल	गट क्र.२५ गोदाम क्र.१५	१५/२/२००८ ते १४/२/२०११	शासनाच्या ताब्यात
१६)	मे.महेश इंजिनियरिंग	अवलोकन स्थळ	१६/२/२००८ ते १५/२/२०११	शासनाच्या ताब्यात
१७)	ताय्यापा मालापा टोणे	पॅरागवत ठेका ९ एकर २२ गुंठे	२०/१/२००८ ते १९/१/२०११	ठेका मंजूरी प्रस्ताव शासनाकडे २६/७/२०११
१८)	मे.महेश इंजिनियरिंग	प्रेक्षणिय स्थळ	२०/१२/२००८ ते १९/१२/२०१०	शासनाच्या ताब्यात
१९)	जय जलाराम एन्टरप्रायजेंस	जाहिरात फलक	२४/१/२००८ ते २३/१/२०११	ठेका रद्द
२०)	मे.लालजी ट्रान्सपोर्ट	कृ.वि.पवई वाया जाणारे पाणी घेवून जाण्याचा ठेका	२५/५/२००९ ते २४/५/२०१०	शासनाच्या ताब्यात
२१)	सिध्दीकी टिंबर मार्ट.	झाडे ठेका	२०११-२०१२	५००००
एकूण रक्कम रुपये				**१७४,७९६,०५२/-**

आरे दुग्ध वसाहतीमध्ये ३० गटात ३५३ परवानाधारकांना जागा देण्यात आलेली आहे. गैर वापराची तपासणी करण्याकरिता शासनाने पथकाची नेमणूक केली होती. तपासणी अंती गैरवापर आढळून आला नाही. कोकण विकास महामंडळाला देण्यात अलेल्या जागेवर वळू पाळून व संगोपन करुन त्याचे विर्य संकलन करून अतिशित विर्याची विक्री करण्यात येते. तसेच शासन निर्णय दिनांक ४/८/१९७९ व ९/५/१९८० नुसार महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांना ३२९ एकर ३ गुंठे जमीन कब्जे हक्काने दिलेली आहे. बालाजी टेलिफिल्मसबाबत मा.मंत्रीमहोदयांकडे प्रतयक्ष सुनावणी झाली. त्याची प्रत सोबत (परिशिष्ट-ब) जोडली आहे.

आरे चेकनाका

आरे दुग्धवसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी तीन्ही चेकनाक्यावरुन प्रवेश करणाऱ्या वाहन चालकांकडून प्रवेश शुल्क वसूलीचा ठेका मे.कोहिनूर इंटरप्रायझेस यांना दिनांक १३/१/२००९ ते १२/१/२०१२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी रु.१५,७५,००,७८६/- या रक्कमेस देण्यात आलेला आहे. मे.कोहिनूर इंटरप्रायाझेस यांनी प्रतिदिन रुपये १,४३,९३६,३३/- प्रमाणे दिनांक ५/९/२०११ पर्यंत एकूण रुपये १३,८९,५९,२३०/- या कार्यालयास भरणा केला आहे. सध्या काही येणे बाकी नाही. सदर ठेक्याची मुदत दिनांक १२/१/२०१२ रोजी संपुष्ठात आली आहे.

आरे कॉलनीत असलेल्या परवाने धारकांकडून परवाना शुल्क आकारणी बाबतचा तपशिल.

१) परवानी फी प्रती जनावर प्रति महिना रु.७५/-

अ) परवाना पेक्षा अधिक जनावरे ठेवल्यास दंड प्रती जनावर प्रति महिना रु.२०/-(१०% पर्यंत)

ब) परवाना पेक्षा अधिक जनावरे ठेवल्यास दंड प्रती जनावर प्रति महिना रु.५०/-(२०% पर्यंत)

२) विद्युत आकार कृषि बांधकाम विभाग, (विद्युत) १७ यांचे कडून प्रमाणित परिगणनेनुसार विद्युत देयके आकारण्यात येतात.

३) पाणी आकार रु.४५.५०/- प्रति जनावर प्रति महिना.

४) परवानेधारकांना पॅरागवताचा पुरवठा बंद करण्यात आला आहे.

५) सफाई कामगारांची मोफत सेवा बंद करण्यात आली आहे.

६) पशुवैद्यकिय सेवा बंद करण्यात आली आहे.

७) ४ क्षेत्र पर्यवेक्षक यांची सेवा सुरु आहे.

८) काही परवाने धारकांना प्रती जनावर १ गुंठा याप्रमाणे पॅरागवत क्षेत्र रु.४५००/- प्रती एकर प्रती वर्ष या प्रमाणे भाडेपट्ट्यावर देण्यात आलेली आहे.

<u>आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे :-</u>

ठक्करबाप्पा योजना :-

शासनामार्फत सन १९८५-१९८६ मध्ये मुंबई येथे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरु आहे. मुंबई उपनगरात /दुर्गम भागात नागरी वस्तीत लागुन/नागरी वस्तीत झोपडपट्टीच्या स्वरुपात एकूण २२२ आदिवासी पाडे आहेत त्यापैकी कुर्ला तालुक्यात १८, अंधेरी तालुक्यात ५०, व बोरीवली तालुक्यात १५४ पाडे आहेत. आरे कॉलनीमध्ये एकुण २७ पाडे विखुरलेल्या स्वरुपात खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	पाड्याचे नांव	कुटुंबे	लोकसंख्या
१)	भुरीखान पाडा	३०	१२९
२)	वनीचापाडा	२९	११०
३)	खांबाचा पाडा	५९	३०२
४)	कोबंडपाडा	५	२३
५)	खडकपाडा	१६	६७
६)	नवापाडा नं.-१, युनिट नं-१९	९	२९
७)	गावदेवी पाडा युनिट नं-२५	१३	६५
८)	फुटक्या तळीचा पाडा	१८	१०७
९)	चाफ्याचापाडा	१८	८१
१०)	केल्टी पाडा, युनिट नं-१८	४६	१९४
११)	केल्टी दामुपाडा	०६	२४
१२)	नवशाचा पाडा	२८	१३०
१३)	प्रजापुरपाडा क्र-१, युनिट नं-१९	३२	१२४
१४)	नवापाडा क्र-२, युनिट नं-१९	१६	६५
१५)	डोगरी पाडा	१३	७२
१६)	मरोशीपाडा युनिट नं-१६	४७	२१४
१७)	साईबागोंडा	१२३	५६०
१८)	उलटापाडा पवईलेक विहार	४३	२६९
१९)	चरणदेवपाडा	३२	११८
२०)	जिवाचा पाडा	७२	३०९
२१)	मोराचा पाडा	१२३	४८९
२२)	निबांर पाडा	२७	१२१
२३)	देवीचा पाडा	४९	१६९
२४)	हबालेपाडा फिल्मीसिटी	२७	१३०
२५)	नांगरमोडी पाडा युनिट -३१	२२	८९
२६)	उंबरशेतपाडा	०८	४८
२७)	गोरेगांव आदिवासीपाडा	६९	३४६
	एकूण	**९८०**	**४३५४**

वरील पाड्यांना शौचालय, रस्ता, पाणीपुरवठा व इतर मुलभुत सुविधा पुरविण्यासाठी शासनाने सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रुपये २ कोटी ठक्करबाप्पा योजनांतर्गत मंजूर केले होते. उपलब्ध

प्राप्त २ कोटी पैकी रुपये १,०६,९२,१८७/- (अक्षरी रु. एक कोटी, सहा लाख, ब्याणव हजार, एकशे सत्याऐशी मात्र) म्हाडा, मुंबई यांना तर कार्यकारी अभियंता, आरे प्रकल्प विभाग, गोरेगांव यांना रुपये ९३,०७,८१३/- अदा केले आहेत. त्या रकमेतुन आरे कॉलनीतील एकूण ४१ कामे हाती घेण्यात आली आहेत.

ठक्करबाप्पा योजना कामाची सद्य:स्थिती

अ.क्र.	यंत्रणेचे नांव	पाड्याचे नांव	कामाची सद्य:स्थिती	मंजूर रक्कम	एकूण झालेला खर्च	कामाची सद्य:स्थिती कामे पूर्ण/ अपूर्ण कामे	शेरा
१)	म्हाडा मुंबई	१.खडकपाडा	१.बोअरवेल जलवाहिनी	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
			२.स्त्रियासाठी शौचालय	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
२)	---	२.देवीचापाडा युनिट नं.७	३.स्त्रियासाठी शौचालय ४.पुरुषासाठी शौचालय ५.रस्ता बांधकाम	५,००,००० ५,००,००० ५,००,०००	५,००,००० --------- ---------	कामे पूर्ण कामे पूर्ण कामे पूर्ण	
३)	---	३.मोराचापाडा युनिट नं.३	६.स्त्रियासाठी शौचालय ७.पुरुषासाठी शौचालय	५,००,००० ५,००,०००	--------- ---------	कामे पूर्ण कामे पूर्ण	
४)	---	४.चरणदेवपाडा	८.स्त्रियासाठी शौचालय ९.पुरुषासाठी शौचालय	५,००,००० ५,००,०००	५,००,००० ५,००,०००	कामे पूर्ण कामे पूर्ण	
५)	---	५.नांगरमोडी पाडा	१०.स्त्रियासाटी शौचालय	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
			११.बोबरवेल जलवाहिनी	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
६)	---	६.वनीचापाडा	१२.कुपनलिका	१९३१९८/-	----	कामे पूर्ण	
			१३.स्त्रियासाठी शौचालय	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
७)	---	७.भुरीखानपाडा	१४.रस्ताबांधकाम	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
८)		८.नवा पाडा	१५.पुरुषासाठी शौचालय	५,००,०००	-----	कामे पूर्ण	
९)	---	९.प्रजापुरपाडा	१६.पाणीपुरवठा	५,००,०००	----	-----	
१०)	---	१०.जिवाचापाडा	१७.स्त्रियासाठी शौचालय	४,९८,९८९	----	कामे पूर्ण	
११)	---	११.नवापाडा, युनिट नं-१९,	१८.पुरुषासाठी शौचालय	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
			१९.बोअरवेल जलवाहिनी	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
१२)		१२.गावदेवी	२०.बोअरवेल जलवाहिनी	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	
			२१.रस्ता बांधकाम	५,००,०००	५,००,०००	कामे पूर्ण	

१३)	---	१३.मटाईपाडा युनिट नं-२५	२२.कूपनलिका	५,००,०००	-----	कामे पूर्ण	
			एकूण	**१,०६,९२,१८७**			

अ. क्र.	**यंत्रणेचे नांव**	**पाड्याचे नांव**	**कामाची सद्य:स्थिती**	**मंजूर रक्कम**	**एकूण झालेला खर्च**	**कामाची सद्य:स्थिती कामे पूर्ण/ अपूर्ण कामे**	**शेरा**
१)	कार्यकारी अभियंता आरे प्रशासन	१.जिवाचापाडा	१.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	कामे पूर्ण	
			२.पुरुषासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	कामे पूर्ण	
२)	---	२.लोतडे पाडा	३.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	४६७३७५/-	कामे पूर्ण	
३)	---	३.कोंबड पाडा	४.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	४८१८६१/-	कामे पूर्ण	
४)	---	४.नवा पाडा	५.स्त्रियासाटी शौचालय	४९८९८९/-	निरंक	जमीनीपर्यंतचे दगडी बांधकाम पूर्ण झालेले आहे.	
	---	५.प्रजापूर पाडा	६.स्त्रियासाटी शौचालय	४९८९८९/-	निरंक	जागा निश्चित केलेली नाही.	
	---	६.नांगरमोडीपाडा	७.रस्ताबांधकाम ८.पुरुषासाठी शौचालय	४७७०००/- ४९८९८९/-	निरंक निरंक	कामे पूर्ण कामे पूर्ण	
	---	७.फुटक्या तळीचा पाडा	९.स्त्रियासाठी शौचालय १०.रस्ता बांधकाम	४९८९८९/- ३४८०००/-	४६८०००/- ----	कामे पूर्ण कामे पूर्ण	
	---	८.हबाले पाडा	११.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	कामे सुरू नाही	
	कार्यकारी अभियंता	९.नवशाचा पाडा	१२.स्त्रियासाठी शौचालय १३.पुरुषासाठी शौचालय	४९८९८९/- ४९८९८९/-	निरंग ----	नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त (कृषी विद्यापीठ) नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त	

	---	१०.केल्टी पाडा	१४.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	नाहरकत प्रमाणपत्र (फोर्स वन)	
			१५.पुरुषासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त	
	---	११.चाफयाचा पाडा	१६.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	नाहरकत प्रामणपत्र अप्राप्त (फोर्स वन)	
			१७.पुरुषासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त (फोर्स वन)	
	---	१३.निबारं पाडा	१८.स्त्रियासाठी शौचालय	४९८९८९/-	निरंक	जागा निश्चित केलेली नाही	
	---		१९.पुरुषासाठी शौचालय	४९८८९८/-	निरंक	जागा निश्चित केलेली नाही	
काम पूर्ण -०८ सुरु -०१ कामसुरु नसलेली -०१ जागा निश्चित नाही -०३ नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त -०६ (४ फोर्स वन व २ पशुवैद्यकीय महाविद्यालय)							
एकूण -१९							

सन २०१०-२०११ मध्ये ठक्करबापा योजनेअंतर्गत स्थानिक आमदार, प्रतिनिधी यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रस्ताव मा.अपर आयुक्त, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार अपर आयुक्त, ठाणे यांनी दिनांक ११/२/२०११ चे पत्रानुसार आयुक्त, आदिवासी विकास, म.रा.नाशिक यांचेकडे ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत या प्रकल्पासाठी रु.१६.७ कोटीची मागणी नोंदविली होती. मात्र सन २०१०-२०११ मध्ये या योजनेअतंर्गत काहीही निधी प्राप्त झालेला नाही. सन २०११-२०१२ मध्ये जिल्हायोजनेतून ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत रु.१२६.३२ लाख निधी मंजुर करण्यात आला आहे.

विद्युत पुरवठा :-

आरे कॉलनीतील हबालपाडा येथे सब स्टेशन उभारण्याचे बांधकाम अधिक्षक अभियंता, विद्युत विभाग,

भांडूप यांचेकडून पूर्ण करण्यात आले आहे.

आरे कॉलनीतील १) खांबाचापाडा २) गावदेवीपाडा ३) नवापाडा युनिट ६ ४) वनीचापाडा ५) नवश्याचापाडा ६) फुटक्या तळ्याचापाडा ७) नवापाडा युनिट नं.१९ या ठिकाणी सब स्टेशन उभारण्यासाठी प्रतिवर्षी प्रति डि.पी.रु.१/- या प्रमाणे भाडे आकारून जिल्हाधिकारी, उपनगर जिल्हा, मुंबई यांनी या प्रस्तावास शासन मान्यतेच्या अधिन राहून मे.रिलायन्स एनर्जी यांचेकडून काम पूर्ण करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. जागा उपलब्ध करून देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे प्रशासन यांनी शासनाकडे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे. मात्र मंजुरी अप्राप्त आहे.

दिनांक १८/४/२०११ रोजी न्युझिलंड होस्टेल आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव येथे मा.नामदार श्री.गुरुदासजी कामत यांच्या अध्यक्षतेखाली व मा.मधुकररावजी चव्हाण, मंत्री पशुसंवर्धन, दुग्ध व मस्त्यव्यवसाय विभाग व मा.राजेंद्र गावितजी, राज्यमंत्री आदिवासी विकास, मा.आमदार श्री.भाई जगताप तसेच जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, आयुक्त दुग्ध व्यवसाय विभाग व अपर आयुक्त आदिवासी विकास यांच्या समवेत बैठक झाली त्या बैठकीमध्ये वरील पाड्यांना विद्यूतीकरणासाठी आरे प्रशासनाकडून ना-हीकत प्रमाणपत्र न मिळाल्याबाबत मुद्या उपस्थित करण्यात आला होता. या बाबत मा.श्री.मधुकररावजी चव्हाण, मंत्री पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास यांनी तात्काळ विद्युतीकरणासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे शासनास निर्देश दिले आहेत. नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होताच सदर पाड्यांना विद्युत पुरवठा करण्याची कार्यवाही करता येईल.

<u>जातीचे दाखले :-</u>

मा.ना.श्री.गुरुदासजी कामत साहेब, केंद्रीय राज्यमंत्री, दूरसंचार तथा माहिती व तंत्रज्ञान भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली व मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्या उपस्थितीत दिनांक १०/७/२००९ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यात स्थाईक असलेल्या अनु.जमातीचे लोकांना जातीचे दाखले मिळत नाहीत. हा प्रश्न प्रामुख्याने चर्चेत घेण्यात आला आहे. मुळातच वर्षानुवर्ष, पिढ्यानपिढ्या रहाणाऱ्या आदिवासींना अनु.जमातीचे दाखले मिळत नसल्याने त्यांच्या पाल्यांना शिक्षण व नोकरी पासून वंचित रहावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता त्यांना सुलभ रित्या जातीचे दाखले कसे मिळतील याबाबत विस्तूत चर्चा झाली. त्या प्रमाणे झालेल्या चर्चेनुसार जातीचे दाखले निर्गमित करतांना सन १९५० चा वास्तव्याचा लेखी पूरावा सादर करणेबाबत जो आग्रह धरणेत येत आहे, ही अट शिथिल करण्यात यावी अशी आदिवासी संघटनेद्वारे मागणी करण्यात आली. त्यानुसार यापुढे तहसिलदराकडे जातीचा दाखला मिळणे कामी अर्ज करते वेळी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, बोरीवली, मुंबई यांनी जातीच्या दाखल्यासाठी संबंधितांना प्रमाणपत्र तथा शिफारस पत्र द्यावे असे

दि.१०/७/२०११ रोजी झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले.

प्रकल्प अधिकारी, मुंबई यांनी दिनांक ४/८/२०११ पर्यत एकूण १६७९ आदिवासी लाभार्थ्यांना आदिवासी असल्याचे प्रमाणपत्र तथा शिफारस पत्र दिलेले आहे. तसेच ७०७६ आदिवासी लाभार्थ्यांना आदिवासी असल्याचे ओळखपत्र देण्यात आलेली आहेत.

तहसिलदार बोरीवली, अंधेरी व कुर्ला यांनी २००९-२०१० व सन २०१०-२०११ या कालावधीत जातीचे दाखले निर्गमित करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती दिनांक ५/८/२०११ रोजी दुरध्वनी वरून प्राप्त करून घेतली सदर माहिती सोबतच्या तक्त्यात सादर केलेली आहे.

अ.क्र.	तहसिल कार्यालयाचे नांव	एकूण प्राप्त प्रकरणे	त्यापैकी मंजुर प्रकरणे	नामंजूर प्रकरणे	तहसिलदार यांचे कडून आक्षेपासहित प्र.अ.यांचे कडे परत आलेली प्रकरणे	तहसिलदार यांना त्रुटी आढळलेली प्रकरणे	तहसिलदार कार्यालयाने कार्यवाही न झालेली प्रकरणे
	बोरीवली	दि.३१/१२/२०१० अखेरची शिल्लक ८८० जोन-११ ते दि.३०/७/११-१०३ ९८३	३६७	३५५	१७९	५७	२५
	अंधेरी	९४५	४२३	-	-	५११	११ (सन २०११)
	कुर्ला	४१६	१०२	४०	१३२	१२७	१५ (सन २०११)
	एकूण	२३४४	८९२	३९५	३११	६९५	५१

<u>शिधापत्रिका :-</u>

आदिवासी लाभार्थ्यांना शिधा वाटप कार्यालयामार्फत माहे जूलै, २००९ ते मे, २०१० अखेर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिधापत्रिका वाटप करण्यात आलेल्या आहेत व उर्वरित आदिवासी कुटुंबांना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही सुरु आहे.

अ.क्र.	शिधावाटप कार्यालय	पाड्यांची एकूण संख्या	गावातील पाड्यांच्या	रेशनकार्डासाठी शिधावाटप	शिधावाटप कार्यालयाने वाटप केलेली शिधावाटपपत्रिका

	कार्यालय नांव व क्रमांक		पाड्यांच्या कुटुंबाची एकूण संख्या (सुमारे)	शिधावाटप कार्यालयाकडे प्राप्त अर्ज	बीपीएल (अंत्योदय)	इतर कार्डाचा प्रकार
	गोरेगांव २७ ग	२६	७७७	५६८	६८	केशरी ५००
	कांदिवली २८ ग	८	८४	१८४	१८४	-
	बोरीवली ४७ ग	९	३९५	१३२	१३२	-
	दहिसर ४७	६	१११	५५	२९	केशरी २६
	एकूण	४९	१४६७	९३९	४१३	५२६

आरोग्य सुविधा :

सद्य:स्थितीत आरे कॉलनीमध्ये आरे दुग्ध प्रशासनाची दवाखान्याची सोय उपलब्ध आहे. सदर ठिकाणी आदिवासींवर औषधोपचार केला जातो. या ठिकाणी पुरेशा प्रमाणात औषधे उपलब्ध असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध प्रशासन यांनी सांगितले आहे.

आरे कॉलनीतील आदिवासी पाड्यांमध्ये आदिवासी नागरिकांना त्वरीत औषधोपचार मिळणेसाठी आरे कॉलनी महानगरपालिकेच्या शाळेच्या प्रांगणात प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याचा प्रस्ताव सहा.आयुक्त पी.दक्षिण विभाग गोरेगांव यांनी आयुक्त, महानगरपालिका, मुंबई यांना सादर केला आहे. तो मंजूर होताच या ठिकाणी महानगरपालिके मार्फत दवाखाना सुरु केला जाईल.

पाणी पुरवठा :

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतून प्रकल्प कार्यालय मुंबई यांना सन २००८-२००९ या वर्षासाठी रु.१५.०० लक्ष इतका निधी उपलब्ध झाला असून त्यातून केल्टीपाडा येथे रु.५.०० लक्ष खर्च करून पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. देवीचापाडा व हबाले पाडा येथील नळपाणी पुरवठा योजनेसाठी रु.१०.०० लक्ष निधी मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेडे सुपूर्द करण्यात आला आहे व तेथे पाणी पुरवठा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २००९-२०१० मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून रु.१९.५४ लक्ष एवढा निधी उपलब्ध झाला असून निधी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आला आहे तसेच सन २०१०-२०११ मध्येही महापालिकेस रु.१७.१९ लाख निधी पाणी पूरवठ्यासाठी वर्ग केला आहे.

शासकीय आश्रमशाळा सुरु करणे :

आरे प्रशासनाने शासकीय आश्रमशाळेसाठी पाच एकर मोकळी जागा उपलब्ध करून देण्याचे मान्य केले आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी, यांनी दिनांक ७/९/२०११ रोजी आरे प्रशासनाच्या अधिकाऱ्यासोबत दौरा करुन सहा जागांची पाहणी केली आहे. त्यापैकी शाळेसाठी सुयोग्य जागा निवड करून व त्या जागेचा सी.टी.एस. नंबर प्राप्त करून आरे प्रशासनाला पाच एकर जागा आश्रम शाळेसाठी मिळणेबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती

आरे कॉलनी परिसरामध्ये होणाऱ्या अनधिकृत बांधकामे, शासकीय जमीनीचा गैरवापर इत्यादी गोष्टी मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांच्या अखत्यारित येत असुन सदर अनधिकृत बांधकामावर मुख्य कार्यकारी, आरे दुग्ध वसाहत याच्याकडून कार्यवाही अपेक्षित असून, पी/दक्षिण विभागाकडून मनुष्यबळासह यंत्रणांची मागणी केल्यास ताबडतोब पुरविण्यात येईल. पी/दक्षिण विभागामध्ये एकूण २७ आदिवासी पाडे असून हे सर्व आदिवासी पाडे वनविभागाच्या जमीनीवर असून महानगर पालिकेच्या पी/दक्षिण विभागाकरिता असणाऱ्या विकास आराखड्यंमध्ये "हरित पट्टा" व आरे दुग्ध वसाहतीचे भू भाग "ना विकास क्षेत्रात" येत असल्यामुळे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास मुलभूत सुविधांकरीता वापरात आणता येत नाही. त्यामुळे बृहन्मुंबई महनगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार विकासाची कामे हाती घेता येत नाही. तथापि, केवळ मानवतावादी दृष्टीकोनातून महापालिकेच्या निधी शक्यतेनूसार या आदिवासी पाड्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत गेल्या ५ वर्षात उपलब्ध करून देण्यात आलेली निधी व सदर निधीतून पूरविण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती खालिल प्रमाणे आहे.

आरे कॉलनी येथील आदिवासी पाड्यांना मूलभूत सोयी सुविधा पूरविण्याकरिता सन २००६-२००७ या वर्षात आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती. तर सन २००७-२००८ मध्ये रु.७ कोटिची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सदर निधीतुन विविध मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. सदर कामांची यादी परिशिष्ट क्र.पृष्ठ क्र.सी-९ वर परिशिष्ट -क जोडले आहेत. तसेच सन २००८-२००९ मध्ये रु.२ कोटी व सन २००९-२०१० मध्ये रु.४ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सदर निधीतून सुध्दा विविध मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत व केलेल्या कामांची यादी परिशिष्ट "क" पृष्ठ क्र.सी-११ व परिशिष्ट "क" पृष्ठ क्र.सी-१३ वर जोडले आहेत. तसेच आर्थिक वर्ष २०१०-२०११ करिता पी/दक्षिण विभागाच्या आदिवासी पाड्यांमध्ये विविध मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरिता रु.७५ लाखांची आर्थिक तरतूद करण्यात आली असून विविध कामे हाती घेण्याचे योजिले आहे. सदर कामांची यादी परिशिष्ट "क" पृष्ठ क्र.सी-१५ वर जोडलेली आहे. या कार्यालयाने सदर कामे करण्यांस आयुक्त दुग्ध व्यवसाय विभाग व सचिव, दुग्ध व्यवसाय व

पशुसंर्वधन विभाग यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास विनंती पत्र दिनांक १६/९/२०११ रोजी पाठविले आहे. सदर पत्राची प्रत परिशिष्ट "क" पृष्ठ क्र.-१७ सोबत जोडली आहे. या कार्यालयास आदिवासी पाड्यांमध्ये सदर योजिलेले कामे करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांच्याकडून दिनांक १४/१२/२०१० रोजी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. सदर ना हरकत प्रमाणपत्राची प्रत परिशिष्ट "क" पृष्ठ क्र.सी-२३ ते पृष्ठ क्र.सी-२५ वर जोडलेली आहे. त्यानुसार या कार्यालाकडून प्रस्तावित कामे हाती घेण्यात आले असून सदर कामे प्रगती पथावर आहेत.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलअभियंता विभागाकडून आदिवासी पाड्यांमध्ये पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरववठा प्रणाली तयार केली असून त्यास रु.१० कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सदर काम प्रगती पथावर आहे. सदर कामाचे तपशील व जल अभियंता विभाग यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल परिशिष्ट क पृष्ठ क्र.सी-४५ ते परिशिष्ट क पृष्ठ क्र.सी-६५ वा जोडलेली आहे.

तसेच या कार्यालयाने पत्र क्र.सआपीद/१५३१९/सअ(परि) दिनांक २८/१०/२००९ अन्वये सचिव, आदिवासी विकास विभाग यांना आदिवासी पाड्यांमध्ये अधिक मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ढोबळ अंदाज पत्रक सादर केले होते. सदर पत्रात असे ही कळविण्यात आले की, या ढोबळ अंदाज पत्रकानुसार आवश्यक ती आर्थिक तरतूद करून महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाकडून कामे करून घेण्यात यावीत किंवा वरील आर्थिक तरतूद महानगरपालिकेस प्राप्त करून दिल्यास व मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यास महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजूरी घेऊन कामे करण्यात येतील. सदर पत्रांची व ढोबळ अंदाज पत्रकांचे प्रत परिशिष्ट क पृष्ठ क्र.सी-२७ ते परिशिष्ट क पृष्ठ क्र.सी-४३ वर जोडलेली आहेत.

पदूम विभाग, आदिवासी विकास विभाग व मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने आरे कॉलनी तसेच तेथील आदिवासी पाडे, म्हशींचे तबेले, **आरे रुग्णालय इ. ठिकाणी दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजी भेटी देवून पहाणी केली. पाहणीच्या वेळी आढळून आलेल्या बाबी तसेच विभागाकडून प्राप्त झालेली माहिती या अनुषंगाने समितीने विभागीय प्रतिनिधीसंमवेत केलेल्या चर्चेच्या वेळी समितीस खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

आदिवासी पाड्यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी आरे वसाहत निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी आदिवासी हे मूळ मालक आहेत. या आदिवासी पाड्यातील आदिवासी हे जमीनीचे खरे मालक आहेत. शासनाने जरी जागा ताब्यात घेतलेली असली तरी मूळ आदिवासी हे दुसरीकडे स्थलांतरित झालेले नाहीत. आदिवासी अनाधिकालापासून त्या ठिकाणी वास्तव्य करीत आहेत. एका ठिकाणी ३० वर्षे राहिले की, संबंधित व्यक्ती आपोआप जागेचे मालक होतात, असा कायदा आहे. मूळ आदिवासी हे सन १८६० पासून त्या ठिकाणी

वास्तव्य करीत आहेत. आरेच्या परिसरातील झोपड्यांना सर्व सुविधा दिल्या जातात, पण मूळ आदिवासी मात्र अजूनही मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहे? त्यांना कोणत्याही मूलभूत सोयीसुविधा दिलेल्या नाहीत. या सर्व बाबी विचारात घेता आदिवासी पाड्यांना किती दिवसात विद्युत पुरवठा करण्यात येणार? पिण्याचे पाणी, रस्त्यांची व्यवस्था वगैरे मूलभूत सोयीसुविधांच्या संदर्भात आदिवासी विभागाने कोणते नियोजन केलेले आहे तसेच त्या ठिकाणी किती आदिवासी आहेत याचा सर्व्हे केला आहे काय अशी समितीने विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली असता आरे कॉलनीमध्ये एकूण २७ आदिवासी पाडे आहेत. त्या पाड्यांमध्ये जवळ जवळ ९८० कुटुंबे असून त्यात एकूण ४३५४ गरीब लोकांचे वास्तव्य आहे त्या ठिकाणचा सर्व्हे १९८१ ला झालेला आहे. सदर सर्व्हे आदिवासी संचालक संस्थेमार्फत केला जातो. अशी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली.

आदिवासी विकास विभागाने तेथील आदिवासींना दिलेल्या मूलभूत सोयीसुविधा तसेच सन २००८ मध्ये ठक्करबाप्पा या मंजूर झालेल्या योजनेबाबत समितीने माहिती विचारली असता विभागाने ठक्करबाप्पा योजनेंतर्गत १६ कोटी ७० लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला होता. आदिवासी पाड्यांना शौचालय, रस्ता, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी शासनाने सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रुपये २ कोटी ठक्करबाप्पा योजनांतर्गत मंजूर केले होते. शासनाकडून निधी मिळविण्यासाठी मागिल वर्षी प्रयत्न केला असता कोणत्याही प्रकारचा निधी विभागाला मिळालेला नाही, या वर्षी जिल्हा योजनेंतर्गत १ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. विद्युत पुरवठ्या संदर्भातील प्रस्ताव तत्काळ दाखल करणे आवश्यक आहे. सब स्टेशनच्या संदर्भातील प्रस्ताव महसूल व वन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. यासंदर्भात मुख्य अधिकारी शिफारस करीत असतात. आदिवासी विकास विभाग पदुम विभागाला शिफारस करीत असतो. त्यानंतर पदुम विभाग महसूल व वन विभागाला शिफारस करीत असतो. परंतु महसूल व वन विभागाने काही अक्षेप काढलेले आहेत. आदिवासी पाड्यांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासंदर्भात पाठपुरावा करण्यात आलेला आहे. यासंदर्भात बैठक सुध्दा झालेली आहे. हे काम १५ दिवसात पूर्ण होईल. अशी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली

आरे कॉलनीची ३ हजार एकर पेक्षा जास्त जमीन आहे. त्या जमीनीचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. सुरक्षा असताना सुध्दा अनधिकृत झोपड्या झालेल्या आहेत. म्हणून विभागाने संबंधित सुरक्षाअधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे. अशी समितीने विचारणा केली असता, काही सुरक्षा अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे आणि काही सुरक्षा अधिकाऱ्यांवर कारवाई सुरु आहे. सन २००७ ते २००९ या कालावधीमध्ये एकूण २५४७ झोपड्यांचे व सन २०१०-११ मध्ये १३०५ झोपड्यांचे निष्कासन केलेले आहे, अशी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली. यावर समितीने असे निदर्शणास आणले की, झोपडी एका दिवसामध्ये उभी राहत नसून अधिकाऱ्यांच्या संगणमताने झोपड्या होत आहे त्यासाठी

काही अधिकारी लाच घेतात यासंदर्भात श्री.तुकाराम धुरी यांनी ४-५ तक्रारी केलेल्या आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, आरे कॉलनी विभागात सर्व आदिवासी पाड्यांमध्ये व इतर भागात अनधिकृत झोपड्यांचा सुळसुळाट झालेला आहे. यासाठी येथील सुरक्षा अधिकारी श्री.शिरसाट व श्री.पगारे व त्याच बरोबर येथील सीईओ कारणीभूत आहेत. उदाहरण द्यावयाचे झाले तर आरे डेअरीच्या समोरच्या भागात काही दिवसापूर्वी एका आदिवासी बांधवाने शेताच्या बाजूला घर बांधले होते. त्यावेळी कार्यरत असणारे सीईओ श्री.भोसले यांनी ते तोडले होते. परंतु सुरक्षा अधिकारी श्री.शिरसाट व श्री.पगारे यांच्या आशिर्वादाने पुन्हा त्या आदिवासी बांधवाने त्याहीपेक्षा मोठे घर बांधले. आदिवासी लोक अशा प्रकारे घरे बांधतात व कालांतराने अधिकाऱ्यांना हाताशी धरुन ही घरे पक्की करुन घेतात व ७-८ लाख रुपयांना विकतात आणि पुन्हा दुसऱ्या ठिकाणी झोपडी उभारतात. तसेच, मयुर नगर युनिट क्र.२९ येथे आदिवासींच्या जागेत छोटे-छोटे अनेक दुकानांचे गाळे बांधण्यात आलेले आहेत. युनिट क्र.७ येथे ताडीची दुकाने सुरु आहेत" यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केलेली आहे ? यावर संबंधित अधिकारी यांनी माहिती देतांना सांगितले की, श्री.शिरसाट हे सुरक्षा अधिकारी आहेत. अतिक्रमणावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मध्यंतरी काही अधिकाऱ्यांना निलंबित सुध्दा करण्यात आलेले आहे. सुरक्षा अधिकारी श्री.शिरसाट यांना मध्यंतरी निलंबित करण्यात आले होते. आता त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

काही झोपड्या सन १९९५ पूर्वीच्या आहेत. त्यांच्याकडे सन १९९५ पूर्वीची कागदपत्रे आहेत. त्या झोपडीधारकांना विभागाने एनओसी दिलेली नाही आणि इतर ठिकाणी मात्र अनधिकृत झोपड्या होत आहेत. आरे दुग्ध वसाहतीमध्ये ज्या झोपड्या वसलेल्या आहेत त्या झोपड्यांचे एसआरए मार्फत पुनर्वसन करण्यात येणार आहे काय? असल्यास पुनर्वसन नेमके कोणत्या ठिकाणी केले जाणार आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, तेथील झोपडपट्टी धारकांना एनओसी दिलेली नाही त्यांचे पूनर्वसन महाविद्यालयाच्या बाजूला जी जागा आहे तेथे केले जाणार आहे. एसआरए योजनेमध्ये आदिवासी पाड्यांचा सुध्दा समावेश करण्यात आलेला आहे. एसआरएच्या माध्यमातून त्यांचे पुनर्वसन करावयाचे असल्याने मे.बामकोटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला एसआरए प्रोजेक्ट देण्यात आला होता. त्या कंपनीने दिनांक ०५.०६.२००६ रोजी शासनाकडे १० कोटी रुपयांचा भरणा केला होता. परंतु तत्कालीन सचिव यांनी सदरचा निर्णय नाकरला होता व त्याला स्थगिती दिला होती. त्यानंतर हे प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन होते. आता मुख्य सचिवांनी असे म्हटलेले आहे की, एसआरए ऐवजी एमएमआरडीए मार्फत पुनर्वसनाचे काम करण्यात येईल. एमएमआरडीए तसा प्रस्ताव सादर करणार आहे. समितीने केलेल्या सूचनांचा त्यामध्ये समावेश करुन सर्व समावेशक धोरण आखण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, तेथील आदिवासी लोक उदरनिर्वाहासाठी शेती करीत असतील, शेळी पालन करीत असतील, दुधाचा व्यवसाय करीत असतील आणि एसआरएच्या माध्यमातून त्यांचे एकाच ठिकाणी पुनर्वसन करावयाचे म्हटले तर ते लोक आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. समितीला जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "३३.६ एकर जमीन पुनर्वसनाकरिता मे.बामकोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या ताब्यात दिलेली आहे." ३३.६ एकर जमीनीवर जी घरे बांधण्यात येणार आहेत ती कोणासाठी बांधण्यात येणार आहेत? ज्या ठिकाणी या लोकांचे पुनर्वसन करणार आहात त्या ठिकाणी जाण्यास या लोकांनी नकार दिला आहे आणि त्याच ठिकाणी राहण्याची त्यांनी मागणी केली तर मग विभाग काय करणार आहे? याबाबतीत सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. याबाबत विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, या ३३ एकर जमीनीमध्ये आदिवासी पाडयांचा देखील समावेश केलेला आहे. समितीने निदर्शनास आणले त्याप्रमाणे तेथील काही लोक शेती करतात, ही गोष्ट खरी आहे. याबाबतीत आदिवासी विकास विभागाने सर्व्हेक्षण केले तर अधिक रियलीस्टीक होईल. असे आयुक्त दुग्धविकास यांनी सांगितले असता त्यावर आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी टीआरडीए मार्फत सर्व्हेक्षण करण्याबाबत शासनास कळविण्यात येईल असे सांगितले.

शासनाने आरे कॉलनीमध्ये तबेल्यांसाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. तबेल्याच्या मालकांना राहण्यासाठी आणि तबेल्यामध्ये नोकरी करणाऱ्या मजुरांना राहण्यासाठी क्वॉर्टर बांधले आहेत. त्यामध्ये तबेल्याचे मालक किंवा तबेल्यामध्ये काम करणारे मजूर राहत नाहीत. त्या क्वॉटरमध्ये दुसरेच लोक राहतात. त्या क्वॉर्टरमध्ये जे लोक राहतात त्यांचे रेकॉर्ड आहे काय? समितीला तेथील रहिवाशांनी अशी माहिती दिलेली आहे की, तेथे बाहेरचे लोक सुध्दा राहतात. तबेल्यांचे मालक म्हशींच्या धारा काढणाऱ्या मजुरांच्या खोलीमध्ये एसी बसवून देणार नाहीत. म्हशींच्या धारा काढणारे जे मजूर आहेत त्यांच्या चाळीमध्ये एसी बसविण्यात आलेले आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता यासंदर्भात डेअरी प्रशासनाकडून वेळोवेळी तपासणी केली जाते. दुग्धविकास विभागाचे अधिकारी तेथे लावलेल्या नवीन मशीन्स तसेच तबेल्यामधील म्हशींची सुध्दा मोजणी करतात. म्हशींच्या धारा काढणारे मजूर त्या क्वॉर्टरमध्ये राहतात. तबेल्याचे मॅनेजमेन्ट करणारे जे लायसेन्सी आहेत त्यांचाच तेथे वावर आहे. त्याव्यतिरिक्त इतर लोक तेथे राहात असतील तर त्याबाबत चौकशी करण्यात येईल असे दुग्धविकास विभागाचे प्रतिनिधीनी सांगितले तसेच यासंदर्भात पोलिसांना बरोबर घेऊन याचा सर्व्हे केला जाईल. असे समितीला आश्वासन दिले.

आरे कॉलनीतील अनधिकृत बांधकामासंदर्भात समितीने विचारणा केली असता अनधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. समितीने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने तातडीने पोलीस विभाग, महानगरपालिका आणि आरे प्रशासनास एकत्रित घेऊन अनधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही केली जाईल.

सदर अनधिकृत बांधकाम ऑक्टोंबर महिन्यापासून तोडण्याची कार्यवाही सुरु केली जाणार आहे. तसेच आरेच्या क्षेत्रात संरक्षक भिंत बांधली जाणार आहे. याकरिता शासनाने २० कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. आता सद्य:स्थितीत ८ ठिकाणी काम चालू असून ते प्रगतिपथावर आहे. इतर ठिकाणी सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. काही ठिकाणी खाजगी लोकांनी अतिक्रमणे केलेली आहेत, ती तोडण्याची कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येणार आहे. त्या परिसरात आता संरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे. एका-एका युनिटला कंम्पाऊंड वॉल बांधण्याच्या कामाला प्रचंड खर्च येणार आहे. असे विभागीय प्रतिनींधीनी सांगितले.

श्री.अमिन नॅन्सी यांना ॲप्रोच रस्त्यासाठी जागा दिलेली असल्याचे समितीने निदर्शनास आणून देवून सदर व्यक्तीने कराराचे उल्लंघन केले असल्यास ती जागा ताब्यात घेण्याचा शासनास अधिकार आहे काय? श्री.नॅन्सी यांच्याकडे ३५० एकर जागा आहे. अप्रोच रोड बनविणे हे त्यांचे कर्तव्य आहे? गरीब लोकांना मुलभूत सोई सुविधा दिल्या जात नाहीत आणि त्यामुळे त्यांच्याकडून त्या मोबदल्यात त्यांची १७ एकर जागा घेणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधीने ते मान्य केले.

आरे कॉलनीमधील अनेक गोदामे संबंधितांना भाड्याने दिलेली आहेत. ती ताब्यात घेतली जात नाही. यासंदर्भात काही लोकांनी कोर्टात धाव घेतलेली आहे. काही लोकांनी त्या ठिकाणी हॉटेल्स बांधलेली आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता दिनांक ८.१०.२००९ ते २०१२ पर्यंत ३ वर्षाच्या करारावर त्यांना भाड्याने गोदामे दिलेली होती. सदर गोदामाच्या जागेचे क्षेत्रफळ ३७९४ चौ.फु.इतके आहे. मुदत संपल्यानंतर काही लोकांनी ती गोदामे परत केलेली आहेत. बालाजी टेली फिल्मसकडे ४ गोदामे आहेत. त्यांनी कोर्टात धाव धेतलेली आहे. माननीय न्यायालयाने प्राधिकरणाकडे जाण्याची सूचना केलेली होती. यासंदर्भात सक्षम प्राधिकर म्हणून सदर प्रकरण उप जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केली आहेत. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी असा निर्णय घेतला की अशा प्रकारे एकूण १४ गोदामे आहेत. त्यापैकी ४ गोदामे बालाजी टेलि फिल्म्सच्या ताब्यात आहेत. बालाजी टेलि फिल्म्सने सदर गोदामामध्ये कोट्यावधी रुपयांचे इंटिरिअर केलेले आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांकडे सुनावणी झाल्यानंतर त्यांनी असा निर्णय दिलेला आहे की, "या सर्व गोदामाच्या संदर्भात निविदा काढण्यात यावी आणि जो उच्चतम देकार येईल तो बालाजी फिल्मसला लागू करण्यात यावा" असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी पदूम आदिवासी व नगरविकास विभागांच्या विभागीय सचिवांची पून्हा साक्ष घेतली सदर बैठकीत प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

आरे कॉलनीचे एकूण क्षेत्रफळ ३ हजार १६२ एकर असून तेथे ८ सिक्युरीटी ऑफीसर व ४० वॉचमन यांची नियुक्ती केलेली आहे. वेळोवेळी होणाऱ्या अतिक्रमणावर कायम स्वरुपी प्रतिबंध करण्यासाठी शासनाने

संरक्षण भिंत बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. २० कोटी रुपयांची संरक्षण भिंत मंजुरी करण्यात आली असून हे काम सध्या प्रगतीपथावर आहे. सदर भिंतीचे काम आरसीसीमध्ये केले जाते. अतिक्रमण निष्कासित करण्याचे काम आरे प्रशासनामार्फत केले जाते. सन फेब्रुवारी २०१२ पर्यंत १९०४ झोपडयांचे अतिक्रमण दूर करण्यात आले. आरे वसाहतीमध्ये सुरवातीपासून सुरक्षा रक्षक आहेत.

एवढे संरक्षण उपलब्ध असून देखील अनधिकृत झोपडयांची संख्या सतत वाढत आहे, हे पटण्यासारखे नाही. यामध्ये विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असल्याशिवाय असे होऊ शकणार नाही. अनधिकृत बांधकामे होण्यास कोणते अधिकारी जबाबदार आहेत ? शासनाचे जे अधिकारी जबाबदार असतील, त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सुरुवातीचे अनधिकृत बांधकाम तोडलेले आहे. रेती,विटा इ. बांधकामाच्या साहित्याची चोर वाटांवरून ने- आण केली जाते. सध्या टोल नाक्यांवरील वाहतूक बंद केलेली आहे. तसेच चोर वाटांवरुन होणाऱ्या वाहतुकीस बंदी घालण्यात आलेली आहे. १९९५ पूर्वीच्या ७ हजार झोपडयांना शासनाने संरक्षण दिलेले आहे. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात आतापर्यंत संरक्षण विभागातील श्रीमती शेलटकर, चीफ ऑफीसर यांना निलंबित केले आहे. सीईओ यांची चौकशी सुरु आहे. या पुढे तेथे अनधिकृत झोपडया होऊ दिले जात नाही. सन १९९५ नंतरच्या या झोपडयांचा सर्व्हे अद्याप झालेला नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एकूण ४६ ठिकाणी व १८० एकर जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. श्रीमती शेलटकर यांना निलंबित केले असून सन २०१२ पर्यत ९०४ झोपडया निष्कासित केल्या आहेत. साधारणपणे २ वर्षात २ हजार झोपडया तोडण्यात आल्या आहेत. याचाच अर्थ अनधिकृत झोपडयांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढत आहे. साधारणपणे दर महिन्याला १०० अनधिकृत झोपडया तयार होत आहेत. त्यांच्यावर विभागामार्फत योग्य कारवाई केली जात नाही. समितीने पुन्हा विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, प्रत्येक अनधिकृत झोपडीमागे आपले अधिकारी २५ ते ३० हजार रुपये घेतात. श्री.शिरसाट हे या प्रकरणामध्ये मुख्य दोषी आहेत, असे मला वाटते. दुर्गा नगर येथे १५० ते २०० झोपडया आहेत. समितीने या झोपडया दाखवून दिल्यानंतर आपण सांगत आहात की, आम्ही या झोपडया तोडतो. यापूर्वी ३ वेळा अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिंधी तथा समिती सदस्यांनी पत्र दिले होते. मात्र त्या वेळी बांधकाम तोडले गेले नाही. या संदर्भात चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे अन्यथा ३१६२ एकर जमिनीवर अनधिकृत बांधकाम होईल व ही सर्व जमीन या लोकांच्या घशात जाईल. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या परिसरातील प्रश्नांची चांगल्या प्रकारे माहिती आहे. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात त्यांनी वेळोवेळी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. तरी देखील दोषी व्यक्तींवर तसेच श्री.शिरसाट सुरक्षा अधिकारी यांच्यावर कारवाई का केली जात नाही ? यावर श्री.शिरसाठ, सुरक्षा अधिकारी यांना निलंबित केले नसून यांची चौकशी

सुरु आहे. या चौकशीस १ ते सव्वा वर्ष झाले आहे. श्री.मोरे यांना निलंबित केलेले आहे. झोपडयांचे निष्कासन करण्यासाठी विभागाने पोलीस संरक्षण मागितले आहे. सह पोलीस आयुक्त यांना २ ते ४ वेळा या संदर्भात बोलाविले होते. झोपडया तोडताना बंदोबस्तासाठी पोलीस संरक्षण मागितले जाते. मात्र बरेचदा साधारणपणे १० पैकी ३ वेळा हे संरक्षण प्राप्त होत नाही. यामुळे अतिक्रमण पाडण्यास बराच विलंब लागतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. दुर्गा नगरमध्ये दिवसाला २० अनधिकृत झोपडया बांधल्या जातात. विभागाकडे ४० सुरक्षा अधिकारी आहेत. ४६ ठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेले आहे. या ४० सुरक्षा अधिकाऱ्यांना एका -एका जागेवर जरी नेमले तरी देखील या झोपडया पुन्हा तयार होणार नाहीत. असे समितीने मत व्यक्त केले असता या ठिकाणी सन १९९५ पूर्वीच्या लोकांची काही घरे आहेत. तेथील लोकांची घरे मोडकळीस आल्यामुळे दुरुस्तीच्या नावाखाली बांधकामाचे साहित्य आतमध्ये नेले जाते. त्यांच्यावर कारवाई केली असता हे लोक तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींकडे जातात. या संदर्भात नगर विकास सचिवांकडे एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी सन १९९५ पूर्वीच्या झोपडयांच्या दुरुस्तीला परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विभागीय सचिवांच्या या उत्तरावर समितीने शासनाच्या नियमांचे उल्लंघन न करता आवश्यक असेल तेथे परवानगी देण्यात यावी, अशा स्वरुपाचे विनंती वजा पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनास दिली आहेत. सन १९९५ पूर्वीच्या झोपडयांना शासनाने संरक्षण दिलेले आहे. मात्र शासनाचे कर्मचारी एका झोपडीसाठी २५ हजार रुपये लाच घेत असल्याने त्याबाबत लोक स्थानिक लोकप्रतिनिधींकडे धाव घेतात. लोक आल्यानंतर त्यांच्या अडचणींच्या संदर्भात प्रशासनाकडे पत्र देणे हे त्यांचे काम आहे. या झोपडयांना २५ हजार रुपये घेऊन परवानगी देण्यात यावी, असे स्थानिक लोकप्रतिनिधींनी सांगितलेले नाही. कायद्याच्या अंतर्गत राहून जे काम करता येईल, त्याकरिता केवळ त्यांनी पत्र दिली आहेत. मात्र सध्या अधिकाऱ्यांकडून २५ ते ३० हजार रुपये घेऊन झोपडीच्या दुरुस्तीला परवानगी दिली जाते. खरे तर यावर अंकुश ठेवण्याची गरज आहे. अनधिकृत झोपडया वाढू न देण्याच्या संदर्भात तेथे नियुक्त केलेल्या सुरक्षा अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली गेली पाहिजे. यामुळे नवीन अनधिकृत झोपडया तयार होण्यास आळा बसू शकेल. असे समितीने आरोप केले असता त्याठिकाणी संबंधित अधिकारी जर दुरुस्तीच्या नावाखाली दोन मजल्याच्या झोपड्या किंवा अतिरिक्त झोपड्या बांधण्यासाठी परवानगी देत असतील तर त्याबाबत निश्चितपणे वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यात येईल आणि जर असे प्रकार घडल्याचे आढळून आले तर त्याला प्रतिबंध करण्यात येईल, असे विभागिय सचिवांनी सांगितले.

१९९५ नंतर ज्या झोपड्या बांधण्यात आल्या आहेत, त्याबाबत चौकशी करणार आहात काय? त्याठिकाणी १९९५ मध्ये ७ हजार झोपड्या होत्या. त्यानंतर तेथे किती झोपड्या बांधण्यात आल्या आहेत याची चौकशी कोण करणार तसेच १९९५ पूर्वीच्या झोपड्यांना संरक्षण द्यावे हे मान्य आहे, पण त्यानंतर किती

झोपड्या बांधण्यात आलेल्या आहेत याचे सर्वेक्षण कोण करणार आहे? या समितीच्या प्रश्नावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, मुंबई यांच्यामार्फत सर्वेक्षण केले जाते, असे समितीला सागण्यात आले. सदरहू परिसराची हद्द कोणाच्या अंतर्गत येते? कारण त्याठिकाणी अतिक्रमण होऊ नये म्हणून कुंपण घातले जाते, सिक्युरिटी नेमली जाते परंतु असे असतानाही त्याठिकाणी किती अतिक्रमण होत आहे, काय घडत आहे याविषयी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती मिळत नसेल आणि त्याठिकाणी लोकांनी अतिक्रमण करावयाचे आणि दुसऱ्यांनी सर्वेक्षण करावयाचे असे होत असेल तर ते योग्य नाही. आरे कॉलनीमधील जागेबाबत सांगावयाचे तर त्याची मालकी विभागाकडे असतानाही तेथे बाहेरचे लोक येऊन अतिक्रमण करतात आणि त्या संबंधातील चौकशी करण्याचे काम बाहेरच्या एजन्सीला द्यावयाचे हा कोणता नियम आहे १९९५ मध्ये ७ हजार झोपड्या होत्या आणि आता त्यामध्ये किती वाढ झालेली आहे याची माहिती विभागाकडे आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता १९९५ पूर्वी तसेच २००० पूर्वी आणि २००० नंतर किती झोपड्या बांधण्यात आलेल्या आहेत यासंबंधातील शासकीय आकडेवारी काढण्याचे अधिकार अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले आरे कॉलनीसाठी ९५ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. तेथे सुरक्षिततेसाठी गार्ड आहेत, सदरहू जागा विभागाच्या मालकीची आहे आणि असे असतानाही तेथे जर काही चुकीच्या गोष्टी घडत असतील तर त्यासंबंधातील पूर्ण कल्पना संबंधित अधिकाऱ्यांना असावयास पाहिजे या समितीच्या मताशी विभागीय सचिवांनी मान्यता दर्शवून १९९५ आणि २००० पर्यंतच्या झोपड्यांचे सर्वेक्षण झालेले आहे. तसेच २००० च्या नंतर ज्या झोपड्या झालेल्या आहेत त्याचे सर्वेक्षण विभागामार्फत करुन घ्यावयाचे आहे.

आरे कॉलनी मध्ये खाजगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याबाबत काय कार्यवाही केली असे समितीने विचारले असता साधारणपणे माननीय मुख्यमंत्र्यांनी आठ महिन्यापूर्वी आरे कॉलनी येथे भेट दिली होती.त्यावेळी तेथे जे अतिक्रमण होत आहे,त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी विभागाला पुरेसे संरक्षण मिळावे अशी विभागामार्फत मागणी करण्यात आली होती.त्यानुसार तेथे खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करता येईल काय याबाबत प्रस्ताव सादर करावा असे सांगण्यात आले होते आणि त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मात्र या अनुषंगाने जो खर्च करावा लागणार आहे, त्या बाबत वित्त विभागाने त्रुटी काढलेली असून, आता त्या अनुषंगाने सदरहू प्रस्ताव सादर केला जाईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले आरे कॉलनीतील ३१६२ एकर जागेच्या नियोजनासाठी सी.ओ.आहेत काय? ३१६२ एकर क्षेत्रामध्ये किती जणांना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे ? त्याठिकाणी खाजगी व्यक्तींना जागेचे वाटप केले आहे काय? यापूर्वी जे तबेले होते, त्यामध्ये वाढ झालेली आहे काय ?अशी समितीने विचारणा केली असाता खाजगी लोकांना कायम स्वरुपी मालकी तत्वावर वाटप करण्यात आलेले नाही तर विभागाने संस्थांना जागा दिलेली आहे म्हणजे महानंदा, म्हाडा,

कृषी विद्यापीठ, दादासाहेब फाळके प्रतिष्ठान, एम.आय.डी.सी., महानगरपालिका, पाणी पुरवठा, फिशरीज, गृह विभाग आणि दफन भूमी, केंद्र शासनाचे कुक्कुटपालन केंद्र इत्यादींना वाटप केलेले आहे.

खाजगी व्यक्तींना लिजवर लायसन्स देण्यात येते. त्यानुसार ५०० लायसन्स दिलेली आहेत. त्यामध्ये १६०० गुरांचे गोठे असून ते लायसन्स बेसिसवर आहेत. तबेल्यात वाढ झाली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले त्याठिकाणी जनावरांची धार काढणाऱ्या, त्यांची शुश्रूषा करणाऱ्या कामगारांसाठी चाळी बांधण्यात आल्या होत्या.परंतु आता त्या चाळींमध्ये ए.सी.बसविण्यात आले आहेत. हे ए.सी.कामगारांसाठी बसविण्यात आले आहेत काय? तसेच त्याठिकाणी ज्या व्यक्तींची नेमणूक करण्यात आलेली नाही अशा व्यक्ती तेथे रहात आहेत. तेथील गोठ्यांच्या संरक्षणासाठी, त्यांच्या देखभालीसाठी अनधिकृतपणे अनेक लोक रहात आहेत. या प्रश्नावर तबेले मालकांचे कुटुंब वाढल्यानंतर त्यांनी तेथील जागेचे एक्सटेंशन करुन स्वतःच्या कुटुंबियांसाठी तेथे ए.सी.बसविण्यात आलेला आहे. २० जनावरांची धार काढण्यासाठी एक माणूस आहे. तसेच साफसफाईसाठी मजूर आहेत. कारण दिवसातून दोन वेळा धार काढावी लागते. त्यामुळे नियमाप्रमाणे तेथे रहाणारा जो कर्मचारी वर्ग आहे त्यांना ज्या सोयी द्यावयाच्या, त्याप्रमाणे दिलेल्या आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी उत्तर दिले. प्रत्यक्षात मात्र त्याठिकाणी सर्व बाहेरचे लोक भाडेकरु म्हणून ठेवण्यात आलेले आहेत. तबेल्यामध्ये काम करणारी लोक तेथे रहात नाहीत. याची चौकशी किती दिवसात करण्यात येईल अशी समितीने विचारणा केली असता याबाबत पुन्हा एकदा खात्री करण्यात येईल व याबाबतीत एक महिन्यामध्ये अहवाल देण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले. येथे ३० ठिकाणी ३० युनिट असून तेथे तबेले आहेत. त्याठिकाणी काम करणाऱ्यांसाठी मोफत निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याठिकाणी प्रति महिना ७५ रुपये भाडे आकारले जाते आणि संबंधितांना जे बंगले दिलेले आहेत, त्याचे भाडे घेतले जात नाही. परंतु जर पोलीस किंवा शासकीय कर्मचारी यांना रहाण्यासाठी सदनिका दिली तर त्यांच्याकडून भाडे घेतले जाते. परंतु प्रत्यक्षात त्याठिकाणी संबंधितांचे नातेवाईक रहातात, तेथे उत्तर भारतीय लोकांनी तेथे झोपडपट्टया बांधलेल्या आहेत, त्यांना मोफत का दिले जाते? अशा प्रकारचा फरक असण्याचे कारण काय?

शासनाच्या धोरणाप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांकडून शासकीय जागेवर किंवा निवासस्थानावर राहण्याकरिता आकार आकारतो. प्रत्येक म्हशीप्रमाणे ७५ रुपये आकारणी केली जाते व त्यातून देखभाल करणाऱ्या लोकांना आरे कॉलनीमध्ये कुटुंबासह राहण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे शासनाला कृषी सहाय्य व विशेष कृषी सहाय्य योजनांतर्गत हे आरे दुग्ध प्रक्रिया व वाटप केंद्रे शासनाने बांधलेली असून शासन यामध्ये जेवढया सोयी सवलती शेतक-यांना व लघु उद्योजकांना देते त्यातून ६० टक्के फायदा शासनाला झाला पाहिजे, अशी अट असते. परंतु आता हा फायदा अतिशय कमी होत चालला असून येथून प्रक्रिया केलेले दुध खाजगी दुध वाटप केंद्रामध्ये जाऊन नफा कमाविण्याकडे जास्त कल दिसून येत आहे.

त्यामुळे शासनाच्या सोयी सवलती व जागेचा वापर करुन आपापली तुंबडी भरण्याचा उद्योजकांकडून प्रयत्न होत आहे. तसेच यातून होणारा नफा कमी का होत आहे, याची कारणे कोणकोणती असावीत यासंबंधी शासनाच्या अजून काहीही लक्षात आले नाही का? असे समितीने मत व्यक्त केले असता वसुलीच्या टक्केवारीच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केलेले आहे. हप्त्या हप्त्याने पेसे परत देण्याची सवलत दिलेली आहे. पण अजूनही पूर्ण पैसे वसूल झालेले नाहीत. ही वसुली झाल्याशिवाय त्यांना पाणी वीज व इतर सोयी सवलती देण्यात येणार नाहीत, असे वित्त विभागाने सांगितलेले आहे. त्यानुसार अपेक्षा आहे की, येत्या मार्चपर्यंत त्यांची वसूली पूर्णपणे हाईल. सध्याच्या परिस्थितीत त्यांचे सर्व कनेक्शन्स कट केलेले आहेत आतापर्यंत ८० टक्क्यांच्या वर थकबाकीची वसुली झालेली आहे.असे विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली. १९५२ पासून या निवासस्थानांमध्ये दुग्धव्यवसाय करणाऱ्या व्यक्तिना राहण्याची परवानगी दिलेली आहे. यामध्ये म्हशींना गोठा, पाणी, वीज व इतर सर्व सोयी तसेच दुध प्रक्रिया केंद्र, शीतगृह अशा सर्व सोयी शासनाने दुग्धव्यवसाय वाढीच्या दृष्टीकोनातून दिलेल्या आहेत. यामागे मुंबईकरांना सकस व ताजे दुध मिळावे असा उद्देश होता यासंबंधातील शासन निर्णयानुसार सर्व सोयी सवलती पुरविल्या आहेत. परंतु हे दुग्धव्यवसाय करणारे उद्योजक आज महाराष्ट्र शासनाला दुध देत आहेत का? तसेच, त्यांचे सकस व ताजे दुध मुंबईकरांना मिळत आहे का? हेही शासनाने तपासून पाहणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या दुधाचा दर कमी पडतो म्हणून त्यांना खाजगी रित्या दुध विकण्याची परवानगी शासनाने दिली होती, हे जरी खरे असले तरी त्यामध्ये काही टक्के दुध खाजगीरित्या विकण्याची परवानगी होती. आता शासनाच्या म्हशीच्या दुधाच्या दरामध्ये सुधारणा झाली असून हे दर या व्यावसायिकांना परवडण्यासारखे असूनही त्यांना खाजगीरित्या दुध विकून अधिक नफा कमाविण्यामध्ये जास्त रस आहे, असे समितीला आढळून आले आहे. या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना असे सांगितले की, मुंबईमध्ये दुध प्रक्रिया केंद्र, तबेले, राहण्याच्या सोयी, सर्व्हंट्स क्वार्टर्स व चाळी अशी मिळून सर्व एकूण ३० युनिट कार्यरत असून यातून शासनाला ६० टक्क्याच्या वर नफा मिळणे अपेक्षित आहे. ज्यावेळी आरे कॉलनीची स्थापना झाली त्यावेळी त्याच्या उद्घाटनप्रसंगी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु उपस्थित होते. त्यावेळची मुंबईची लोकसंख्या पाहता येथे प्रक्रिया होऊन बाहेर पडणारे दुध खूप जास्त होते, शासनाचा दुधाचा दरही खूप कमी होता. कालांतराने सहकारी संस्था आल्या. खाजगी संस्था आल्या त्या माध्यमातून आरे कॉलनीचे दुध १९७४ मध्ये मुंबई बाहेर विकण्याची परवानगी मागण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री.वसंतदादा पाटील यांच्याकडे या संस्थांचे संस्थापक गेले असता त्यांनी मुंबईबाहेर दुध विकण्याची परवानगी त्यांना काही अटींवर दिली होती. यावर समितीने या सर्व गोष्टी शासनाच्या निदर्शनास का आणून दिल्या नाहीत, असा प्रश्न विचारला असता विभागीय

सचिवांनी वेळोवेळी या सर्व गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या गेल्या परंतु त्यावर योग्य कारवाई केली गेली नाही. अशी खंत व्यक्त केली.

सन १९७४ मध्ये मुंबई बाहेर दुध विकण्याची परवानगी देण्यात आली होती. १९७४ ते २०१२ पर्यंत किती सहकारी दुध विक्रेत्यांना संधी देण्यात आली होती, इतकी वर्ष कोणत्या भावाने मुंबईत व मुंबई बाहेर एकूण किती दुध विकले याची माहिती रेकॉर्डवर ठेवली गेली नाही. शासनाने १९७४ पासून ज्या दुध विक्रेत्यांना जमीन, घर, पाणी, वीज इ. सुविधा प्रदान केल्या त्यांचे दुग्धव्यवसाय अंगिकृत होते. त्यांच्या दुग्धजन्य जनावरांना योग्य त्या सवलती व सोयी शासनाकडून प्राप्त होत होत्या. परंतु आता ते दुध विक्रेते शासनाच्या माफक दरातील सोयी सुविधा स्वीकारुन गडगंज संपत्ती कमावित आहेत. यानंतरही त्यांना सबसिडी देणे बंधनकारक आहे का? हे दुधविक्रेते महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सोयी सवलती स्वीकारुन व सबसिडीचा वापर करुन इतर भागामध्ये दुध विकून श्रीमंत होऊ पाहत आहेत. ज्यांच्या व्यवसायाचा काहीही उपयोग महाराष्ट्राला होत नाही त्यांना महाराष्ट्र शासनाने सबसिडी का द्यावयाची असे समितीने मत व्यक्त केले असता तत्कालीन शासनाने घेतलेला निर्णय त्यात बदलत्या परिस्थितीनुसार बदल घडविणे निश्चितच आवश्यक आहे ही परिस्थिती सालाबादप्रमाणे या आकडेवारीच्या आधारावर शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. असे सचिवांनी सांगून यासंदर्भात एक महिन्याच्या आत सविस्तर माहिती कळविण्यात येईल. व त्यानंतर ताबडतोब यासंदर्भात निर्णय जाहीर करण्यात येईल. असे समितीस आश्वासन दिले.

३१६२ एकर जमिनीवर किती ओरिजनल पाडे आहेत, या पाडयांमध्ये अंगिकृत व्यवसायधारक जे पूर्वीपासून राहत आहेत त्यांच्या जनावरांना, कुटूंबियांना नातेवाईकांना सबसिडाईज्ड रेटमध्ये निवासस्थान, पाणी, वीज व्यवसायिक सोयी मिळत आहेत. हे त्यांना देण्याआधी ते व्यवसायिक प्रगती पातळीवर त्याकरिता पात्र आहेत की नाहीत, हे पाहिले पाहिजे. या जागेमध्ये यासंदर्भात निवासस्थानाकरिता अनधिकृत बांधकाम केलेले आहे, त्यासंदर्भात शासनाने योग्य ती तपासणी करुन लवकरात लवकर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. यामधील रहिवाशांबाबत शासनाचे धोरण काय आहे? अशी विचारणा केली असता या ठिकाणी एकूण ३१६२ एकर जमिनीवर राहणाऱ्या आदिवासी पाडयामधील लोकांना पाणीपुरवठा, शैक्षणिक सोयी व सुविधा, वीज इत्यादि पुरविण्याकडे माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी जास्त लक्ष दिलेले आहे. या जागांवर राहून व्यवसाय करण्याकरिता पात्र लोकांना एनओसी देण्यात येणार आहे. या अनुषंगाने आतापर्यंत एकूण १८८ एनओसीज दिलेल्या आहेत. आदिवासी पाडयांमध्ये वीज देण्याकरिता शासन काय करणार आहे? समितीने असा प्रश्न विचारला असता, या आदिवासी पाडयांमध्ये रिलायन्स एनर्जी सबस्टेशन बांधणार होते. परंतु त्याकरिता त्यांनी शासनाकडे १,८७,००० रुपये मागितले होते. परंतु शासनाने ते गरीब आदिवासी बांधवांकडून मासिक देयकामधून वसूल करण्यात यावे, असे सांगितले. हे गरीब आदिवासी मासिक बिलामधून

उपरोक्त रक्कम देऊ शकत नाहीत असे सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले असता मूळ आदिवासी पाडयांमध्ये राहणारे हे आदिवासी बांधव पिढयान्-पिढया तेथे राहत आहेत. त्यांच्याकडे गुलाबी रेशनकार्ड आहे. तरीही त्यांना सबस्टेशन बांधून विजेची सुविधा देण्याकरिता शासन कार्यवाही करीत नाही. मुंबईमध्ये अनेक अनधिकृत बांधकाम झालेल्या ठिकाणी व अनधिकृत झोपडपट्टयांना शासन वीज, पाणी व इतर सुविधा देते. पंरतु या मूळ आदिवासी रहिवाशांना विजेकरिता एवढा संघर्ष करावा लागतो. या मूळ आदिवासी रहिवाशांचे सात-बाराचे उतारे असतांना तसेच, त्यांच्याकडे गुलाबी रेशनकार्ड असतांना त्यांना वीज, पाणी व रस्ते, इतर सोयी सुविधा त्यांना देण्याकरिता शासन कार्यवाही का करीत नाही? हे शासन अतिक्रमण केलेल्या लोकांना सर्व सोयी सुविधा विलंब न लावता प्रदान करते व ज्या लोकांना त्यांच्या हक्काच्या ज्या सोयी सवलती मिळावयास पाहिजे, त्या सोयी सवलती मात्र त्यांना लवकर मिळत नाहीत. मुंबईमधील अनधिकृत बांधकामे व अनधिकृत झोपडपट्टयांना सन १९९५ व २००० चे नियम लावून अधिकृत करुन त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सवलती व रेशनकार्ड देण्यात आलेले आहे. गावठाण एरिया व इतर गोष्टीही अधिकृत करुन देण्यात आलेल्या आहेत. परंतु या आदिवासी पाडयांमध्ये वीज देण्याकरिता ज्या सबस्टेशनची आवश्यकता आहे, त्याकरिता लागणारे १,८७,००० रुपये रिलायन्सला देण्याकरिता शासनाकडे निधीची उपलब्धतता नाही का? अशी समितीने विचारणा केली असता शासन या भागातही लवकरात लवकर वीज पुरवठा देण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करणार आहे. यामध्ये पवई तलावाचेही काम अंतर्भूत आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले मुंबई महानगरपालिकेने अनेक ठिकाणी विजेचे सबस्टेशन्स बांधण्याकरिता २० कोटी रुपये दिलेले आहेत. मग या आदिवासी पाडयांमध्ये सबस्टेशन बांधण्याकरिता शासनाने लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन द्यावा. याकरिता शासनाने दायित्व घेतले पाहिजे. यासंदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घेणे महत्वाचे आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता कोणत्याही जागेची मूळ मालकी ही महसूल विभागाची असते. महसूल विभागाला जमिनींबाबत सर्व निर्णय घेण्याचे मूळ अधिकार आहेत. रिलायन्स व इतर कोणीती वीज कंपनी सबस्टेशन बांधण्याकरिता जमिनीनुसार आकार ठरवित असेल तर त्यासंदर्भात महसूल विभागाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. कोणत्याही जमिनीवर सबस्टेशन बांधण्याकरिता परवानगी देण्याचा अधिकार महसूल विभागाला आहे.

विभागीय सचिवांच्या या उत्तरावर मुंबई मनपाच्या अधिकऱ्यांनी सांगितले की, सन २००९ साली मुंबई महानगरपालिकेने अपवाद म्हणून २७ आदिवासी पाडयांकरिता पाणी पुरवठा योजना मान्य केलेली आहे. या योजनेमध्ये २२ किमी लांबीची पाईपलाईन होती व १४ सक्शन टँक्स होते. सदर योजनेस ३ विभागाची एनओसी आवश्यक होती. मार्च २०१० मध्ये एनओसी मिळाली. यामुळे आरेच्या अखत्यारीत असणाऱ्या ७ सक्शन

टँक्सचे काम पूर्ण होऊ शकले नाही. अद्याप ४ सक्शन टँक्सचे काम शिल्लक आहे. तसेच २ एनओसी मिळणे देखील बाकी आहे. फोर्स १ ला जागा देण्यात आलेली आहे. मात्र त्यांच्याकडून एनओसी न आल्यामुळे जाफाचा पाडा,केलकी पाडा या ठिकाणी पाणी पुरवठयाचे काम होऊ शकलेले नाही. चित्रनगरीने देखील एनओसी देण्याचे मान्य केले होते. मात्र त्यांच्याकडून एनओसी न आल्यामुळे ४ आदिवासी पाडयांना पाणी पुरवठयाचे काम पूर्ण होऊ शकले नाही.

आदिवासींकरिता शासनाने अनेक योजना केलेल्या आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शासनाने शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत तसेच त्यांच्याकरिता शाळा, वसतिगृहे बांधली आहेत. येथील २७ आदिवासी पाडयांमधील पाणीपुरवठा व लाईटच्या सोयीकरिता कोण लक्ष देणार आहे? अशी विचारणा केली असता आदिवासी विकास विभागाने या ठिकाणी २२ शौचालये बांधली आहेत. असे आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणले त्यावेळी सन २००९ मध्ये महानगरपालिकेने पाणीपुरवठा योजनेस मान्यता दिली. त्यावेळी या योजनेचा भांडवली खर्च महानगरपालिका उचलणार असून योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च संबंधित विभागाने करावी असे ठरले होते. त्यावर समितीने मुंबई मनपा अधिकाऱ्यांना सांगितले की, आदिवासी लोकांना पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने विभागाने व महानगरपालिकेने लक्ष देणे आवश्यक आहे. सदर योजनेचा भार उचलण्यास आदिवासी विकास विभाग तयार आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता या संदर्भातील प्रस्ताव १५ दिवसात तयार केला जाईल. मात्र योजनेच्या दुरुस्तीचा अधिभार संबंधित विभागाने उचलावा. असे मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांनी सांगितले त्यावर आदिवासी पाडयांमधील लोकांना वीज व पाणी देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने दर वर्षी तरतूद केली पाहिजे. असे समितीने मत व्यक्त केले असता तरतूद करुन प्रस्ताव सादर केला जाईल. असे आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. आरे कॉलनीमधील २७ आदिवासी पाडयांना महानगरपालिके मार्फत वैद्यकीय सुविधा देण्यात याव्यात. असे समितीने सूचविले असता रुग्णालय चालविण्याचे काम राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचे आहे. आदिवासी विभागात आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची आवश्यकता आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता संबंधित विभागाला महानगरपालिकेने कळविले होते की, ही रुग्णालये महानगरपालिका चालविण्यास तयार आहे. तशा प्रकारचा प्रस्ताव तयार केला गेला आहे.या परिसरामध्ये हेल्थ पोस्ट प्लस डिस्पेन्सरीजची मागणी आहे. आरोग्य सुविधेकरिता सन २०१२ -१३ च्या बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. पुढील १ वर्षामध्ये हे काम पूर्ण केले जाईल. सध्या या रुग्णालयाची मालकी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे आहे. त्यावर समितीने महानगरपालिका आरोग्य सुविधा पुरविण्यास तयार असेल तर हे काम शासनाकडून महानगपालिकेकडे

सोपविण्यात यावे.असे सूचविले असता याकरिता पदूम विभागकडून एक आठवडयामध्ये प्रस्ताव तयार करण्यात येईल.

आदिवासी भागामधील वसतिगृहामध्ये राहण्यास विद्यार्थ्यांना पुरेशी जागा मिळत नाही. वसतिगृहे बांधण्यासाठी बजेटमध्ये तरतूद केली होती. मात्र बांधकाम झाले नाही. वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी आरे कॉलनीमध्ये जागा मिळाली काय, तसेच सदर काम कधी सुरु होणार आहे? अशी समितीने विचारणा केली असता आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या संदर्भात मुख्य सचिवांकडे बैठक झाली होती. त्यावेळी असे ठरले होते की, कलिना विद्यापीठातील जागा वसतिगृहासाठी देण्यात यावी. त्याकरिता ५ एकर जागा देण्याचे मान्य केले गेले आहे तसेच शिक्षण विभागाने देखील त्यास मान्यता दिलेली आहे.असे विभागीय सचिवांनी सांगितले. आरे कॉलनीमधील रस्त्याच्या कामाकरिता कधी टेंडर काढले जाईल ? असे विचारले असता वसतिगृहाकरिता विभागाकडून जागा दिली जाईल. रस्त्याच्या कामाकरिता अंदाज पत्रक तयार झालेले आहे. त्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाची बैठक झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली क्लिअरन्स कमिटी नियुक्त केलेली आहे. या कमिटीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविलेला आहे. सदर काम बीओटी अंतर्गत सुरु करावयाचे आहे. शासनाकडे कर्मचारी नसल्यामुळे टोल वसुलीचे काम खाजगी यंत्रणेकडे दिलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले टोल नाक्याचा कालावधी संपला आहे काय? असे विचारले असता ही निविदा पूर्वी काढली होती. त्यामध्ये असे ठरले होते की, ३ महिन्याचे मुदतवाढ देण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. नियमाच्या अधीन राहून निर्णय घेतलेला आहे. यामध्ये शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.अशी सचिवांनी माहिती दिली त्यावर पूर्वी पेक्षा आता वाहनांची संख्या बऱ्याच प्रमाणात वाढलेली आहे. ३ वर्षानंतर साधारणपणे १० टक्के वाढ होते. या रस्त्यावरुन साधारणपणे दर वर्षी ५ कोटी रुपये टोल वसूल केला जातो. खाजगी कंत्राटदार १५ ते २० कोटी रुपये दर वर्षी कमावतात.असे विचारले असता सर्वात अधिक दर देणाऱ्याला ही निविदा देण्यात आलेली आहे. असे विभागीय सचिवांनी उत्तरे दिले.

आरे कॉलनीतील गोदामासंदर्भात माहिती देतांना १४ गोदामे असून त्यातील ४ बालाजी यांच्याकडे आहेत. सदरहू प्रकरण कोर्टामध्ये गेले होते. त्याठिकाणी शासनाच्या बाजूने निकाल लागलेला असल्यामुळे आता असे ठरविण्यात आले आहे की, संबंधितांकडून गोडाऊनची मागणी करावयाची. यावर समितीने गोदामाचा वापर सामान ठेवण्यासाठी असताना प्रत्यक्षात त्याचा वापर सेट लावण्यासाठी करण्यात येत आहे. असे विभागाच्या निदर्शनास आणून प्रत्यक्षात त्याठिकाणी गोदामाचा वापर सामान ठेवण्यासाठी न करता स्टुडिओ म्हणून वापर केला जात आहे आणि १२ तासाचे एक लाख रुपये भाडे घेतले जात आहे ही बाब खरी आहे की नाही? असा प्रश्न केला असता ते खरे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले. त्याठिकाणी

गोदामाचा वापर सामान ठेवण्यासाठी न करता स्टुडिओ म्हणून केला जात असेल तर तेथील जे व्यवस्थापक आहेत, ही बाब त्यांच्या निदर्शनास कशी आली नाही त्याठिकाणी संबंधितांकडून गोडाऊनचे भाडे घेतले जाते की स्टुडिओचे भाडे घेतले जाते? त्याठिकाणी संबंधितांना प्रत्येक दिवशी ४ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. मात्र ते शासनाला किती भाडे देतात? त्याठिकाणी टेंडर काढून सेट लावले जातात. त्यावेळी संबंधितांना प्रत्येक दिवसाला ४ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. मग अशा प्रकारे शासनाला जर १५ रु.प्रति स्वे.फू. यानुसार जर भाडे मिळत असेल तर यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे असे आपल्याला वाटत नाही काय? या समितीच्या प्रश्नावर ते ज्या हेतूसाठी जागा वापरत आहेत, त्याच हेतूसाठी निविदेमध्ये उल्लेख केलेला असून त्यांच्याकडून महिन्याला पर डे १५ रु.प्रति स्वे.फीट या दराने भाडे देण्यात येते. याठिकाणी ज्या निविदा काढल्या होत्या, त्या शुटींगसाठी काढण्यात आल्या होत्या. परंतु तरी देख्ील याबाबतीत अगोदर खात्री करुन घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मा. समिती सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

आरे दुग्ध वसाहतीमधील अनधिकृत झोपड्यांवर नियंत्रण करिता सुरक्षा अधिकारी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत निष्कासन करण्यात येते. संबधित अधिकारी कामांमध्ये निष्काळजीपणा करताना आढल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई, अन्यत्र बदली याप्रमाणे कारवाई करण्यात येते. लाच घेवून झोपड्या बांधण्यास अधिकारी परवानगी देत असतील आणि तशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास सदर अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास तात्काळ निलंबन करण्यात येते, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येवून योग्य ती शिक्षा केली जाते. आरे दुग्ध वसाहतीमधील सुरक्षा अधिकारी श्री.शिरसाट यांचे विरुध्द तक्रारी असून दि.३/४/२०१२ रोजी प्रादेशिक दुध योजना औरंगाबाद अंतर्गत ही शासकीय दूध योजना भूम येथे त्यांची बदली करण्यात आली आहे.

आरे दुग्धवसाहती मधील अनधिकृत झोपड्यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ जानेवारी, २०१२ रोजी बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, दि.१ जानेवरी १९९५ पूर्वीचे रहिवांशी, १ जानेवारी १९९५ नंतरचे व सन २००० पर्यंतचे पुर्नवसन प्राप्त रहिवांशी व सन २००० नंतर व आजपर्यंतचे रहिवाशी सर्वेक्षणाचे निकष निश्चित करणेसाठी शासनाचे आदेश आहेत सदरहू सर्वेक्षण महानगर पालिका, जिल्हाधिकारी उपनगर व आदिवासी विकास विभाग व पोलिस महानिरिक्षक, फोर्स-१ यांचे माध्यमातून जॉंईन्ट गणना करण्यात यावी असे आदेश दिलेले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे. दिनांक १२/६/२०१२ च्या शासन निर्णयान्वये आरे दुग्ध वसाहतीचे सरंक्षण

करण्याकरिता मेस्को या माजी सैनिकांच्या संघटनेद्वारे १ सुपरवाझर, १० सुरक्षारंक्षक व १५ गनमॅन असे एकूण २६ सुरक्षा कर्मचारी out sourcing द्वारे भरण्यास शासन मान्यता देण्यात आली होती तथापि, मेस्को संघटनेने शासनाने मान्यता दिलेले दर व त्यांचे दर यांच्यामध्ये तफावत आढळल्याने त्यांनी सदरील प्रस्ताव नाकारला तदनंतर १३ ऑगस्ट, २०१२ च्या पत्रान्वये खाजगी सुरक्षा एन्जसीज द्वारे तातडीने निविदा मागवून दि. १२/६/२०१२ च्या आदेशातील नमूद केलेल्या दराच्या मर्यादित out sourcing द्वारे पदे भरण्याकरिता आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास त्यानुषंगाने आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. समितीने मुद्या उपस्थित केला आहे की, कायम स्वरुपी मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांची नियुक्ती किती दिवसांत करण्यात येणार आहे. सद्या श्री.रजपूत पी.के. यांच्या कडे मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे वसाहत या पदाचा अतिरिक्त कार्यभार असून ते दिनांक ३१/०८/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणार होते तथापि, त्यांची दि.११/८/२०१२ रोजी अचानक प्रकृती बिघडल्यामुळे तात्पुरता पदभार श्री.जाधव यांच्याकडे देण्यात आला आहे. पुढील महिन्यात कायमस्वरुपी मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची नियुक्ती करण्यात येईल. तबेलेधारकांना दिलेल्या निवास स्थापनामध्ये भाडेकरू ठेवले आहेत. तबेले मध्ये काम करणारे लोक तेथे राहत नाही. याबाबत चौकशी केली असता तबेले धारकांना दिलेल्या निवासस्थानामध्ये त्यांचे कुंटुब तसेच तबेल्यामध्ये काम करणारे कामगार वास्तव्यास असल्याचे आढळून आले.

समितीने दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी पदूम आदिवासी विकास, नगरविकास विभागांच्या विभागीय सचिवांची पून्हा साक्ष घेतली सदर बैठकीत प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

आरे दुग्ध वसाहतीची स्थापना सन १९४९ मध्ये करण्यात आली. आरे दुग्ध वसाहतीकरिता ३१६२.३२ एकर जमीन संपादित करण्यात आली. आरे दुग्ध वसाहतीमध्ये सद्य:स्थितीमध्ये दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या ताब्यात २०६३.११ एकर जमीन आहे. उर्वरित १०९९.२२ एकर जमीन केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांना हस्तांतरित केली आहे. मुंबई शहर स्वच्छ रहावे याकरिता जनावरांचे स्थलांतर करणे, जनावरांची देखभाल शास्त्रीय व आधुनिक तंत्रानुसार करणे, मुंबईतील नागरिकांना चांगल्या प्रतीचे दूध रास्त दराने उपलब्ध करुन देणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. सदर कार्यालयाच्या आस्थापनेवर वर्ग-१ चे दोन पद मंजूर असून ते रिक्त आहेत. वर्ग-२ ची ७ पदे असून त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत व ४ रिक्त आहेत. वर्ग-३ ची एकूण ९८ पदे असून त्यापैकी ३५ + ११ पदे (अतिरिक्त) भरलेली आहेत व ६३ रिक्त आहेत. वर्ग-४ मध्ये एकूण ११९ पदे असून त्यापैकी ७१ पदे भरलेली आहेत व ४८ पदे रिक्त आहेत. वैयक्तिक पदे मजदूर ८२ कार्यरत आहेत. सदर ठिकाणी कुक्कुट पालन, मॉर्डन बेकरी, रिझर्व्ह बँक, एन.डी.डी.बी., मे.आय.ओ.सी.लि. पेट्रोलपंपाकरिता जमीनी दिलेल्या आहेत. या सर्व संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारित येत आहेत. सध्या दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या ताब्यात २०६३.११ क्षेत्रफळ इतकी जमीन आहे.

आरे दुग्ध वसाहतीत ४६ ठिकाणी झोपडीधारकांच्या झोपड्या आहेत. अतिक्रमण रोखण्यासाठी सरहद्दीवर संरक्षण भिंत, पुनर्वसन, नवीन झोपड्यांचे निष्कासन, प्रशिक्षीत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे अशा विविध उपाययोजना केल्या जात आहेत.आरे दुग्ध वसाहतीमध्ये ४६ ठिकाणी विविध गटामध्ये सुमारे १८० एकर जमीनीवर झोपडीधारकांनी अतिक्रमणे केलेली आहेत. अप्पर जिलहाधिकारी यांनी ६७२० झोपड्यांची माहिती दिलेली आहे. शासनाने ६७२० झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय दिनांक २८ जून, २००६ रोजी घेतलेला आहे. ६७२० झोपडीधारकांचे पुनर्वसन ३३.६ एकरमध्ये करण्यात येणार आहे. शासन आदेशानुसार मे.बामको टेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी दिनांक १८.८.२००६ रोजी करारनामा केलेला आहे.

आरे कॉलनीचे ३१६२ एकर इतके क्षेत्रफळ असून या ठिकाणी होणाऱ्या अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी शासनाने संरक्षित भिंत बांधण्याकरिता रुपये २० कोटी मंजूर केलेले असल्यामुळे या कामाची सद्य:स्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, एकूण ८ कि.मी. लांबीची संरक्षक भिंत आहे. परंतु, उर्वरित ठिकाणी काही अडथळे येत आहेत. सदर कामाच्या निविदा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीमध्ये काम प्रगतिपथावर आहे. या ठिकाणी खाजगी आणि आरेची जागा असल्यामुळे अडथळे येत आहेत. त्या ठिकाणी २ कि.मी. लांबीच्या कामात अडथळा निर्माण झालेला होता. कामाचा वेग मंद आहे, सदर

काम गेल्या दोन वर्षापासून सुरु असून. हे काम एक वर्षाच्या आत पूर्ण केले जाणार आहे. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले सदर काम गेल्या ६ महिन्यांपासून बंद असल्याचे समितीने निदर्शणास आणले असता सदर काम पावसामुळे बंद असून २० कोटी रुपयांची मागणी केल्यानुसार शासनाने निधी वितरित केलेला आहे. सदर काम पुढील वर्षाच्या अखेरीस पूर्ण होणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले साक्षीच्यावेळी माहिती देतांना आयुक्तांनी संरक्षक भिंत बांधण्यासाठी कोणताही अडथळा नाही. असे सांगितले मात्र अधीक्षक अभियंता यांनी तेथे अडथळे आहेत, असे सांगितले यावरून विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यावर विभागीय सचिवांनी माहिती देतांना सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कृषी व पदूम विभागाकडे अंदाजपत्रक पाठविण्यात आले. ते अंदाजपत्रक वित्त विभागाकडे पाठवून त्यांची मंजुरी घेतली व त्या प्रमाणे निधी देण्यात आला. या कामावर बांधकाम विभागाचे नियंत्रण व देखरेख आहे. भिंत बांधण्याकरिता तेथे पूर्वी काही ठिकाणी वाद होता. पदूम विभागाच्या अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन हा वाद सोडविण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला होता. आताच आयुक्तांनी असे सांगितले आहे की, तेथे भिंत बांधण्याकरिता कोणताही अडथळा नाही. तेथे सीमांकन निश्चित करण्यामध्ये काही अडथळा असल्यास चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. सीमांकनाच्या संदर्भात विभागाकडे अद्याप तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. या पूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी बैठका घेऊन सीमांकनाचा वाद मिटवला होता. तेथे काही अडथळा असल्याची बाब बांधकाम विभागाने पदुम विभागाच्या निदर्शनास अद्याप पर्यंत आणून दिलेली नाही. खरे तर सदर कामाची गती वाढविणे हे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे काम आहे. त्यांनी या कामाची गती वाढविणे आवश्यक आहे.

आरे कॉलनीच्या हद्दीचा सर्व्हे करुन जागा निश्चित केलेली आहे काय? तसे केले असल्यास वादाचा प्रश्नच निर्माण होणार नाही. तसेच सन २००९ मध्ये ज्या कंत्राटदाराला काम दिले होते, त्याला हे काम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे काय? हद्द निश्चित करण्यात आली आहे काय? सीटी सर्व्हे प्रमाणे हद्दनिश्चित केली आहे काय? त्याकरिता शासनाने पैसे भरलेले आहेत, तसेच सदर कॉंट्रॅक्टची मुदत किती आहे? अशी समितीने विचारणा केली असता, तालुका इन्सपेक्टर लँड रेकॉर्ड (टीएलआर) यांना क्वालिटी इन्सपेक्शनकरिता ३ कोटी ३८ लाख ९० हजार रुपये देण्यात आले आहेत. सदर काम प्रगतीपथावर आहे. अद्याप येथील जागेची पूर्णपणे नोंद करण्यात आलेली नाही. वाद निर्माण झाल्यामुळे सदर काम टीएलआर यांच्याकडे सोपविले आहे. हद्द निश्चित करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात बांधकाम करताना काही वाद निर्माण झाल्यामुळे पुन्हा जागेची मोजणी करुन घेतली जात आहे. सध्या ही मुदत १ नोव्हेंबर पर्यंत असून या कराराला मुदतवाढ दिलेली आहे. आवश्यकता असल्यास यापुढे देखील मुदतवाढ दिली जाईल. अशी विभागीय

सचिवांनी माहिती देवून समितीच्या सूचनेप्रमाणे, हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असेही सांगितले.

सदर कामाच्या दर्जा संदर्भात समितीने विचारणा करुण तेथे जे बांधकाम केलेले आहे, त्याचा पाया मजबूत नाही. केवळ वरच्यावर काम सुरु आहे. कामाच्या निकृष्ठ गुणवत्तेबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी पाठपुरावा करुनही काहीही सुधारणा झाली नाही. तक्रार केल्या नंतर पाहणी करणे हे विभागाचे योग्य नाही. तेथील कामाची पाहणी करावी, अशी समितीने सूचना केली असता डेअरीच्या अधिकाऱ्यांनी व इंजिनिअर्स यांनी कामाची पाहणी केलेली आहे. तेथे काही वाद निर्माण झाल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी अधीक्षक अभियंता यांच्या समवेत एक बैठक घेतली होती. त्यावेळी हद्दीच्या संदर्भात कोणत्याही तक्रारी समोर आल्या नाहीत.

या क्षेत्रातील किती जागा खाजगी लोकांना व्यवसायाकरिता देण्यात आली व त्यापासून किती उत्पन्न मिळते ? येथील तबेल्यांमधून एकूण किती दूध मिळते व त्यापैकी किती दूध मुंबई शहराला दूध पुरवठा करण्यासाठी दिले जाते ? अशी समितीने विचारणा केली असता शासकीय व निमशासकीय स्वरुपाच्या एकूण १४ संस्थांना १ हजार १८ एकर जमीन देण्यात आली आहे. १६ हजार म्हशींच्या तबेल्याकरिता भाडे पट्टयाने जागा देण्यात आलेली आहे. सन १९७४-१९७५ या कालावधीमध्ये स्व.वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना येथील तबेल्यांवर आरेला दूध दिले पाहिजे,असे बंधन त्यांच्यावर घालण्यात आले. नंतर त्यांना सूट देण्यात आली. आता येथील तबेल्यातील दूध हॉटेलधारकांना विकले जाते. असे विभागीय सचिवांनी सांगितले. मुंबई शहराला स्वस्त दराने दूध पुरवठा करण्यासाठी सन १९५०मध्ये आरे कॉलनीमधील जागा तबेल्यांना देण्यात आली. प्रत्येक म्हशीमागे केवळ ७५ रुपये भाडे घेतले जाते. खरे तर येथे तयार होणारे दूध त्यांनी शासनाला विकले पाहिजे. मात्र ते दूध अधिक भावाने खाजगी हॉटेल व्यावसायिकांना विकले जाते. यामुळे शासनाला कोट्यावधी रुपये तोटा सहन करावा लागत आहे. या संदर्भात पुनर्विचार केला जाणार आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता या संदर्भात फेर विचार करण्यात आलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. ज्या लोकांना शासनाने भाडे पट्टयाने जागा दिली होती, त्यापैकी किती लोकांनी ती जागा इतरांना भाडे पट्टयाने दिली आहे, या संदर्भात माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तेथे ३० तबेले असून ३६७ खाजगी मालकांना जागा दिलेली आहे. या तबेल्यांमध्ये १६ हजार १६० जनावरे आहेत. प्रत्येक जनावराकरिता एका महिन्याला ७५ रुपये या प्रमाणे सुमारे १२ लाख १२ हजार रुपये एवढे भाडे स्वीकारले जाते. वर्षाला साधारणपणे १ कोटी ४५ लाख ४४ हजार रुपयांचा महसूल तबेला धारकांकडून वसूल केला जातो. ७५ रुपये हा दर सन २००४ मध्ये निश्चित करण्यात आला होता. तेव्हापासून आतापर्यंत या दरामध्ये वाढ केलेली नाही.

सरासरी प्रत्येक तबेलाधारकाला ५ एकर या प्रमाणे एकूण ३६७ तबेल्यांना जागा देण्यात आलेली आहे. या तबेल्यांमधून शासनाला काहीच फायदा होत नाही. तबेल्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना राहण्यासाठी तेथे

झोपड्या बांधल्या आहेत, अनधिकृत बांधकाम होण्याचे हे एक मुख्य कारण आहे. इतर राज्यांमधील लोक येथे कामासाठी येतात व मग तेथेच अनधिकृत वस्ती करुन राहतात. या वस्तीमधील अनधिकृत घरे तोडली काय? या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. असे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले

या ठिकाणी असलेल्या तबेल्यांच्या समोर चाळी बांधलेल्या आहेत या तबेल्यांच्या माध्यमातून शासनाला व शहरातील लोकांना काहीही फायदा होत नाही मात्र तेथे केवळ अनधिकृत झोपडपट्टी वाढीस लागत आहे. १५०० एकर जागा तबेलाधारकांना मोफत का दिली जात आहे? या बाबत शासन लक्ष देणार आहे काय ?असा समितीने प्रश्न विचारला असता तबेल्यांना जमीन देण्याबाबत शासनाचे धोरण आहे. येथील तबेल्यांमध्ये १६ हजार म्हशी असून ३६७ मालकांना जागा दिलेली आहे.शासन स्तरावर ही बाब निदर्शनास आणून दिली जाईल. तसेच या बाबत नवीन धोरण आखण्याबाबत विचार केला जाईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले मुंबईला दूध पुरवठा व्हावा हा आरे डेअरीचा प्रमुख उद्देश होता. मात्र त्या माध्यमातून शासनाला काहीच नफा होत नाही. त्यामुळे आता हे तबेले ठेवणे आवश्यक आहे काय याचा विचार करावा लागणार आहे.

तसेच मुंबई नागरिकांना चांगले व स्वस्त दरात दूध मिळावे म्हणून शासनाने जी भूमिका स्वीकारली होती त्या भूमिकेचा आज काहीही उपयोग होत नाही. शासनाला या तबेलेवाल्यांकडून दूध मिळत नाही. ते खुल्या बाजारात चढ्या दराने दूध विकतात. शासन मात्र त्यांना प्रत्येक जनावरामागे ७५ रुपये आकारुन जागा, पाणी, चारा, निवास व्यवस्था आदी सोयी मोफत देत आहे. असे समितीने निदर्शणास आणले असता आरे वसाहतीमधील तबेले वगळून इतर ठिकाणच्या तबेल्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न सुरु आहे. इतरत्र असलेले तबेले दापचरी येथे हलविण्याचा विचार झालेला आहे. कॉन्शस निर्णय घेण्यासाठी या संदर्भातील वस्तुस्थिती शासनासमोर १५ दिवसात सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी मान्य केले.

तबेल्यांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या जागेची आजच्या बाजारभावाप्रमाणे किंमत किती आहे? अशी विचारणा केली असता महसूल विभागाच्या प्रधान सचिवांनी पुढील प्रमाणे माहिती दिली ही जागा ना विकास क्षेत्रातील आहे. त्यानुसार जागेचे मूल्यांकन काढावे लागेल. जागा फार मौल्यवान आहे. एकूण १५०० एकर जागा आहे. मुळात ही जागा कशाकरिता दिली होती, आज त्या जागेचा विनीयोग कशा पध्दतीने होत आहे याबद्दल माहिती देण्यात आली आहे. मूळ आदेशाप्रमाणे या संदर्भातील सर्व वस्तुस्थिती शासनासमोर ठेवून याबद्दल कोणते धोरण असावयास पाहिजे यासाठी शासनाचे आदेश प्राप्त केले जातील. ज्या उद्देशाने जागा

देण्यात आली होती त्या दृष्टीकोनातून आज जागेचा उपयोग होत नाही याबद्दल कोणाचे दुमत नाही. त्याकरिता दुग्धविकास विभागाचे प्रधान सचिव त्यावर पदूम विभागाच्या सचिवांनी एकूण किती जागा आहे, किती जनावरे आहेत, शासनाला वर्षाकाठी महसूल किती मिळतो या माहितीसह मूळ उद्देशापासून दूर जात असल्यामुळे फेरविचार करावा असे समितीचे मत आहे याबद्दल सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्यात येईल असे सांगितले

आरे मधील जमीनीचे सब लिज करता येते का? नसेल तर ज्यांनी सब लिज केले आहे त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात? अशी समितीने विचारणा केली असता परस्पर सब लिज करता येत नाही. शासनाची परवानगी घेऊन करता येते. शासनाच्या अनुमतीशिवाय सब लिज करण्याचा त्यांना अधिकार नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले

समितीच्या भेटीच्या वेळी सब लिजबाबत विचारणा केली होती, त्यावेळी शासनाच्या माध्यमातून सब लिज करता येते असे सांगण्यात आले होते. आतापर्यंत शासनाच्या माध्यमातून किती प्रकरणात सब लिज झाले आहे? शासनाची पूर्वपरवानगी घेऊन सब लिज करता येते असे आपण सांगितले. परंतु ज्यांनी शासनाच्या अनुमतीशिवाय सब लिज केले त्यांच्याविरुध्द कारवाई केली पाहिजे. माहिती उपलब्ध नसेल तर तपासण्याची जबाबदारी कोणाची आहे? संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात? शासनाची मंजुरी न घेता सब लिज झालेले आहे काय? या समितीच्या प्रश्नांना विभागीय सचिवांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. बेकायदेशीर हस्तांतर झाले असेल तर तपासावे लागेल. तशी माहिती शासनाकडे नाही. जर सब लिज झाले असतील तर निश्चितपणे कारवाई केली पाहिजे. बेकायदेशीर हस्तांतर झालेले असेल किंवा मूळ लिजच्या ज्या आदेशातील अटीचा भंग केला असेल त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

प्रती जनावरामागे महिन्याला ७५ रुपये शासनाला उत्पन्न मिळते. तेथील म्हशींसाठी दिवसभर लागणारे पाणी मोफत वापरले जाते, तेथील जागेवर उगवणारा चारा मोफत वापरला जातो. परंतु वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे महिन्याला बिल किती येते? असे समितीने विचारले असता ७५ रुपये प्रती जनावरासाठी महिन्याला घेतले जातात. प्रत्यक्ष होणारा खर्च आणि प्रत्यक्ष मिळणारे उत्पन्न याची तुलना केली जाईल. याचा पुन्हा एकदा आढावा घेण्याची गरज आहे असे सकृत्दर्शनी वाटते. या बाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येईल. २००४ मध्ये दर निश्चित केले होते. तबेलेवाले १९४९ पासून तेथे आहेत. तपशीलात जाऊन प्रत्येकाची ग्रँट ऑफ लॅण्डची ऑर्डर तपासावी लागेल. असे विभागीय प्रतिनिधी सांगितले उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध असताना खर्चाची आकडेवारी उपलब्ध नाही हे म्हणणे योग्य नाही. मुंबई महापालिकेकडून जे पाणी घेतले जाते त्यापोटी होणारा खर्च आणि पाण्यापासून मिळणारे उत्पन्न किती हे सांगितले तरी बरेच मुद्दे स्पष्ट

होतील. अशी विचारणा केली असता यासंदर्भातील माहिती उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले असता समितीने याबाबत तिव्र नाराजी व्यक्त केली

१९९५ नंतरची अतिक्रमणे किती आहेत? १९९५ नंतरची अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे? १९९५ पूर्वीची ७००० अतिक्रमणे आहेत. पूर्वी श्रीमती शेलटकर या संबंधित अधिकारी होत्या, त्या आता निवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. त्या ठिकाणी एस.आर.ए.योजना राबविण्याचे ठरविले होते. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सर्वेक्षण करण्यात आले होते. त्याची आकडेवारी उपलब्ध झाली आहे. १९९५ पूर्वीच्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचे शासनाचे धोरण असून १९९५ ते २००० पर्यंतच्या अतिक्रमिकांचे काय करायचे याचा मुद्दा सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. एस.आर.ए.आणि म्हाडाने पुनर्वसन करायचे असे ठरले होते. परंतु त्याचा शासनाकडून निर्णय झालेला नाही. १९९५ नंतर किती झोपड्या उभ्या राहिल्या आहेत? १९९५ नंतरच्या अतिक्रमणांचे सर्वेक्षण आम्ही केलेले नाही. १९९५ पूर्वीच्या अतिक्रमणांचे सर्वेक्षण झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले आरे वसाहतीच्या परिसरामध्ये दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामे होत आहेत. समिती सदस्य तथा स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वत: पोलीस विभागाला आणि दुग्धविकास विभागाला २२ पत्रे पाठविली आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक झाली, दुग्धविकास मंत्री महोदयांसमवेत बैठक झाली, मुख्य सचिवांसमवेत बैठक झाली तरी देखील अनधिकृत बांधकामे तोडली जात नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिले असता अनधिकृत बांधकामे केली जातात हे मान्य आहे. परंतु ती वारंवार निष्कासित केली जातात. पोलीस बंदोबस्त उपलब्ध होतो त्यावेळी ती तोडली जातात. बांबू आणि प्लास्टिकच्या आधारे तात्पुरती शेड तयार केल्या जातात. अशी अतिक्रमणे काढण्याचे काम वारंवार सुरु असते. त्या परिसरामध्ये सुरक्षा पथक निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली असून सुरक्षा पथक नेमण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. सुरक्षा पथक तात्काळ नेमण्यात येईल आणि अतिक्रमणे काढण्याच्या कामास गती देण्यात येईल. आतापर्यंत ३००० पेक्षा जास्त अतिक्रमणे निष्कासित केली आहेत. तेथे सुरक्षा पथक नेमण्याबाबत पुढील दहा दिवसात प्रक्रिया पूर्ण होईल व सुरक्षा पथक नेमण्यास एक महिन्याचा अवधी लागेल. तोपर्यंत त्या परिसरात अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या ठिकाणी १८० एकरमध्ये ४६ ठिकाणी अनधिकृत बांधकामे आहेत. या संदर्भात मुख्य सचिवांबरोबर बैठक झाली होती. १८६० पासून त्या ठिकाणी जे आदिवासी पाडे आहेत त्यांचे पुनर्वसन १० एकरमध्ये करण्याच्या संदर्भात उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन विहित कालावधीत कार्यवाही करावयाची होती. त्या संदर्भात काय निर्णय झाला ? १९९५ नंतरच्या झोपडीधारकांना हटविण्यात यावे यासाठी तीन महिन्याचा कालावधी दिला होता. ही बैठक ३.१.२०१२ रोजी झाली होती. या बाबतीत काय कार्यवाही करण्यात आली?

अशी विचारणा केली असता एमएमआरडीएमार्फत पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव होता परंतु त्यांनी पुढे काही कार्यवाही केलेली नाही. तो प्रस्ताव प्रलंबित आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले किती अधिकारी आणि स्वयंसेवक आहेत आणि त्यांच्या पगारावर वार्षिक किती खर्च होतो ? आरे कॉलनीच्या सुरक्षेसाठी १ सुरक्षा अधिकारी, २ सहायक सुरक्षा अधिकारी आणि १२ सपोर्ट स्टाफ आहे. त्या ठिकाणी जास्तीत जास्त सुरक्षा रक्षक नेमण्याची आवश्यकता आहे. मंजूर पदे एकूण ५९ पदे मंजूर आहेत. सध्या ३१ कर्मचारी आहेत. स्टाफ कमी करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी खाजगी संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक घेण्यात येतील. असे विभागीय प्रतिनिधीनी मान्य केले आरे कॉलनीत दूग्ध विकास विभाग व महानगरपालिका यांचा समन्वय असल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यादृष्टीने आपल्याकडे काही यंत्रणा आहे का? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. त्या ठिकाणी शासनाची साडेतीन हजार एकर मौल्यवान जागा आहे. त्या ठिकाणी प्रशासनाने वेळावेळी म्हणावे तसे लक्ष न दिल्यामुळे अतिक्रमण वाढले आणि जवळपास १० हजार झोपड्या निर्माण झाल्या. त्या ठिकाणी निश्चितपणे सुरक्षा यंत्रणा कमी पडलेली आहे. विभागाचा असा प्रस्ताव होता की, ही सर्व जागा जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करुन जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांच्या मार्फत निष्कासन केले तर या कामाला गती येऊ शकते. १५-२० सुरक्षा रक्षकांकडून त्या जागेचे संरक्षण करणे कठीण आहे. विभागाचे अधिकारी जेव्हा कारवाई करण्यास जातात तेव्हा त्यांना मारहाण होते, धमक्या दिल्या जातात त्यामुळे त्यांचे मानसिक खच्चीकरण होते. त्यामुळे त्या ठिकाणी कोणीही अधिकारी काम करण्यास तयार नाही त्या ठिकाणी जे लोक झोपड्या बांधतात त्यांच्याकडून पैसे घेतल्याचा आरोप अधिकाऱ्यांवर होतो आणि त्यांना निलंबित करण्याची मागणी होते. त्यामुळे अधिकाऱ्याची मन:स्थिती दुर्बल झालेली आहे. ही सर्व जागा महसूल विभागाकडे वर्ग केली तर काही तरी कार्यवाही होऊ शकेल. त्या ठिकाणी साडेतीन हजार एकरचा परिसर सांभाळण्याकरिता जरी ३०-४० कर्मचारी दिले, कोणीही अधिकारी दिला, एखादा पीएसआय जरी दिला तरी ते शक्य होणार नाही. ती जागा महसूल खात्याकडे वर्ग करावी आणि जिल्हाधिकाऱ्यांमार्फत त्या जागेचे संरक्षण करावे. लैंड रेव्हेन्यू कोड प्रमाणे निष्कासनाची कार्यवाही ते व्यवस्थित करु शकतात.

त्या ठिकाणी २७ पाडे आहेत. २७ आदिवासी पाड्यांवरील आदिवासींना पाणी, वीज, रस्ते यासारख्या मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत सद्य:स्थिती काय आहे? २७ पैकी ७ पाड्यांना विद्युत पुरवठा झालेला नाही. त्या ठिकाणी विद्युत पुरवठा करण्यासाठी सब स्टेशनकरिता आवश्यक जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत महसूल विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? अशी समितीने विचारणा केली असता तेथील २७ आदिवासी पाड्यांना वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून ५ ठिकाणी सबसेंटर्सची गरज आहे. त्या सबसेंटर्सकरिता महसूल विभागाकडून जागा उपलब्ध करुन द्यावी अशी समितीची अपेक्षा आहे. त्याप्रमाणे शासनाची परवानगी घेऊन जिल्हाधिकारी महोदयांनी २३ डिसेंबर, २०११ रोजी सविस्तर आदेश पारित केलेला

आहे. त्याची एक प्रत समितीला सादर करण्यात येत आहे. त्या पाच ठिकाणी ८ मीटर बाय ५ मीटर एवढी जमीन नवापाडा, वनीचापाडा, देवीचापाडा व इतर ठिकाणी उपलब्ध करुन देण्याचे आदेश पारित केलेले आहेत. शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे ही जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्याचा अधिकार असतो. महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड ज्या वर्षापासून आपल्या राज्यामध्ये स्वीकारलेला आहे तेव्हापासून ३० वर्षापेक्षा जास्त भाडेपट्टयाने जागा देत नाही. त्यामुळे ३० वर्षासाठी जागा देण्याचे आदेश पारित केले. त्यांना ५ ठिकाणी जी जमीन देण्याचे मान्य केले आहे त्या ठिकाणी शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भाडेपट्टा आकारण्यात आलेला आहे. त्या आदेशामध्ये भाडेपट्टा कशा पध्दतीने आकारलेला आहे हे दिलेले आहे. आपल्या धोरणाप्रमाणे त्या जागेचे रेडीरेकनरचे दर काढून त्या आधारावर त्या वर्षाचा जो पीएलआर असतो, पीएलआर स्टेट बँक निश्चित करीत असते आणि तो साधारणतः बारा ते साडेबारा टक्क्याच्या आसपास असतो, त्याप्रमाणे ६२,२४८ रुपये, ६२,२८१ रुपये, १,०३,२८६ रुपये अशा पध्दतीने ५ ठिकाणचा एकूण वार्षिक भाडेपट्टा ४,०४,९१८ रुपये आकारण्यात आलेला आहे. या बाबत जिल्हाधिकाऱ्यांनी महाव्यवस्थापक, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना २३.१२.२०११ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यांनी पुन्हा जिल्हाधिकारी महोदयांना विनंती केली आहे की, ही जागा नाममात्र १ रुपया भाडेपट्टयाने देण्यात यावी. त्यांनी केलेल्या विनंतीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी ९ मे, २०१२ रोजी अपर मुख्य सचिव, महसूल यांना पत्र पाठविले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी नाममात्र १ रुपया भाडेपट्टा आकारण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केलेली आहे. शासनाकडे आज ही फाईल उपलब्ध नाही. कारण २१ जून, २०१२ रोजी लागलेल्या आगीत जे नुकसान झाले त्यामध्ये महसूल विभागाच्या अनेक धारिका नष्ट झालेल्या आहेत. परंतु ही विनंती शासनाच्या आदेशासाठी सादर करण्यात येईल. परंतु ही विनंती प्रचलित धोरणाप्रमाणे नाही. प्रचलित धोरणाप्रमाणे आपण जमीन भाडेपट्टयाने देत असतो आणि जिल्हाधिकारी यांनी जी भाडेपट्टा आकारणी केलेली आहे ती योग्य आहे. तथापि, आलेली विनंती शासनासमोर सादर करण्यात येईल. आपण ज्यावेळी शासनाच्या संस्थेला उदा. एमएसईबीला सब स्टेशनसाठी जागा देतो त्यावेळी भाडेपट्टा आकारतो. भाडेपट्टा आकारणे हे शासनाचे धोरण आहे. त्या धोरणापेक्षा वेगळा निर्णय करणे योग्य होणार नाही. तथापि, या बाबतीत शासनाचे आदेश प्राप्त केले जातील. असे महसूल विभागाच्या सचिवांनी सांगितले जागा देण्याबाबत विभागाला शासनाच्या आदेशाची गरज आहे. आता ती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. आता विभागाने जागा देण्याबाबतचे आदेशसुध्दा पारित केलेले आहेत. संबंधित कंपनीने त्या ठिकाणची जागा एक रुपया नाममात्र भाड्याने देण्याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे. संबंधित कंपनीने केलेली मागणी ही शासनाच्या प्रचलित धोरणाच्या विपरित आहे. अशा प्रकारची कार्यवाही केली जात नाही. शासनाच्या अंगीकृत असलेल्या एमएसईबीला देखील जमीन भाडेपट्टा आकारुन दिली जाते. या विषयाच्या संदर्भातील नस्ती मंत्रालयाला लागलेल्या आगीत जळालेली असली तरी सुध्दा ती

तत्काळ रिकन्स्ट्रक्ट केली जाणार आहे. जागा देण्यासाठी महसूल विभागाकडून आदेश अपेक्षित होते, ते आता पारित झालेले आहे. एखाद्याला भाडे पट्टयाने जमीन दिल्यानंतर पुन्हा त्याला ती जमीन हस्तांतरण करता येणार नाही, गहान ठेवता येणार नाही किंवा विक्री करता येणार नाही. त्यांना दिलेली जमीन ही त्याच कामासाठी वापरली पाहिजे, अशा प्रकारच्या अटी व शर्ती त्यामध्ये नमूद केलेल्या आहेत. संबंधित कंपनीने एक रुपया नाममात्र दराने जागा मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे. यामध्ये रेडी रेकनरप्रमाणे जमीनीचा दर निश्चित करावा लागतो. संबंधित कंपनीची एक रुपया नाममात्र वार्षिक भाडे असावे, अशी विनंती आहे. याबाबत सामितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले की, अशा प्रकारची मागणी रिलायन्स कंपनीने केलेली आहे. त्यांना त्या ठिकाणी केबल्स टाकावी लागणार आहे. आदिवासींना विज देण्यासाठी त्या ठिकाणी सबस्टेशन ऊभारण्याची गरज आहे. याकरिता ४ लाख ४ हजार ९९८ रुपये भाडे आकारण्यात येणार आहे. ही रक्कम आम्ही भरली तर ती कोणाकडून वसूल करणार, असा रिलायन्स कंपनीचा प्रश्न आहे. आदिवासी बांधवांकडून एवढे भाडे वसूल करणे शक्य होणार नाही. कारण त्यांच्याकडे उदरनिवार्हाचे कोणतेही साधन उपलब्ध नाही. आदिवासी बांधवांच्या विजेच्या बिलातून ती रक्कम वसूल करायला गेले तर ते शासनाची विजच नको असे देखील म्हणण्याची शक्यता नाकारता येत नाही. आदिवासींना विज देण्यासाठी शासनाने मानवतावादी दृष्टीकोन समोर ठेवण्याची गरज आहे. आरे कॉलनीमधील आदिवासी बांधवांचे त्या ठिकाणी वर्षानुवर्षे वास्तव्य आहे. ४ लाख ४ हजार ९९८ रुपये भाडे आदिवासी बांधव देऊच शकणार नाहीत. अशा वेळेस शासनाने मानवादीदृष्टीकोन समोर ठेऊन आदिवासी बांधवांना विज देण्याची भूमिका घेतली पाहिजे,असे समितीने मत व्यक्त केले असता आदिवासी विभागाच्या सचिवांनी आदिवासींना वीज आणि पाणी पुरवठा हा केलाच पाहिजे. असे मत मांडले त्यासंदर्भात महसूल विभागाच्या सचिवांनी या विषयाच्या संदर्भात आदिवासी विभागाकडून पत्रव्यवहार केलेला नाही. मात्र सन २०१२ मधील जिल्हाधिकारी यांच्या पत्राची एक प्रत विभागाकडे आहे. याबाबत समितीचे मत शासनासमोर ठेवण्यात येईल. अदिवासी लोकांना त्यांचा फायदा होणार आहे. समितीने आदिवासींना विज देण्याबाबत मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार व्हावा, अशा प्रकारची आग्रहाची मागणी केलेली आहे. यासंदर्भात लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. जागा देण्याबाबतचे आदेश निर्गमित झालेले आहेत. फक्त भाडेपट्टा १ रुपया असावा की, नियमाप्रमाणे असावा एवढाच मुद्दा प्रलंबित राहिलेला आहे.

यासंदर्भात मा.पदूम मंत्री महोदयांनी दिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, रिलायन्स कंपनीला ३० वर्षाच्या भाडेतत्वावर जमीन देण्याच्या संदर्भातील निर्णय झालेला असून, यासाठी दिनांक १९-१०-२०११ नुसार महसूल व वन विभागाकडे आवश्यक ती जमीन प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता आदिवासींना विज देण्याबाबत कोणतही अडचण राहिलेली नाही. त्या ठिकाणच्या आदिवासींना उदरनिर्वाहाचे कोणतेही

साधन नाही. आदिवासी बांधवांना ४ लाख ४ हजार ९९८ रुपये भाडे एवढी रक्कम भरण्याची ऐपत नाही. ते इलेक्ट्रीकचे बिल भरु शकतील. त्यांना विज मिळावी एवढी त्यांची माफक मागणी आहे. शासनाने त्यांच्याप्रती मदतीचे धोरण अवलंबिले पाहिजे. यासंदर्भात समितीने निर्णय घेण्याची गरज आहे. असे समितीने निदर्शनास आणून या संदर्भातील प्रस्ताव लवकर शासनाकडे पाठवून कार्यवाही करावी असे महसूल विभागास सूचित केले असता सदर ठिकाणच्या महसूल विभागाच्या सचिवांनी त्यास मान्यता दर्शविली २७ आदिवासी पाड्यांवरील आदिवासींना पाणी, वीज, रस्ते यासारख्या मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे? या समितीच्या प्रश्नावर मुंबई मनपाच्या अधिकाऱ्यांनी पुढील माहिती दिली मुंबई महानगरपालिकेने २७ आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा देण्यासाठी सन २००९ मध्ये एक योजना मंजूर केली होती. यामध्ये २१ कि.मी.ची पाईपलाईन आणि १४ सक्शन टँक बांधावयाचे आहेत. त्या माध्यमातून २७ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा होण्यास मदत होणार आहे. २१.८६ कि.मी.पैकी १९.१९ कि.मी. इतके काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित २.६६ कि.मी.चे काम पूर्ण करण्यासाठी चित्रनगरी आणि फोर्सवनची एनओसी घ्यावयाची आहे. परंतु ते काम प्रलंबित राहिलेले आहे. १४ सक्शन टँक पैकी ११ सक्शन टँकचे काम पूर्ण झालेले आहे. ३ सक्शन टँकचे काम चित्रनगरी आणि फोर्सवनची एनओसी प्राप्त न झाल्यामुळे प्रलंबित राहिलेले आहे. यामध्ये २७ आदिवीस पाड्यांपैकी १० आदिवासी पाड्यांना तत्काळ पाणी पुरवठा करता येऊ शकतो. यामध्ये पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर त्याचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च संबंधित विभागाने करावा, असे निर्देश मागील समिती प्रमुखांनी दिले होते. देखभाल दुरुस्तीचे नियोजन झाले तर १० आदिवासी पाड्यांना तत्काळ पाणी पुरवठा सुरु केला जाऊ शकतो. उर्वरित ११ आदिवासी पाड्यांना ३ महिन्यात पाणी पुरवठा सुरु केला जाऊ शकतो. उर्वरित ६ आदिवसींना पाणी पुरवठा करण्याबात एनओसी मिळण्याचे बाकी आहे. यासंदर्भात आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी TRDI, पुणे यांच्या मार्फत सर्व्हेक्षण करण्याचे अपेक्षित होते. त्यांचे सर्व्हेक्षण झाल्यानंतर एनओसी द्यायला आमची कोणतीही हरकत नाही. तसेच यासंदर्भात अधिक माहिती मुंबई महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून घ्यावयाची असल्यामळे सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे एनओसी देण्यात आलेली नाही. यासंदर्भात विभागाने पाठपुरावा केलेला आहे काय? असे समितीने विचारले असता या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. २७ आदिवासी पाड्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे काम TRDI, पुणे या संस्थेकडून केले जाणार आहे. सदर संस्थेने सर्व्हेक्षण करण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे वित्त विभागाकडे यासंदर्भातील नस्ती पाठविलेली आहे. परंतु, वित्त विभागाने यामध्ये काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे कामास विलंब लागत आहे. सदर सर्व मुद्यांचे निराकरण झाल्यानंतर निधी मंजूर हातेच पुढील कार्यवाही नियमानुसार केली जाणार आहे.

२७ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा व्हावा याकरिता मुंबई महानगरपालिकेने बजेटमध्ये २० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यानंतर पाईपलाईन टाकलेली आहे. आदिवासी हे आरेच्या वसाहतीत वर्षानुवर्षे रहात आहेत. केतकीपाडा एक, केतकीपाडा दोन आणि चाफ्याचा पाडा हे पाडे फोर्सवनच्या अखत्यारित येतात. उर्वरित आदिवासी पाडे हे चित्रनगरीच्या हद्दीत येतात. मुंबई महागनरपालिकेच्या माध्यमातून त्या ठिकाणी पाईपलाईन टाकलेली आहे. तसेच सबस्टेशन देखील बांधण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी पम्पींगची व्यवस्था कोण करणार हा प्रश्न आहे. ११ आदिवासी पाड्यांना किती दिवसात पाणीपुरवठा केला जाणार आहे ? यामध्ये २० कोटी महानगरपालिका खर्च करणार आहे. त्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन टाकलेली आहे. फोर्सवनने एनओसी देण्याची गरज आहे. जर एनओसी देत नसेल तर त्यांना स्टॅण्ड पाईप तरी देण्याची गरज आहे. असे केले तर त्या ठिकाणी आदिवासी बांधव पाणी भरु शकतील. या गोष्टीला देखील आडकाठी केली जाते.

आदिवासींना सुविधा देण्यासाठी जवळ जवळ दोन वर्षाहून अधिक काळ गेलेला आहे. तरी देखील त्यांना सुविधा मिळत नसतील तर हे काही बरोबर नाही. त्या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेचे २० कोटी रुपये हे पाण्यात गेल्यासारखे होणार आहे. ११ ठिकाणी किती दिवसांच्या आत पाण्याची लाईन चालू करणार? पाण्याचे परीरक्षण, मेंटेनन्स मुंबई महानगरपालिका करणार आहे काय? असे समितीने विचारले असता मुंबई महानगरपालिकेने पाणीपुरवठ्याची योजना पूर्णत्वास नेलेली आहे. यामध्ये देखभाल दुरुस्तीचा खर्च हा आदिवासी विभागाकडून केला जाणार असे दिनांक २८ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या साक्षीत निश्चित झाले होते. त्यानंतर मे महिन्यात मुंबई महानगरपालिकेने संबंधित विभागाबरोबर पत्रव्यवहार केलेला होता. १० गावांना ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा करावयाचा आहे. याकरिता आदिवासी विभागाने देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याची गरज आहे. अन्य ११ आदिवासी पाड्यांना पुढील तीन ते चार महिन्यात पाणीपुरवठा करता येऊ शकेल. त्याचा देखील देखभाल व दुरुस्तीचा खर्च आदिवासी विभागाने केला तर १० आदिवासी पाड्यांना तत्काळ आणि ११ आदिवासी पाड्यांना पुढील चार महिन्यात पाणी मिळणार आहे. या मुंबई महानगरपालीकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरानुसार सर्वेक्षण करताना ही बाब महानगरपालीकेच्या निदर्शनास का आली नाही. तसेच कोणतेही काम सर्व प्रकारच्या एनओसी घेतल्याशिवाय सुरु केले जात नाही. काम सुरु केल्यानंतर एखादी एनओसी न मिळाल्यास केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता असते. या बाबी समितीने निदर्शनास आणले असता सन २००९ मध्ये ही योजना मंजूर झाली होती. या योजनेकरिता महानगरपालिकेने एकदाच भांडवली स्वरुपाचा खर्च करुन पाणी पुरवठा योजना सुरु करावी व तेथील एका स्वयंसेवी संस्थेने योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च करावा. सदर योजना तयार करताना आरे कॉलनीची व इतर २ एनओसीची आवश्यकता होती. आरे कॉलनीकडून ताबडतोब एनओसी प्राप्त झाली. यामुळे २१ पाडयांना पाणी पुरवठा करण्यासाठी सक्शन टँकचे काम पूर्ण झाले. पाणी पुरवठा योजनेमुळे २१ आदिवासी पाड्यांना पाणी मिळाले आहे. केवळ या

योजनेच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. योजना सुरु करण्यापूर्वी या बाबत पूर्ण कल्पना होती. ३ एनओसींची आवश्यकता होती. त्यापैकी आरे कॉलनीकडून लवकरात लवकर एनओसी मिळाली व २१ आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्याची योजना पूर्ण झाली. फोर्स वन व चित्रनगरी यांच्या एनओसी लागेल याची पूर्ण कल्पना महानगरपालीकेला होती. योजना सुरु झाल्यानंतर या सर्व एनओसी मिळतील अशी ग्वाही तत्कालीन अधिकाऱ्यांनी दिल्यामुळे योजनेच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मागील वेळी असे सांगण्यात आले होते की, येत्या ३ महिन्यामध्ये एनओसी मिळवण्याकरिता विचार केला जाईल. यावर आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी साधारणपणे १ कोटी रुपये खर्च करुन गावांना पाणी पुरवठा केला जातो. या २७ पाड्यांमध्ये किती आदिवासी लोक राहतात ? येथे पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेने करावी. असे मत मांडले असता या योजनेची मूळ जबाबदारी कोणी घेतली होती, योजना सुरु करताना देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याबाबत काय निश्चित करण्यात आले होते? अशी समितीने विचारणा केली असता सन २००८-०९ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकरामुळे आदिवासी पाडयांमध्ये पाणी पुरवठा योजना राबवण्याचे ठरवण्यात आले. या योजनेनुसार २१ किमी.ची पाईपलाईन तयार करावयाची होती. ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसल्यामुळे ज्यांच्याकडे सदर जागेची मालकी होती, त्यांच्याकडून एनओसी मिळवणे आवश्यक होते. सदर योजना कार्यान्वित करण्यात आली, त्यावेळी असे ठरविण्यात आले होते की, महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा योजनेचा भांडवली खर्च केला जाईल व देखभाल दुरुस्तीचा खर्च श्रमिक मुक्ती संघटना या नोंदणीकृत संस्थेमार्फत केला जाईल. देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याबाबत संस्थेने लिहून दिले होते ? मात्र या योजनेचा संपूर्ण देखभाल दुरुस्तीचा खर्च या संस्थेला करता येणार नाही, असे महानगरपालिकेला कळवले ही संस्था कधी नोंदणीकृत झालेली आहे? या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेबाबत एखादा प्रश्न निर्माण झाला तर त्याबाबत कोणावर जबाबदारी निश्चित केली जाईल?

ही संस्था आदिवासी पाड्यांमधील काही लोकांनी तयार केली असून त्यांनी सुरुवातीला योजनेचा देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याचे मान्य केले होते. मात्र योजना सुरु झाल्यानंतर या संस्थेने माघार घेतली. या बाबत नोंद घ्यावी लागेल. यापुढे काय करावे, याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. आदिवासी भागामधील तरुणांनी श्रमिक मुक्ती संघटना नावाची एक संस्था सुरु केली होती. पाणी पुरवठा योजनेचा खर्च ही संस्था पेलू शकत नाही. ज्यावेळी या संस्थेने देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्याची तयारी दर्शवली होती, त्यावेळी त्यांना किती खर्च येईल या बाबत कल्पना नव्हती. संस्थेवर काही कारवाई केली जाणार आहे काय? श्रमिक मुक्ती संघटनेला ही जबाबदारी स्वीकारता येत नसेल तर त्याकरिता आदिवासी विकास विभागाने मदत करावी, असे अंदाज समितीच्या मागील बैठकीमध्ये सांगण्यात आले होते. आरे कॉलनीच्या हद्दीमध्ये एकूण २७ पाडे आहेत. शासनाने ही जागा आरे कॉलनीला दिलेली आहे. आरे कॉलनीला पाणी पुरवठा केला जातो.

यामुळे येथील लोकांना मुलभूत सेवा सुविधा पुरवण्याची जबाबदारी आरे कॉलनीने घ्यावयास हवी होती. त्यांनी ही जबाबदारी न स्वीकारल्यामुळे ती महानगरपालिकेकडे सोपवण्याचे ठरवले. त्यावेळी महानगरपालिकेतर्फे योजनेचा भांडवली खर्च करण्याचे ठरले. आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याने त्यांनीच ती सांभाळली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता ही जबाबदारी महापालिकेची असल्यास ती निश्चितपणे सांभाळली जाईल. त्यावेळी जे लिहून देण्यात आले होते, ते मी आपल्याला सांगू इच्छितो. २७ आदिवासी पाड्यांमध्ये योजना सुरु केल्यानंतर त्याच्या परिरक्षणाची संपूर्ण जबाबदारी प्रत्येक पाड्यामधील पंचायतीने करण्याचे मान्य केले होते. त्याकरिता त्यांचे सेल्फ गव्हर्नन्स आहे.असे मुंबई महानगपालिका आयुक्तांनी सांगितले आयुक्तांचे म्हणणे मान्य आहे. मात्र आता सध्या ही संस्था खर्च स्वीकारण्यास तयार नाही. पिण्याचे पाणी पुरवठा करण्याच्या कामाला आपण प्राधान्य दिले पाहिजे. खरे तर ही संस्था सक्षम नसताना त्यांच्यावर योजनेच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी आपण का सोपवली? असा समितीने प्रश्न उपस्थित केला असता आयुक्तांनी त्यावेळी सदर संस्थेने असे लिहून दिले होते की, आम्ही जबाबदारी घेण्यास तयार आहोत. यामुळे त्यांचे विधान ग्राह्य धरुन योजनेला परवानगी देण्यात आली. असे मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी सांगितले.

यासंदर्भात समितीच्या मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आदिवासी विकास विभागाने अंमलबजावणी करावी असा निर्णय झाला होता. त्यावेळी झालेला निर्णय अंमलात आणावा. म्हणजे या प्रश्नाबाबत चर्चा करण्याची गरज नाही. त्या निर्णयानुसार आदिवासी विकास विभागाने १५ लाख रुपये दिलेले आहेत. उर्वरित रक्कम सुध्दा आदिवासी विकास विभागाने द्यावी. असे समितीने सुचित केले असता आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी आदिवासी विकास विभागाने २७ आदिवासी पाड्यातील पंपांचे प्रचालन करणे यासाठी ४० लाख रुपयांची तरतूद केली होती व त्यातून १५ लाख रुपये दिलेले आहेत हे मान्य केले

३ कि.मी.ची पाईपलाईन टाकून झाली आहे. त्यासाठी लाखो रुपये खर्च झाला आहे. यासाठी फोर्स-१ एरियाच्या बाहेरच्या बाजूला पाण्याची टाकी बांधावयाची असून दोन ठिकाणी स्टॅण्ड पोस्ट करायचे आहेत. त्यासाठी फोर्स १ विभागाने परवानगी देणे आवश्यक आहे. परंतु त्यांच्याकडून त्या परिसरात कोणत्याही ॲक्टिव्हीटीज करण्यास अनुमती दिली जात नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता फोर्स-१ हा हाय सुरक्षाएरिया आहे. त्या परिसरात ७३ आदिवासी पाडे आहेत. तेथे १९९५ पर्यंतचे आणि १९९५ ते २००० पर्यंतचे अधिकृत आणि अनधिकृत असे २५० झोपडीधारक आहेत. त्यांना एनओसी देणे म्हणजे सगळ्याच लोकांना आपण अधिकार देत आहोत असे होईल. या लोकांचे सर्वेक्षण तीन मुद्यांवर व्हायचे आहे. १८६० ते १९९५, १९९५ ते २००० आणि २००० नंतरचे आदिवासी व बिगर आदिवासी कोण आहेत याची छाननी व्हायची आहे. आदिवासी संशोधन व विकास संस्था या विशेष संस्थेकडे याचे उत्तरदायित्व देण्यात आले आहे.

फोर्स-१ सुध्दा त्यापासून दूर जाऊ इच्छित नाही. हे काम झाले नाही तर सर्वजण एकाच तराजूमध्ये येतील. आम्ही जागेचे मालक आहोत, आमचे सुध्दा उत्तरदायित्व आहे. एनओसी दिली तर जे हक्कदार नाहीत त्यांना अधिकार मिळतील. जे अधिकृत आहेत त्यांचे पुनर्वसन होणार आहे. परंतु ज्यांना अधिकार नाही त्यांना पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न झाला तर त्यांना अधिकार प्राप्त होईल. म्हणून फोर्स-१चे म्हणणे आहे की, एकदा सर्वेक्षण पूर्ण करावे. असे फोर्स-१ च्या अधिकाऱ्यांनी सांगितले त्यावर आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी आदिवासी संशोधन व विकास संस्थेला आम्ही सूचना दिल्या होत्या, त्यानुसार त्यांनी या कामासाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तो प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला आहे. तो प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सर्वेक्षण करता येईल. ही बाब महसूल विभागाशी संबंधित आहे. सर्वप्रथम महसूल विभाग आणि मुंबई महापालिका यांच्यामार्फत वास्तव्य निश्चितीकरण व्हावयास पाहिजे. त्या भागात जे लोक राहतात त्यांचे वास्तव्य महसूल विभाग आणि मुंबई महापालिका यांनी निश्चित करावयाचे आहे. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी पुढील प्रमाणे भूमिका मांडली फोर्स-१ कडून एनओसी मिळण्याबाबतचा मुद्दा आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमणे) यांनी सर्वेक्षण पूर्ण केले आहे. दिनांक २३.८.२०१२ च्या पत्रान्वये त्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे अहवाल सादर केला आहे. झोपडीधारकांची यादी, झोपडयांचा स्थितीदर्शक नकाशा इत्यादीसह हा अहवाल दिलेला आहे. २९२ अतिक्रमित बांधकामे असून त्यात मुख्यत: २४७ निवासी, ३ अनिवासी, संयुक्त ३, गोठा १ अशा प्रकारच्या बांधकामांचा समावेश आहे. या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी (अतिक्रमणे) व सक्षम प्राधिकारी, मालाड यांनी पुरावा सादर करण्यासंबंधी संबंधित झोपडीधारकांना कळविले होते. मात्र कोणताही पुरावा संबंधितांनी सादर केलेला नाही. सर्वेक्षणाचे व्हिडिओ चित्रीकरण केलेले आहे. २९२ झोपडीधारकांपैकी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार १.१.१९९५ पर्यंतची अर्हता गाह्य धरुन २५ झोपडीधारक संरक्षित होत आहेत असे कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात पदूम विभागाच्या सचिवांनी सांगितले की, फोर्स-१ बाबत एक महिन्यापूर्वी मुख्य सचिवांनी एक बैठक घेतली होती. फोर्स-१ ची जागा सुरक्षिततेच्या दृष्टीने सेन्सिटिव्ह आहे. सर्वेक्षण करण्याबाबत आणि पुनर्वसन कसे व कुठे करता येईल याबाबत सुचविले होते. फोर्स-१ च्या बांधकामामध्ये कोणतीही अडचण येणार नाही या दृष्टीने महसूल विभागाने सर्वेक्षण करावे असे सांगितले होते. तेथील तीन पाड्याबाबत सर्वेक्षण करावे असे सांगितल्यामुळेच सर्वेक्षण करुन अहवाल दिला आहे.

जमीन मालक म्हणून एनओसी देताना तेथील आदिवासी पात्र आहेत किंवा नाहीत हा मुद्दा नसून २७ आदिवासी पाड्यांचा रेकॉर्ड महसूल विभागाकडे आहे. त्यामुळे जेव्हा स्वतंत्र नळ कनेक्शन देऊ किंवा स्टॅण्ड पोस्ट देऊ तेव्हा पात्र किंवा अपात्र याची पडताळणी होणार आहे. या तीन आदिवासी पाड्यांमध्ये काही

आदिवासी आहेत, ते महसूल विभागाच्या रेकॉर्डवर आहेत. पात्रतेचा विषय हा जेव्हा स्टॅण्ड पोस्ट किंवा कनेक्शन्स देणार आहोत तेव्हा उपस्थित होणार आहे. निव्वळ एनओसी देण्याकरिता सर्वेक्षणाची आवश्यकता नाही. नळ कनेक्शन्स देताना शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे पडताळणी करुन कनेक्शन्स देण्यात येतील. दुसरा विषय असा होता की, सन्माननीय सदस्य म्हणतात तसे स्टॅण्डपोस्ट फोर्स वनच्या हद्दीबाहेर आहे. परंतु जवळपास ५०० मीटर पाईपलाईन फोर्स वनच्या हद्दीतून जात असल्यामुळे त्यांची एनओसी आवश्यक आहे. महानगरपालिकेला असे वाटते की, प्रत्येक आदिवासी पात्र आहे की नाही हे एनओसी देताना तपासण्याची आवश्यकता नाही. पुढील पडताळणी संबंधित जल खात्यामार्फत करता येईल. असे मुंबई महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्यांनी सांगितले असता अतिरिक्त आयुक्त यांनी यामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न येतो. एकदा सर्वेक्षण होऊन त्याचा रिपोर्ट आल्यानंतर एनओसीच्या बाबतीत नक्की विचार करण्यात येईल. असे निदर्शनास आणले त्यानंतर जिल्हाधिकारी यांना २७ पाडे रेकग्नाईज केलेले आहेत. त्यामध्ये अधिकृत, अनधिकृत याची संख्या थोडी कमीजास्त होईल पण जे अधिकृत असतील त्यांना पाणीपुरवठा द्यावयाचा आहे. त्यासाठी पाईपलाईन गेली पाहिजे. त्याकरिता सर्व्हेची गरज नाही. आता ते एनओसी देऊ शकतात. वैयक्तिक कनेक्शन देत असताना ते बघतील. त्यावर या बाबतीत फोर्स वनचे अधिकारी आणि जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका यांनी आठ दिवसात निर्णय घ्यावा आणि या पाईपलाईनच्या बाबतीत मार्ग काढावा. प्रश्न पाईपलाइ्रन पुरता आहे. आठ दिवसामध्ये पाईपलाईनच्या बाबतीत निर्णय घ्यावा आणि त्याबाबत समितीला कळवावे. असे सूचित केले

मुंबई महानगरपालिकेकडून आदिवासी पाड्यातील हेल्थ पोस्ट डिस्पेन्सरीजचे काम पूर्ण झाले आहे काय, सदर रुग्णालयाची मालकी राज्य शासनाची होती ते काम शासनाकडून महानगरपालिकेकडे सोपविण्यात आले आहे काय, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला? या समितीच्या प्रश्नावर मुंबई महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्यांनी पुढील माहिती दिली आरेमध्ये जे २७ आदिवासी पाडे आहेत त्यांच्याकरिता सध्या एका फिरत्या वाहनामार्फत आरोग्य सेवा दिली जाते. त्या ठिकाणी वेळोवेळी हेल्थ कॅम्प घेण्यात येतात. सन्माननीय सदस्य नुकत्याच झालेल्या हेल्थ कॅम्पला उपस्थित होते. या आदिवासी पाड्यांना कायमस्वरुपी आरोग्य सेवा देण्याकरिता आरोग्य केंद्र बांधण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने मंजूर केला आहे आणि या अर्थसंकल्पामध्ये त्याकरिता ५८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. लवकरच त्याचे टेंडर काढून या आर्थिक वर्षात बांधकाम सुरु करण्यात येईल. एस्टिमेट करण्याचे काम जवळजवळ पूर्ण झाले असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. आरोग्य केंद्र शाळेच्या प्रांगणामध्ये बांधण्यात येणार आहे ती महानगरपालिकेची जागा आहे. आरोग्य केंद्र बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता आवश्यक होती. आयुक्तांची मान्यता मिळालेली आहे. अर्थसंकल्पीय तरतूद झालेली आहे. या वर्षी काम सुरु होईल.

आरे कॉलनीमध्ये एकूण किती गोदामे आहेत व ती कोणाकोणाला, कोणत्या दराने, केव्हा व कोणत्या वापराकरिता दिली आहेत व ज्या वापराकरिता देण्यात आलेली आहेत त्याच कारणाकरिता वापरली जातात काय? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता एकूण १७ गोदामे आहेत. सर्व गोदामे निविदा काढून पाच वर्षाच्या मुदतीवर भाड्याने दिलेली आहेत. ज्या कारणासाठी गोदामे दिली त्याच कारणासाठी वापरली जातात का? ते चित्रीकरणासाठी वापर करु शकतात. गोदामाचा त्या वेळचा दर १५ रुपये प्रती चौरस फूट होता. त्या ठिकाणी चित्रीकरणासाठी एका दिवसाला १ लाख रुपये घेत असल्याची बाब निदर्शनास आणली त्यावेळी नवीन टेंडर मागविले आहेत.

यापूर्वी ती गोदामे भाड्याने ५ वर्षाकरिता दिलेली होती. त्यानंतर ते हायकोर्टात गेले. माननीय मंत्री महोदयांच्या स्तरावर सुनावणी घेतली. या संदर्भात टेंडर नोटीस काढण्यास सांगितले. जी टेंडर नोटीस काढली त्यामध्ये ७० ते ७५ रुपये प्रमाणे भाडे आलेले आहे. अवैध व्यवसाय सोडून इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येईल असे म्हटले आहे. निविदेमध्ये चित्रीकरणासाठी वापरावे किंवा नाही याबाबत काहीही म्हटलेले नाही. निविदेमध्ये ती अट नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. आताच्या जनरल ऑक्शनमध्ये प्रती चौरस फूट ७५ रुपये म्हणजे पाचपट दर आलेला आहे. आता निविदा काढत असताना फक्त चित्रीकरणासाठी निविदा काढावी लागेल. आता त्यांची टर्म संपलेली आहे. यासाठी निविदा काढली होती परंतु ते परत कोर्टात गेले आणि त्यांनी कोर्टाचा स्टे घेतलेला आहे. आता निविदा काढून चित्रीकरणासाठी जास्त रेट जावला जाईल असे नमूद करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. एखाद्या कामासाठी जागा भाड्याने दिल्यानंतर ती जागा दुसऱ्या कामासाठी वापरता येते का? असा समितीने प्रश्न केला असता त्यामध्ये कोणत्या कारणासाठी जागा दिली असे म्हटलेले नाही. कोणालाही टेंडर भरण्याची सवलत आहे. चित्रीकरण करावयाचे असेल तर ते करता येईल. आर्ट स्टुडिओ काढता येईल. त्या ठिकाणी कोणता व्यवसाय करावा असे अटी व शर्तीमध्ये नमूद केलेले नाही. पुन्हा जे टेंडर काढले त्यामध्ये कोणतीही अट व शर्त घातलेली नाही. त्यामध्ये 'कोणत्याही कारणास्तव' असा उल्लेख केला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले त्यावर समितीने त्या ठिकाणी चित्रनगरी आहे. तेथील स्ट्रडिओमध्ये ज्या दराने आकारणी केली जाते तशा पध्दतीने आपल्याला आकारणी करता येईल. एखादी व्यक्ती फायदा करुन घेत असेल तर त्यातून शासनाचा फायदा करुन घेणे आपले काम आहे.

असे समितीने निदर्शणास आणले समितीचे मत लक्षात घेऊन या बाबत फेर निविदा काढून चित्रीकरण असेल तर सध्याचा जो दर आहे त्याच्या दुप्पट दर लावला जाईल असे नमूद करण्यात येईल बालाजी टेलिफिल्म यांचे टेंडर फायनल झालेले नाही. त्या ठिकाणी शुटींग होणार असेल तर दुप्पट दराने पैसे आकारण्यात येतील असे नमूद करण्यात येईल त्यावर समितीने ही शासनाची जागा आहे. ती जागा लोक एका

कारणासाठी भाड्याने घेतात आणि दुसऱ्या कारणासाठी वापरुन प्रचंड फायदा करुन घेतात. यातून शासनाचे उत्पन्न बुडते. त्यामुळे दुप्पट आकरणी हे गणित होऊ शकत नाही. प्रत्यक्ष ज्या कारणासाठी जागा वापरत असतील त्याचा विचार करुन जे योग्य असेल त्याप्रमाणे पैसे घ्यावेत. असे सूचित केले असता फिल्मसिटीमध्ये जे दर असतील त्याप्रमाणे दर आकारण्यात येतील. असे विभागीय सचिवांनी मान्य केले.

आरे कॉलनीतील रस्त्यांवरील टोल वसुलीच्या ठेक्याची मुदत माहे जानेवारी, २०१२ पर्यंत असल्याने याबाबत पुन्हा बीओटी तत्वावर निविदा काढण्यात आलेल्या आहेत काय? याबाबत विभागीय सचिवांनी पुढील माहिती दिली बीओटीच्या संदर्भात हाय पावर कमिटी आहे. त्या समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येईल. २७ किलोमीटर अंतर्गत रस्ते समाविष्ट केलेले आहेत. आता ज्या निविदा काढलेल्या आहेत त्यामध्ये दुरुस्ती सुध्दा त्यांच्याकडेच ठेवलेली आहे. त्या ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरु केलेले आहे. दुरुस्तीचे काम अधिक गतिमान करण्यात येईल. चीफ इंजिनिअरकडून सर्व कार्यवाही पूर्ण झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील पायाभूत समितीची मंजूरी घेण्याचे काम बाकी आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून वेळोवेळी पाठपुरावा केला जात आहे. आरे मार्केटमध्ये एकूण किती गाळे आहेत व ते किती कालावधीकरिता कोणाकोणास भाड्याने दिले आहेत? गाळे धारकांकडून किती भाडे आकारले जाते ज्या गाळे धारकांना गाळे दिलेले आहेत, ते स्वतः चालवित आहेत की, त्यांनी दुसऱ्याला भाड्याने दिलेली आहेत ? प्रत्येक गाळे किती स्के.फु.चे आहेत आणि त्यांना कोणता दर लावलेला आहे? अशी समितीने विचारणा केली असता आरे मार्केटमध्ये एकूण १५ गाळे आहेत. हे सर्व गाळे भाड्याने दिलेले आहेत. यामध्ये गाळे धारकांकडून वेगवेगळ्या प्रकारे भाडे आकारण्यात येते. यामध्ये कमीत कमी ३९८ ते ३ हजार ५०० रुपये भाडे आकारले जाते. ज्यांना गाळे दिलेले आहेत, ते स्वतःच चालवित आहेत. यामधील गाळे हे ५० चौ.फुटापासून २०० चौ.फुटापर्यंतचे गाळे आहेत. त्यासाठी वेगवेगळे दर निश्चित करण्यात आले आहेत. कोर्ट मॅटर सोडविण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले जात आहेत. गाळे धारकांकडून जास्तीत जास्त महसूल शासनाला कसा मिळवून देता येईल यादृष्टीने प्रयत्न केला जात आहे. १५ गाळेधारकांपैकी ७ ते ८ गाळेधारकांनी कोर्टात धाव घेतलेली आहे. संबंधित गाळे धारक हे गेल्या २० ते २५ वर्षापासून त्या ठिकाणी भाड्याने गाळे चालवित आहेत. आता त्यांनी भाड्याच्या संदर्भात कोर्टात धाव घेतलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता मार्केट दरानुसार त्यांच्याकडून भाडे वसूल करण्याबाबत विचार करावा, अशी समितीची सूचना करून मार्केटमधील १५ गाळ्यांची वस्तुस्थिती समितीसमोर आलेली आहे. मार्केटच्या बाहेर देखील अनेक उपाहारगृहे आहेत. त्यांची मुदत संपलेली आहे काय ? त्यांच्या अटी व शर्तीमध्ये बदल केला जाणार आहे काय ? असे विचारले असता यामध्ये अनेक प्रकरणे ही कोर्टात प्रलंबित आहेत. यासंदर्भात बैठका घेऊन आयुक्त आणि सीओंना सूचना दिलेल्या आहेत. कोर्ट मॅटर निकालात काढून शासनाच्या तिजोरीत जास्तीत जास्त महसूल

कसा जमा होईल यादृष्टीने कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. येत्या महिन्याच्या आत हा प्रश्न निकालात निघणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले त्यावेळी त्या ठिकाणी जाहीरातीसाठी किती फलक लावण्यात आलेले आहेत?

रॉयल पामचे फलक कोणी लावले आहेत? रॉयल पामने रोडवर देखील जाहीरातीचे फलक लावलेले आहेत, यासंदर्भात कोणती कारवाई केली जाणार? अशी विचारणा केली असता रॉयल पामला त्या ठिकाणची जागा ही २५ ते ३० वर्षांसाठी भाडे तत्वावर दिलेली असून, त्यांनी भाड्याच्या जागेवर फलक लावलेले आहेत.मात्र रोडवर फलक असेल तर ते तत्काळ काढून टाकण्याची कार्यवाही केली जाईल. सदर कारवाई १५ दिवसांच्या आत अनधिकृतपणे लावण्यात आलेले सर्व फलक तत्काळ काढून टाकण्याची कारवाई केली जाईल.त्यावर समितीने सूचना केली की, सचिवांनी यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेण्याची गरज आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांना समज देण्याची गरज आहे. अनधिकृत फलक ताबडतोब काढून टाकण्यात यावे. त्यासंदर्भातील अहवाल समिताला देण्याची कार्यवाही करावी असे सूचित केले. आदिवासी पाड्यांचा सर्वे हा १९८१ मध्ये करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा सर्वे करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? या प्रश्नावर आदिवाशी विकास विभागाच्या सचिवांनी २७ आदिवासी पाड्यांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी आदिवासी विकास व संशोधन संस्था, पुणे यांना कळविण्यात आले आहे. महसूल विभाग व मुंबई महानगरपालिकेच्या मार्फत आदिवासींचे वास्तव्य निश्चित करण्याची आवश्यकता आहे. असे सांगितले असता सर्व्हेचे काम ताबडतोब सुरु केले जाणार आहे.

एसआरए योजनेमध्ये आदिवासी पाड्यांचाही समावेश करण्यात आला आहे काय? एसआरएच्या माध्यमातून किती आदिवासी लोकांना घरे देण्यात आलेली आहेत? या समितीच्या प्रश्नावर यामध्ये आदिवासी पाड्यांसाठी एसआरएची कोणतीही योजना नाही. २००५ मध्ये एक योजना कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले होते, पण शासनाने त्याला स्थगिती दिलेली आहे. अशी सचिवांनी माहिती दिली. ठीक आहे. सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पामध्ये गोरेगाव आरे वसाहतीमधील आदिवासीकरिता किती रकमेची तरतूद करण्यात आली होती व त्यापैकी किती खर्च करण्यात आला आहे? अशी विचारणा केली असता सन २०११-२०१२ मध्ये आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील आदिवासी पाड्यांना १६ विकास कामाकरिता एकूण ९२ लाख रुपयांची विकास कामे करण्याकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे दुग्ध वसाहत, गोरगाव यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात २ कोटींची ठक्करबाप्पा योजनेंतर्गत एकूण ४१ कामापैकी २९ कामे पूर्ण झालेली आहत. उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. सन २००९-२०१० मधील ६ अपूर्ण कामे एनओसी मिळाल्यानंतर पूर्ण करण्याची कार्यवाही केली जाईल. असे आदिवासी विभागाच्या सचिवांनी सांगितले आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांकरिता

वसतीगृहासाठी कलीना येथे ५ एकर जागा देण्यात आली आहे काय, वसतीगृह बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणी केली असता आदिवासी विभागाला वसतीगृह बांधण्यासाठी पदुम विभागाकडे ५ एकर जागेची मागणी केली होती. पदुम विभागाने ती मान्य केलेली आहे. जागा ताब्यात घ्यावयाची आहे.असे आदिवासी विभागाच्या विभागीय सचिवांनी सांगितले त्यावर गेल्या वर्षी आदिवासी विभागाने आरेकडे मागणी केली होती. त्याला तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार आहे. संबंधित विभागाकडून १५ दिवसांच्या आत प्रस्ताव पाठविला जाईल असे पदूम विभागाच्या सचिवांनी सांगितले आदिवासीं पाड्यांना काही अडचणी आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता आरे कॉलनीतील आदिवासी पाड्यांना शौचालये, रस्ता, पाणीपुरवठा देण्याबात अनेक अडचणी येत आहेत. असे आदिवासी विभागाच्या सचिवांनी सांगितले असात आदिवासी बांधवांना ये-जा करण्यासाठी रस्ता नाही. त्या ठिकाणी आदिवासी बांधवांना वाघांची जास्त भिती वाटत आहे. कारण वाघ कोणत्याही क्षणी येऊन कोणालाही घेऊन जाईल हे काही सांगता येत नाही. त्यामुळे त्यांना ये-जा करण्यासाठी पाऊल वाटा देण्याची गरज आहे. याकरिता निधीची गरज भासणार आहे. शौचालये उभारण्यासाठी आणखी निधीची गरज भासणारर आहे. विजेचे दिवे लावण्याची सोय करावी लागणार आहे. असे स्थानिक लोकप्रतिनिधी तथा समिती सदस्यांनी निदर्शनास आणले असता सन २०११-२०१२ मध्ये आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील आदिवासी पाड्यांना १६ विकास कामाकरिता एकूण ९२ लाख रुपयांची विकास कामे करण्याकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे दुग्ध वसाहत, गोरगाव यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. आदिवासी पाड्यांमधील १६ विकास कामाकरिता एकूण ९२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. असे आदिवासी विकास विभागाच्या विभागीय सचिवांनी मान्य केले.

दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीतील आश्वासीत मुद्द्यांसंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

आरे वसाहतीच्या सरहद्दीवर बांधण्यात येणारी संरक्षक भिंत :-

आरे दुग्ध वसाहतीच्या सरहद्दीवर संरक्षण भिंत बांधण्याकरिता दिनांक ९ मार्च, २००९ च्या शासननिर्णयान्वये रु.१९,६०,९५,६००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रु.३,३८,९०,०००/- जमीनीच्या सर्वेसाठी नगर भूमापन अधिकारी मालाड, गोरेगाव, विलेपार्ले व मुलुंड यांचे नावे दिनांक ३ मार्च, २०११ रोजी रक्कम भरणा करण्यात आली आहे. त्यांचेकडून आरे दुग्ध वसाहतीतील सरइद्दीवर असलेल्या जून्या खांबाच्या आधारे दुग्ध वसाहतीची हद्द दाखवण्यात आलेली आहे. परंतु काही ठिकाणी हद्द निश्चितीची कार्यवाही सूरू आहे. संरक्षण भिंत बांधण्याकरिता आता पर्यत एकूण रु.९५४.५० लक्ष उपलब्ध झाले असून सुमारे ८.५ कि.मी चे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

आरे कॉलनीच्या जागेचे संरक्षण करण्यासाठी करण्यात आलेली अधिकारी/कर्मचारी नियुक्ती :-

सदरील जागेवर नियंत्रण ठेवण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे वसाहत, आरे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्या या पदावर श्री.अशोक जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुरक्षेसाठी १ साहाय्यक सुरक्षा अधिकारी व २ अन्वेषक असे वर्ग ३ चे केवळ तीनच कर्मचारी व १५ पहारेकरी उपलब्ध आहेत. आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी दुग्ध शाळेतील अतिरिक्त संवर्गातील एकूण १०० दुध वाटपी (वर्ग-४) सुरक्षेच्या कामाकरिता उपलब्ध करून दिले असता त्यातील काही कर्मचारी सेवा निवृत्त झालेले आहे. आहेत तर काही अतिरिक्त संवर्गातून बदलून गेले आहेत. सद्यःस्थितीत मुख कार्यकारी अधिकारी, आरे कार्यालयाच्या सुरक्षा विभागाअंतर्गत केवळ ४२ दुध वाटपी कार्यरत आहेत.

आरेची जागेचे शासकीय निमशाससकीय व खाजगी संस्थांना वितरण :-

अ) आरे दुग्ध वसाहतीमध्ये एकूण ३२ शासकीय निमशासकीय व खाजगी संस्थांना १०९९.२२ एकर जागा देण्यात आली आहे. (सोबत यादी जोडण्यात आली आहे.) सदर जागेकरिता प्राप्त होणारे महसूल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे मार्फत वसूल करण्यात येते.

ब) आर.एम.सी.प्लॅन्टसाठी ५ खाजगी संस्थांना एकूण ३०,८०० चौ.मी.जागा ३ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्यात आली आहे. त्यापासून शासनास रु.२,९६,४४,५३६/- इतके वार्षिक उत्पन्न प्राप्त होते. (सविस्तर तपशील जोडण्यात आला आहे.)

क) एकूण १३ व्हेंडारस्टॉल खाजगी लोकांना देण्यात आले असून त्यापासून प्रतीमहा रु.२९,५५०/- व वार्षिक रु.३,५४,६००/- महसूल प्राप्त होते. (सविस्तर तपशिल सोबत जोडण्यात आला आहे.)

ड) एकूण ३० गटात ३६७ खाजगी परवाने धारकांना १६,१६० जनावरांनाकरिता खिळे वाटप करण्यात आले आहेत. त्यापासून रु.७५ प्रती जनावर प्रतीमहाप्रमाणे भाडे आकारण्यात येते. त्यापासून प्रतीमहिना रु.१२,१२,०००/- व वार्षिक रु.१,४५,४४,०००/- एवढा महसूल प्राप्त होतो. सदरी खिळ्यांच्या भाडे वाढीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

इ) परवाने धारकांना एकूण २०४.१४ एकर पॅरागवत प्लॉट भाडेपट्ट्याने देण्यात आले असून रु.४,५००/- प्रती एकर प्रती वर्ष प्रमाणे रु.९,१९,५७५/- एवढा महसूल प्राप्त होतो.

ई) आरे दुग्ध वसाहतीमध्ये चेक नाका, अवलोकन स्थळ, शेण खत, व्यापारी गाळे, गोदामे ईत्यादी ठेका पध्दतीने ३ ते ५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर देण्यात येतात त्यामुळे शासनास वार्षिक रु.११,७७,९९,९८३/- महसूल प्राप्त होतो (सविस्तर तपशिल सोबत जोडण्यात आला आहे.)

उ) आरे दुग्ध वसाहतीमध्ये ज्यांना शासनाने जागा भाडे पट्ट्याने दिली आहे त्यांनी इतरांना सबलिजवर जागा दिली आहे काय? याबाबत प्रत्येक्षात पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर सुरु

आहे. सद्य: १० गटात पाहणी केली असता २ जणांवर निष्कासनाची कार्यवाही करून जागा शासनाच्या ताब्यात घेण्यात आली आहे. उर्वरित गटात पाहणी सुरु आहे गट क्र.१६ ते २१ येथील चौकशी करण्यात येत आहे. अनियमितता आढळल्यास संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. (आरे दुग्ध वसाहतीतील उत्पन्न व खर्चाची माहिती सोबत जोडण्यात येत आहे.)

आरे दुग्ध वसाहतीमध्ये सन १९९५ नंतरचे अतिक्रमण निष्कासनाकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी आरे वसाहत, आरे कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे. सन २००७ ते २००९ मध्ये एकूण २,५४७, झोपड्यांची व सन २०१०-२०११ मध्ये एकूण १३०५ झोपड्यांचे तसेच सन २०१२ मध्ये आतापर्यंत एकूण १३६४ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे. तसेच अतिक्रमण करणारे एकूण २५ जणांवर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

खाजगी सुरक्षा रक्षकांची (outsourcing द्वारे) नियुक्ती करण्यास शासन आदेश क्र. एएमसी-२०११/प्र.क्र.३/पदूम-१० दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ अन्वये मान्यता देण्यात आली येईल.(सोबत प्रत जोडली आहे.)

सन २००५ नंतरचे झोपड्यांचे सर्व्हे अद्याप करण्यात आलेले नाहीत. आरे दुग्ध वसाहतीमध्ये एकूण २७ आदिवासी पाडे असून सदर आदिवासी पाड्यातील आदिवासी व बीगर आदिवासींचा खालील वर्गीकरणाच्या आधारे सर्व्हे आदिवासी विकास विभागामार्फत करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत ठरले आहे.

१) १ जानेवारी, १९९५ पूर्वीचे रहिवाशी

२) १ जानेवारी, १९९५ नंतरेच व २००० पर्यंतचे पुनर्वसनासाठी पात्र रहिवाशी

३) २००० नंतर ते आजतागायतचे अतिक्रमण

या प्रकरणी आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा, आदिवासी विकास विभाग, पोलिस महानिरिक्षक, फोर्स वन यांचे मार्फत विविध पुराव्यांच्या आधारे संयुक्तपणे गणना करण्याचे ठरविले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

आरे वसाहतीमधील गोदामे :-

आरे दुग्ध वसाहतीमध्ये एकूण १७ गोदामे असून त्यापैकी १२ गोदामे खालील व्यक्तींना ५ वर्ष कालावधीसाठी चित्रीकरण /स्टोरेज करिता भाडे तत्वावर दिले आहेत.

१) शिसपाल सिंग जसरोटीया गोदाम क्र.१

२) हेमाशिष स्टुडिओ गोदाम क्र.५

३) मे.लिडींग एज मार्केटींग प्रा.लि.गो.क्र.७,५ मे.लक्ष्मी प्लॅस्टीक गोदाम क्र.६,९,१०,१२,१३,१४,१५ व गट क्र.४ येथील एक गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबत अद्याप शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही, १ गोदाम मे. भारत पेट्रोलियम यांना गॅस सिलिंडर साठविण्याकरिता शासन मान्यतेने देण्यात आले आहे. (तक्ता जोडण्यात आला आहे.)

आरे कॉलनीतील टोल वसूली :-

आरे कॉलनीतील रस्त्यावरील टोल वसूलीच्या ठेक्याचे मुदत संपल्याने मे.संतोष कन्स्ट्रक्शन, परभणी यांना १ वर्ष कालावधीसाठी किंवा शासनाने बी.ओ.टी. ऑपरेटरची नेमणूक करेपर्यंत जे आधी घडेल ते या कालावधीसाठी देण्यात आलेला आहे. आरे कॉलनीतील रस्त्यावरील टोल वसूलीचा ठेका बी.ओ.टी.तत्वावर देण्यात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

आरे मार्केटमधील गाळे :-

आरे मार्केटमध्ये एकूण १५ गाळे आहेत (सविस्तर तपशिल सोबत जोडण्यात आलेला आहे.)

आरे दुग्ध वसाहतीत लावण्यात आलेले जाहिरातीचे फलक :-

जाहिरातीसाठी लावण्यात आलेली सर्व फलक काढून टाकण्यात आल्यामूळे सद्य:स्थितीत त्या ठिकाणी जाहिरातीचा एकही फलक नाही.

आरे वसाहतीमधील झोपड्यांचे पुनर्वसन :-

आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवसी पाड्यांसाठी एस.आर.ए.ची कोणतीही योजना नाही. आरे दुग्ध वसाहतीतील झोपड्यांचे पुनर्वसन शासन निर्णय दिनांक २८ जून, २००६ अन्वये ३३.६ एकर जागेवर करण्याकरिता मे. बामकोटेक प्रा.लि.यांना जमीन हस्तांतरीत करण्यात आली होती पण शासनाने त्यास स्थगीती दिलेली आहे. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० ऑगस्ट, २०११ रोजी

झालेल्या बैठकीत त्यांनी निर्देश दिले की एम.एम.आर.डी.ए. ला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देवून त्यांचे मार्फत सदर झोपड्यांचे पुनर्वसन करावे. मे. बामकोटेक लि.यांचेकडे पुनर्वसनाचे काम सोपविले होते. त्यांचेकडून त्यासाठी रु.१० कोटी एवढी अनामत रक्कम देखील शासनाने घेतली होती. करिता याबाबतीत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेवून मे. बामकोटेक प्रा.लि. यांच्याकडून

घेतलेली अनामत रक्कम रु.१० कोटी मे. बामकोटेक लि.यांना परत करावी लागेल व डी.सी.आर.३३ (१०)-३.११ अंतर्गत एम.एम.आर.डी.ए. मार्फत पुनर्वसन करण्यात येईल.

आदिवासी मुलांमुलीकरिता शासकीय वस्तीगृह :-

आदिवासी मुलामुलींचे शासकीय वसतीगृहाकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प बोरिवली यांचेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तथापि, काही मुद्द्याबाबत शासनाने उलट टपाली खुलासा विचारला आहे. खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी

(१) गोरेगांव (पुर्व), मुंबई येथील आरे कॉलनीसाठी शासनाने एकूण १२८७ हेक्टर (३१६२ एकर) जमिन संपादीत केली असून सदर जमिन पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या काही संस्था व इतर संस्थांना शासनाने ४३० हेक्टर जमिन दिलेली आहे. उर्वरित जमिन पदूम विभागांच्या अंतर्गत आहे. कृषी विभागातंर्गत पॅराग्रास व सकस वैरणीची २३२ हेक्टर वर लागवड करुन मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यात येत आहे. दुग्ध वसाहतीत ५०० ते ५५० जनावरांची क्षमता असलेले ३० गोठे आहेत. हे गोठे ३६७ परवानाधारकांना भाडेतत्त्वावर देण्यात आले आहेत. या ३० गोठ्यात १६१६० जनावरे ठेवण्यात आली आहेत. एकूण १३९७ निवासस्थानापैंकी ८५९ निवासस्थाने परवाना धारकांना देण्यात आली आहेत ४४८ निवासस्थाने शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना देण्यात आली आहेत. इतर ९० निवास्थाने रिक्त आहेत.

आरे कॉलनीमध्ये मुंबई शहरात दूधाची गरज भागविण्यासाठी म्हशींचे संगोपन करण्यासाठी शासनाने तबेल्यांना जागा दिली. यावेळी शासनाने तबेलेधारकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्या. नाममात्र भाड्याच्या किंमतीत जागा, जनावरांसाठी मूबलक पाणी, चारा, निवासस्थान इ. सोई उपलब्ध करुन दिल्या त्या मोबदल्यात तबेलेधारक शासनाला एक म्हशीचे रु.७५/- एवढे भाडे प्रतिमहिना देतात. तबेलेधारकांना प्रत्येकी ५ एकर प्रमाणे ३६७ तबेलल्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांनी चाळी बांधाल्या आहेत. मालकांनी बंगले बांधले आहेत तर परराज्यातील लोक त्या ठिकाणी अनधिकृत झोपड्या बांधून राहतात असे असतांना **ज्या उद्देशाकरिता शासनाने तबेलेधारकांना जमिनी दिलेल्या आहेत. तो उद्देश बाजूला झाला असून ते तबेलेधारक आता शासनाला दूध पूरवठा न करता खाजगीरित्या दूधाचा व्यवसाय करुन मोठ्या प्रमाणावर नफा कमवित आहेत आणि सूविधा सवलती मात्र त्याच घेत आहेत. त्यामूळे शासनाचे फार मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने त्या जमिनी तात्काळ ताब्यात घेणे आवश्यक होते. तसेच त्यांच्या सोई-सुविधाबाबत पूनर्विचार करण्याची आवश्यकता होती. मुबईतील अतिशय मौल्यावान जागा अशा प्रकारे तबेलेधारकाच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे काय याबाबत शासनाने फेर विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे व या जागेचा शासनाला अन्य कारणासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(२) आरे दुग्ध वसाहतीकरीता शासनाने ३१६२ एकर जमीन सन १९४९ पासून राखून ठेवली असून ही जमीन मुंबई शहराच्या लगत असल्याने अतिशय मौल्यवान आहे. या जमिनीचा ताबा हा पदूम

विभागाकडे असून त्याची देखरेख आयुक्त दुग्धविकास यांच्या आखत्यारिमध्ये आहे व त्याकरिता आवश्यक असणारी संरक्षण व्यवस्था व पहाणी, अंमलबजावणी ही त्यांच्या मार्फतच केली जाते. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी लेखी स्वरुपात दिलेल्या महितीच्या अनुषंगाने समितीने या दुग्ध वसाहतीस भेट देवून प्रत्यक्ष स्थळी पहाणी करतांना असे निदर्शनास आले आहे की, आरे दुग्ध वसाहतीमधील ४६ ठिकाणी सुमारे १८० एकर वर झोपडी धारकांनी अतिक्रम केलेले आहे. त्यापैकी या ठिकाणी १९९५ पूर्वी ६७२० झोपड्या बांधण्यात आलेल्या आहेत व १९९५ पासून आजतागायत हजारो झोपड्या अनधिकृतपणे बांधण्यात आल्या आहेत. वास्तविका पाहता सदरहू जागा ही शासनाची असली तरी त्याकडे संबंधित अधिकाऱ्याने पुर्णत: दुर्लक्ष केले असल्याने या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर अनधिकृत झोपड्या बांधण्यात आल्या आहेत. परिणामी पुर्वीच्या झोपड्यांना संरक्षण दिल्यामुळे आता त्यांना (SRA) झोपडपट्टी पुनर्वसन योजना अंतर्गत घरे बांधून देणे शासनावर बंधनकारक झाले आहे. १९९५ नंतरही आजतागायत दररोज अनिधिकृत झोपडपट्टया संबंधित अधिकाऱ्यांच्या संगणमताने / गैरमार्गाने निर्माण होत आहेत. दिवसेंदिवस या झोपडपट्टया वाढतच असल्यामुळे त्याठिकाणी अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. याकरिता १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाले असून शासकीय नियमाप्रमाणे या झोपडपट्टयांना संरक्षण देऊन नियमित करण्यात आलेल्या आहेत. मात्र सन १९९५ नंतर देखील त्या ठिकाणी झोपडपट्टया झाल्याचे सचिवांनी साक्षीच्यावेळी ही बाब मान्य केली आहे ही अतिशय गंभीर बाब असून **सन १९९५ नंतर निर्माण झालेल्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण संबंधित विभागाकडून सहा महिन्याच्या आत करुन सर्व अनधिकृत झोपडपट्टया तातडीने निष्काषित करण्यात याव्यात व यापूढे एकही झोपडपट्टी वा अन्य मार्गाने अतिक्रमणे होणार नाही, याची जबाबदारी आयुक्त दुग्धविकास व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) आरे दुग्ध वसाहत क्षेत्रात होत असलेले अतिक्रमण थांबविण्यासाठी व याक्षेत्राचे रक्षण करण्यासाठी त्याठिकाणी कुठल्याही प्रकारची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे दिवसेंदिवस अतिक्रमण वाढतच आहे. हे अतिक्रमण रोखण्यासाठी या संपूर्ण क्षेत्राच्या सरहद्दीवर संरक्षण भिंत बांधण्याकरिता शासनाने रु.२०/- कोटी मंजूर देखील केले आहेत. ही संरक्षण भिंत ८ कि.मी. इतक्या लांबिची असून त्यापैकी २ कि.मी. लांबीच्या कामास अडथळे निर्माण झाले असल्याचे निदर्शनास आले सीटी सर्वेप्रमाणे हद्द निश्चित करण्याकरिता तालूका भुमी अभिलेख (TLR) यांच्याकडे रु.३ कोटी, ३८ लाख ९० हजार इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे, असे असून देखील सदरहू मोजणीचे काम आजमितीस पूर्णत्वास गेलेले नाही. जोपर्यंत सीमा रेषा निश्चित होत नाही. तोपर्यंत संरक्षण भितींचे काम पूर्ण करणे शक्य नाही. त्यामुळे अतिक्रमणास देखील प्रतिबंध करणे अशक्य आहे. **ही परिस्थिती पाहता तालूका भूमी अभिलेख**

यांच्याकडून तीन महिन्याच्या आत मोजणी करुन सीमा रेषा निश्चित करण्याच्या दृष्टीने दुग्धविकास विभागाने पाठपूरावा करुन सदरहू काम पूर्णत्वास न्यावे तसेच संरक्षण भिंत बांधण्याकरिता रु.२० कोटी मंजूर असल्यामुळे संपूर्ण क्षेत्रास संरक्षित भिंत बांधण्याचे काम चालू वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी गुणवत्तापुर्वक पुर्ण करण्यात यावे व त्याबाबतचा खर्चपूर्तीचा अहवाल विनाविलंब समितीस अवगत करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(४) आरे कॉलनीतील होणाऱ्या अतिक्रमणावर प्रतिबंध घालण्यासाठी पुरेशे संरक्षण मिळावे अशी विभागाने मागणी केली त्यानुसार खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाबाबत वित्त विभागाने काही त्रुटी काढल्या आहेत.

सदर त्रुटीची विभागाने तातडीने पुर्तता करून वित्त विभागास पुन्हा: प्रस्ताव सादर करावा व वित्त विभागाने आरे कॉलनीतील शासकीय जमीनीचे संरक्षण करण्याकरिता सदर प्रस्तावावर तातडीने निर्णय घेवून खाजगी सुरक्षा रक्षक तातडीने नेमण्याबाबत पदूम विभागास सहकार्य करावे व पदूम विभागाने यासंदर्भात आवश्यक कार्यवाही तातडीने करावी व याप्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही समितीस ३ महिण्याच्या आत अवगत करावी अशीही समितीची शिफारस आहे.

(५) आरे वसाहतीच्या जमीनीवर एकूण २७ आदिवासी पाडे आहेत. त्यामधील अधिकृत कोण व अनधिकृत कोण आहेत. याचे सर्वेक्षण करून अनधिकृत लोकांना तेथून तातडीने हटवावे व अधिकृत जे २७ आदिवासी पाडे आहेत ते पाडे विखुरलेले आहेत. आरे कॉलनीमध्ये हिंस्त्र पशुंचा वावर आहे. अनेकवेळा वाघांच्या शिकारीला आदिवासी लोक बळी पडतात त्यामुळे आरे कॉलनीत विखुरलेले सर्व आदिवासींच्या पाड्यांचे एकाच ठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत विभागाने विचार करावा मात्र असे करीत असतांना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर त्यांचा काय परिणाम होईल. या सर्व बाबींचा विभागाने प्रथम विचार करावा. आरे दुग्ध वसाहतीमधील पात्र असलेल्या झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन एसआरएच्या माध्यमातून करण्याचे ठरविले होते व त्यानुसार **मे.बाम कोटेक प्रा.लि.कंपनीला** एसआरए प्रकल्प देण्यात आला होता व त्यासाठी कंपनीने १० कोटीचा भरणा सुध्दा केला मात्र तत्कालीन सचिवांनी त्यास स्थगिती दिली. आता मुख्य सचिवांनी खाजगी विकासकाऐवजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) पुनर्वसन करण्यात येईल असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावात समितीने केलेल्या सुचनांचा समावेश करुन सर्वसमावेशक धोरण आखण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. मात्र विभागीय सचिवांनी माहिती देतांना

सांगितले की, आदिवासी पाड्यांसाठी झोपडपट्टी पुनर्वसनाची (एसआरएची) कोणतीही योजना नाही. **आरे कॉलनीतील अतिक्रमणे, विमानतळ येथील अतिक्रमणे, रेल्वे लाईन वरील अतिक्रमणे याचा विचार करून पर्यायी घरे कोठे बांधता येतील या संदर्भात एकत्रित प्रस्ताव तयार करण्याचे नगरविकास विभागांच्या सचिव (१) यांच्या समवेतच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. त्यानुषंगाने आरे कॉलनीतील आदिवासी पाड्यांसहीत पात्र झोपडपट्टी धारकांसाठी एसआरएच्या माध्यमातून प्रकल्प राबवावा यासंदर्भातील शासनाने निश्चित धोरण आखावे व त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करून समितीस अवगत करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(६) आरे कॉलनीमध्ये एकूण १७ गोदामे आहेत सदर गोदामे निविदा काढून भाड्याने देण्यात येतात सदर गोदामाचा त्यावेळचा दर रु.१५/- प्रती चौ.फूट होता. "प्रत्यक्षात गोदामांचा वस्तु, धान्य इ.चा साठा करण्यासाठी वापर करणे आवश्यक आहे. मात्र निविदा काढतांना निविदेच्या अटी व शर्ती मध्ये गोदामाचा वापर अवैध व्यवसाय सोडून इतर कोणत्याही कारणासाठी करण्यात येईल" असे म्हटले आहे. त्यामुळे आरे कॉलनीतील गोदामे रु.१५ चौ.फुट इतक्या नाममात्र किंमतीत भाड्याने घेवून त्या गोदामात अंतर्गत सजावट करून ते चित्रिकरणासाठी वापरण्यात येत आहेत. गोदामाचा वापर चित्रिकरणासाठी करण्यात येतो त्या स्टुडीओचे ८ तासाला १ लाख रुपये भाडे घेण्यात येते. अशा प्रकारे वर्षाला कोट्यावधी रुपयांची कमाई या माध्यमातून होत आहे. असे असतांनाही ही बाब शासकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास का आली नाही याचे आश्चर्य वाटते.

बालाजी टेली फिल्मस लि. यांना ४ गोदामे ३ वर्षाच्या करारावर भाड्याने देण्यात आली आहेत. मुदत संपल्यानंतर गोदामे खाली करण्यास त्यांना सांगितले असता सदर गोदामे खाली न करता त्यांनी नगर व दिवाणी न्यायालयात मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज केला मा.न्यायालयाने त्यांचेकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करावी असा निर्णय दिला. त्यानंतर त्यांनी दंडाची व भाड्याची रक्कम रु.१.७० कोटी शासनाकडे जमा केली परंतू मुदवाढ मिळण्याबाबत प्रकरण उच्च न्यायालयात दाखल केले मा.उच्च न्यायालयाने निर्णय देतांना सांगितले की, या प्रकरणी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी शासनाने त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी. मा.मंत्री (पदूम) यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी बालाजी टेलीफिल्मस् ने सांगितले की, गोदामे घेतेवेळी नादुरुस्त होती. आता तेथे २ ते ३ कोटी खर्च करून सेट निर्माण केले आहेत. जो खर्च केला त्यातून उत्पन्न मिळत आहे. भाडे भरण्यात येत आहे. शासनाला गोदामाची गरज लागेल तर १ महिन्याची नोटीस द्यावी गोदामे खाली करण्यात येतील मात्र दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ पर्यंत मुदतवाढ द्यावी. मा.मंत्री महोदयांनी निर्णय घेतांना आदेश दिले की, बालाजी टेली फिल्मच्या विनंतीनुसार चार गोदामे एक वर्षापर्यंत त्यांच्या ताब्यात ठेवावीत. आरे

कॉलनीत रिकामे असलेल्या १० गोदामांच्या निवीदा ५ वर्षाच्या कालावधीसाठी काढण्यात याव्यात व त्याकरिता जो जास्तीचा दर प्राप्त होईल तो दर बालाजी टेली फिल्मसला लागू करावा गोदामाच्या निविदा काढल्यानंतर त्यामध्ये ७० ते ७५ रुपये भाडे आलेले आहे आणि तोच दर बालाजी टेलीफिल्मस्ला लावण्यात आलेला आहे.

मुळातच आरे कॉलनीची गोदामे अवैध व्यवसाय सोडून इतर कोणताही करण्यासाठी वापरता येईल असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांनी चित्रिकरण केले तरी त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही. मात्र गोदामाचा वापर चित्रिकरणासाठी करून बालाजी टेलीफिल्मस् कडून कोट्यावधीचा नफा मिळवला जात आहे. **शासनाला मात्र केवळ ७० ते ७५ रुपये चौ.फुट इतकीच रक्कम मिळणार आहे. त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शासनाच्या जमीनीवर दुसरे कोणी येवून नफा कमवत असेल तर ते योग्य नाही. यास्तव आरे कॉलनीतील गोदामाचा वापर कोणत्या कामासाठी करण्यात येणार आहे, हे आधीच निश्चित करून घेण्यात यावे तसेच गोदामामध्ये काही फेरबदल करण्यात येत असतील तर शासनाची परवानगी घेवूनच तसे करण्याबाबतचे बंधन घालण्यात यावे. गोदामाचा वापर चित्रिकरण वा अन्य कोणत्याही कारणासाठी करण्यात येत असेल तर त्या कामासाठी व्यावसायिक दर (Commercial Rate) आकारण्यात यावेत तसेच गोदामे चित्रिकरणासाठी वापरण्याकरिता दिल्यास त्याकरिता त्या-त्या वेळच्या बाजारभावाप्रमाणेच त्यांना गोदामे भाड्याने देण्यात यावीत व त्याप्रमाणे करारामध्ये तसे नमूद करण्यात यावे. तसेच करार संपल्यानंतर सदरहू गोदामे तात्काळ विभागाच्या ताब्यात घेण्याबाबत दक्षता घ्यावी. मात्र यापुर्वी विभागामार्फत पुर्वीचे करार संपल्यानंतर देखील निविदा न काढता पुन्हा त्याच संस्थांना जुन्या दराने तीच गोदामे सुमारे पाच ते सहा वेळा मुदतवाढीने देण्यात आलेली आहेत. परिणामी, शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडालेला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी यापुढे गोदामे ज्या मुदतीकरीता भाड्याने देण्यात आलेली आहे ती मुदत संपण्यापूर्वी किमान ६ महिने पुन्हा नव्याने निविदा प्रसिध्द करुन संपूर्ण प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(७) आरे कॉलनीत असलेल्या १५ गाळ्यांना अत्यंत नाममात्र भाडे आकारण्यात येत आहे. गाळेधारक २० ते २५ वर्षापासून गाळे चालवित आहेत. त्यांना अत्यल्प दराने सदरहू गाळे भाडे तत्त्वावर देण्यात आलेले आहेत. **मुंबई शहर व उपगरातील सध्याचे भाड्याचे प्रचलित दर विचारात घेता, हे भाव अत्यंल्प असून या भाडे दराबाबत पुर्नविचार करुन बाजारभावाप्रमाणे नवीन भाड्याचे दर सदरहू गाळे धारकांना आकारण्यात यावेत, अशी समितीच शिफारस आहे.**

(८) आरे कॉलनीतील टोल नाक्यावर १९८५ पासून टोल वसूली केली जाते मात्र रस्त्याची दुरुस्ती केलेली नाही. सदर रस्ता अत्यंत नादुरूस्त झालेला आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्ती व टोल

वसूलीबाबत वारंवार टोलबंद आंदोलन झाले आहे. **आता शासनातर्फे सदर रस्ता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (BOT) या तत्त्वावर बांधण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीस अवगत केले आहे. सदरहू निविदा प्रक्रिया पुर्ण करुन त्यान्वये कंत्राटदार निश्तिच करण्यात यावा व सदरहू रस्त्याची दुरुस्ती व देखभालीचे काम देखील त्याच कंत्राटदाराने करण्याबाबत कराराच्या अटी व शर्तीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा व केलेली कार्यवाही समितीस यथाशीघ्र अवगत करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(९) आरे कॉलनीमध्ये 'रॉयल पाम' या संस्थेने जाहीरातीचे अनेक अनधिकृत फलक जागोजागी लावलेले आहेत. ही बाब समितीच्या साक्षीच्या वेळी समिती सदस्यांनी उपस्थित केली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यास दुजोरा दिला नाही. **मात्र स्थानिक लोकप्रतिनिधीं तथा समिती सदस्य यांनी असे अनेक फलक असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. त्यावेळी असे अनधिकृत जाहीरातीचे फलक असतील तर ते पंधरा दिवसात काढण्यात येतील असे सचिवांनी आश्वासित केले. त्यानुसार विभागाने दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये जाहिरासाठी लावण्यात आलेले सर्व फलक काढण्यात आलेले असून सद्य:स्थितीत त्या ठिकाणी जाहिरातीचा एकही फलक नसल्याचे लेखी कळविले आहे. ही बाब लक्षात घेता समिती समोर साक्षीच्या वेळी संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समितीस असत्य माहिती दिल्याचे स्पष्ट होते. ही बाब अतिशय गंभीर आहे. यास्तव समितीस असत्य माहिती देणाऱ्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई करुन त्याचा अहवाल समितीस उपलब्ध करुन द्यावा. तसेच भविष्यात असे अनधिकृत फलक लावले जाऊ नयेत याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क रहावे, अशी समिती शिफारस आहे.**

(१०) आरे दुग्ध वसाहतीसाठी मंजूर असलेली अनेक पदे रिक्त आहेत. त्याचा परिणाम कामकाजावर व अनधिकृत बांधकाम होण्यास कारणीभूत ठरत आहेत. आरेच्या आस्थापनेवर मंजूर असलेली 'गट-अ' ची दोन्ही पदे रिक्त आहेत 'गट-ब' च्या ७ पदांपैकी ४ रिक्त आहेत 'गट-क' च्या ९८ पदांपैकी ६३ पदे रिक्त आहेत व 'गट-ड' च्या ११९ पदांपैकी ४८ पदे रिक्त आहेत. यामध्ये विशेषत: आरे दुग्ध वसाहतीसाठी असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद दिर्घ कालावधीपासून रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार कनिष्ठ अधिकाऱ्याकडे देऊन तात्पुरती व्यवस्था केलेली आहे. परिणामी सक्षम अधिकाऱ्याच्या अभावी अनेक गैरप्रकार सुरु असून शासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडत आहे. **त्याचबरोबर ३१६२ एकर इतक्या मोठ्या परिक्षेत्रावर एक मुख्य कार्यकारी अधिकारी सुयोग्य असे पर्यवेक्षीय नियंत्रण ठेऊ शकत नाही, असे समितीस प्रकर्षाने जाणवले आहे. तरी एवढ्या**

मोठ्या परिक्षेत्राच्या संरक्षणासाठी व नियंत्रणासाठी त्या ठिकाणी दोन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच विविध संवर्गातील रिक्त असलेली सर्व पदे आवश्यकतेनुरुप तातडीने भरण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.

(११) आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी समितीला माहिती देतांना सांगितले की, २७ आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी सन २००९ मध्ये योजना मंजूर केली त्यामध्ये २१ कि.मी.ची पाईपलाईन आणि १४ सेक्शन टँक बांधावयाचे आहेत. २१.८६ कि.मी. पैकी १९.१९ कि.मी. इतके काम पूर्ण झाले आहे. उर्वरित २.६६ कि.मी. चे काम पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेला चित्रनगरी व फोर्स वनचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. अद्याप ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याने काम प्रलंबित आहेत.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात फोर्सवनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आदिवासी विकास संस्था (TRDI) यांच्याकडून सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास त्यांची काही हरकत नाही. मात्र याच संदर्भात आदिवासी विकास विभागाच्या विभागीय सचिवांनी २७ आदिवासी पाड्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी आदिवासी विकास संस्थेने रु.१० लक्ष इतक्या रक्कमेची मागणी केली त्याबाबत प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे असे सांगितले, तसेच निधी मंजूर होताच पुढील कार्यवाही केली जाईल असेही सांगितले. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करून तातडीने निधी मंजूर करून घ्यावा व त्यानुसार आदिवासी विकास संस्थेकडून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करून घ्यावे या कामी आवश्यक असलेली माहिती **मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावी. तसेच 'फोर्स वन' व 'चित्रनगरी' यांनी विनाविलंब ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे व या प्रकरणी केलेली कार्यवाही समितीस अवगत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(१२) सदर आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्याची योजना मुंबई महानगरपालिकेने सन २००९ मध्ये मंजूर केली. सदर योजना मंजूर करत असतांना महानगरपालिकेने चित्रनगरीची व फोर्स वन चे ना-हरकत प्रमाणपत्र मिळेल असे गृहीत धरले तसेच या योजनेवर फक्त भांडवली खर्च करायचा व योजनेच्या दुरुस्ती देखभालीचा खर्च श्रमीक मुक्ती संघटना करणार असल्याचे त्यांनी सांगीतले. यावर विश्वास ठेवून योजना मंजूर केली. कालांतराने सदर संघटनेने ते हा खर्च करू शकणार नाहीत, असे महानगरपालिकेला कळविले. मुळातच कोणतीही योजना मंजूर करतांना लागणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तसेच योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च कोण करणार हे सर्व निश्चित झाल्यानंतरच

योजना मंजूर करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने ना-हरकत प्रमाण पत्र मिळतील तसेच श्रमीक मुक्ती संघटना देखभाल दुरुस्ती खर्च करेल हे गृहीत धरुन योजना मंजूर करणे निश्चितच योग्य नाही. आदिवासी बांधवांना पाणी मिळणे आवश्यकच आहे. यास कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. मात्र कोणतीही योजना मंजूर करतांना कोणत्याही गोष्टी गृहीत धरणे निश्चितच योग्य नाही.

सदर प्रकरणी श्रमीक मुक्ती संघटनेने देखभाल दुरुस्तीच्या खर्चामधून अंग काढून घेतल्याने समितीने आदिवासी विकास विभागास सदर खर्च करण्याबाबत सूचना केली असता आदिवासी विकास विभागाचे विभागीय सचिवांनी समितीची सूचना मान्य केली व रु.४० लाखाची तरतूद करून पहिला हप्ता रु.१५ लाख वितरित केला याबाबत समिती समाधान व्यक्त करत आहे**. मात्र सदर योजनेच्या देखभाल व दुरुस्ती करिता वार्षिक तरतूद करून सदर योजना तातडीने सुरु करण्याबाबत व आदिवासी बांधवांना पिण्याचे पाणी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याबाबत आदिवासी विकास विभाग, पदूम विभाग, फोर्स वन, मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी यांनी परस्पर समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करावी व करण्यात आलेली कार्यवाही समितीस ३ महिन्याच्या आत अवगत करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(१३) आदिवासींना मुळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून अर्थसंकल्पाच्या ९% निधी खर्च करण्यात येतो. मुंबई मध्ये अतिक्रमण करून रहाणाऱ्या लोकांना विज, पाणी, रस्ते, सर्व सोई सुविधा पुरविण्यात येतात मात्र मुंबई मधील आरे वसाहतीमधील आदिवासींना मात्र अद्यापही विज, पाणी, रस्ते इ.मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेले नाहीत. आदिवासी पाड्यांना विजच पुरविली नसल्याने पाण्याचे पंप चालू शकत नाहीत त्यामुळे त्यांना पाणीही मिळत नाही. **विज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने रिलायन्स कंपनीने तेथील आवश्यकतेप्रमाणे पाच उप केंद्र (Sub-Center) उभारण्याकरिता जागेची मागणी केली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यानंतर शासनाने जागा उपलब्ध करून दिली. मात्र सदर जागेच्या पाच ठिकाणच्या भाडेपट्ट्या पोटी वार्षिक रु.४ लाख ४ हजार ९१८/- इतकी रक्कम शासनाच्या निकषाप्रमाणे आकारावी लागेल. इतक्या रकमेचा रिलायन्स कंपनीने शासनाकडे भरणा केल्यास ती रक्कम साहजिकच ते आदिवासी बांधवाकडून वसूल करतील. परिणामी आदिवासी बांधवांना अत्यंत महागड्या दराने वीज खरेदी करावी लागेल व ते त्यांच्या आर्थिक कुवतीच्या बाहेर आहे. म्हणून ही बाब विचारात घेऊनच रिलायन्स कंपनीने सदरहू उप केंद्रांसाठी रु.१/- इतके नाममात्र भाडे आकारुन सदरहू जमिनीची मागणी शासनाकडे केलेली आहे. प्रस्तुतची मागणी शासनासमोर ठेऊन मानवतेच्या दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात येईल असे अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समिती समोर आश्वासन दिलेले आहे. त्याप्रमाणे आदिवासी बांधवांना वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने याप्रमाणे सहानुभूतीपुर्वक निर्णय घेण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

****

परिशिष्ट-अ

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून प्राप्त झालेली माहिती

१) शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे ज्ञापन क्र. एएमसी २०१०/प्र.क्र.३१५/पदुम-१० दि.१९/१०/२०११.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांचे पत्र क्र. आदुव/मुकाअ/शा१ (१) विद्युत/आदिवासी पाडा/ ३०६९ दि. १९/११/२०११.

आदेश :

आयुक्त दुग्धव्यवसाय यांनी पत्र क्र. आदुवि १६/१/आरे/जमीन/विसस्टे/४/९८/३९६५ दि.६.९.२०११. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांनी पत्र क्र. आदुव/मुकाअ/शा१ (१)/विद्युत/आदिवासी पाडा/३०६९/ दि. १९/११/२०११. अन्वये मौजे आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाड्यांना / अधिकृत झोपडपट्टीधारकांना स्वतंत्रमीटरद्वारे विद्युत पुरवठा करण्यासाठी मे. रिलायन्स एनर्जी यांना ८x५ मीटर चे ५ भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्याबाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांना सूचित केले होते. त्यानुसार उदेशिकेतील अ.क्र.१ चे शासन ज्ञापनन्वये कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी मंजुर केलेले ८x५ मीटर चे ५ भूखंड मे. रिलायन्स एनर्जी यांना ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्यासाठी, त्या जमीनीचे भाडे तसेच हस्तांतरीत करण्याबाबतच्या अटी व शर्ती ठरवण्याबाबत महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास मान्यता दिली आहे. तसेच प्रस्तुत जमीनीचे भाडे तसेच हस्तांतरीत करण्याबाबतच्या अटी व शर्ती निश्चित करून जागा मे. रिलायन्स एनर्जी यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही अतिशीध्र करण्याची विनंती केली आहे.

प्रकरणी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे ज्ञापन क्र. एएमसी २०१० /प्र.क्र.३१५/पदुम-१० दि.१९/१०/२०११ चे ज्ञापन नुसार आरे दुग्धवसाहतीमधील खालील कोष्टकात नमुद केलेले ५ भूखंडाचे क्षेत्र शासन महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करणेस मान्यता दिली आहे.

अ.क्र.	युनिट क्रमांक	ठिकाणाचे नांव	सर्वे नं.
	६	नवापाडा	मौजे :- आरे स.नं. १/अ
	५	वनीचा पाडा	मौजे :- आरे स.नं. १/अ
	२५	खंबाचा पाडा / देवीचा पाडा / गावदेवी पाडा / मटई पाडा	मौजे :- मरोशी स.नं. १६९
	१९	नवापाडा	मौजे :- परजापूर स.नं. १६
	१७		मौजे :- गोरेगांव सर्वे १४/ब पैकी

प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे सदर भूखंड मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांचेकडून महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित होणे व त्यानंतर महसूल व वन विभाग मार्फत विहित अटी व शर्तीवर मे. रिलायन्स

एनर्जी या कंपनीस भाड्याने देण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्या नुसार शासन महसूल व वन विभाग यांचेकडे प्रत्यार्पित होणाऱ्या भूखंडाचे क्षेत्रास अभिलेख सदरी शासन महसूल व वन विभाग यांचे नांव दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

आरे दुग्ध वसाहतीमधील उक्त कोष्टकात नमुद भूखंड मे. रिलायन्स एनर्जी यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही शिग्रगतीने व्हावी. या दृष्टीकोणातून आरे दुग्ध वसाहती मधील आदिवासी पाड्यांना/अधिकृत झोपडीधारकांना स्वतंत्र्य मीटरद्वारे विद्युत पुरवठा करण्यासाठी मे. रिलायन्स एनर्जी यांना वर नमुद केलेले ८X५ मीटर चे ५ भूखंड ३० वर्षाच्या भाडेत्त्वावर ताबा देणेबाबत मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे.

<u>अटी व शर्ती :-</u>

वरिल ५ भूखंडाचे जमीनीबाबत तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम खालील प्रमाणे येत आहे.

भु.क्र	**मौजे/सर्वे नं.**	**क्षेत्र**	**युनिट क्र.**	**तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम**
	आरे, स.नं.१/अ	४० चौ.मी.	६	रु. ६२, २४८/-
	आरे, स.नं.१/अ	४० चौ.मी.	५	रु. ६२, २४८/-
	मरोशी, स.नं. १६९	४० चौ.मी.	२५	रु. १, ०३, २८६/-
	परजापूर, स.नं. १६	४० चौ.मी.	१९	रू. ९८, ३५२/-
	गोरेगांव, स.नं. १४ ब पैकी	४० चौ.मी.	१७	रू. ७८, ७८४/-
एकूण तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम :- रु. ४, ०४, ९१८/-				

उक्त तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रू. ४, ०४, ९१८/- पै ऑर्डर द्वारे **Collector, Mumbai Suburban Distict** यांचे नांवे काढून १५ दिवसात या कार्यालयात जमा करावी. सदर रक्कम शासन जमा केल्यानंतर जागेचा ताबा देण्यात येईल.

शासनाचे अंतिम आदेशास अधिन राहून त्यानुसार अंतिम भाडेपट्ट्याची रक्कम जागेचा ताबा दिल्यापासून वसूल करण्यात येईल व त्यामधुन या आदेशान्वये भरलेली भाडेपट्टा रक्कम वजा करण्यात येईल.

आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाड्यांना/ अधिकृत झोपडीधारकांना त्यांची विजेची निकड लक्षात घेता त्यांचेकरीताच विद्युत पुरवठा करण्यासाठी वरिल जागेचा वापर फक्त सब स्टेशन करता करावा.

सब स्टेशनउभारण्याबाबत शासन भविष्यात ठरविल त्या अटी व शर्ती मे. रिलायन्स एनर्जी यांना मान्य राहतील.

विद्युत सब स्टेशन उभारण्याचे क्षेत्राबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी आरे, नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले / मालाड / गोरेगाव व तहसिलदार अंधेरी / बोरीवली यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधुन क्षेत्र व जागा निश्चित करून घ्यावे, तसेच सदर ५ भूखंडाचा ताबा त्यांच्या मार्फत घ्यावा.

कंपनीस किंवा तीचे व्यवस्थापक व अभिहस्तांकित यांना मंजूर भाडेपट्ट्याची जमीन किंवा तिच्यावरील कोणताही भाग किंवा हितसंबंध हस्तांतरीत करता येणार नाही.

कंपनीस मंजुर जमीन विक्रि, हस्तांतरण, पोट भाडेपट्ट्याने, गहाण/तारण ठेवता येणार नाही.

सदर जागेची आवश्यकता शासनांस भासल्यास, ती मुदतपुर्व काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी/शासन यांना राहील.वरील कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग झाल्यास नुकसान भरपाई न देता जमीन शासन जमा करणेत येईल.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र कंपनीने रू. २००/- चे मुद्रांकित पेपरवर १५ दिवसात सादर करावे.

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

दिनांक १५ सप्टेंबर, २०११
स्थळ -: आरे दुग्धवसाहत गोरेगाव मुंबई
उ प स्थि ती

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. अशोक जाधव, वि.स.स.
३) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.
४) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)
२) श्री. वि. शं. कोमटवार, कक्ष अधिकारी

विभागीय अधिकारी

१) श्री. आर. डी. शिंदे, आयुक्त (दुग्ध), दुग्धविकास
२) श्री. पां. द. करवंदे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग
३) श्री. श्याम तागडे, व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब चित्रनगरी
४) डॉ. सुहास वारके, भा.पो.से. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १०
५) श्री. राजेंद्र दाभाडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२
६) श्री. पी. एस. वाडकर, सहायक पोलीस आयुक्त, अंधेरी
७) श्री. एल.एन.एस.राव, पोलीस सह आयुक्त कार्यालय,
८) श्री. रागी. सहपोलीस आयुक्त, मेघवाडी,
९) श्री. ढवळे, सहायक पोलीस महानिरीक्षक, डीजी कार्यालय
१०) श्री. सदानंद दाते, विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन
११) श्री. एस.एम.शिंदे, नायब तहसिलदार (बोरिवली), महसूल
१२) श्री. एस.एस.सरवदे, उप विभागीय अधिकारी, महसूल
१३) डॉ. प. श्री. केसकर, उप कार्यकारी आरोग्य अधिकारी, मुंबई महानगरपालिका
१४) श्री. अशोक खरे, उप आयुक्त, परिमंडळ-४, मुंबई महानगरपालिका
१५) श्री. रणजीत ढाकणे, सहायक आयुक्त, पी दक्षिण, मुंबई महानगरपालिका
१६) श्री. म.ता.कांबळे, सह सचिव, कृषी व पदुम
१७) श्री. न.म.शिंदे, उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय
१८) श्री. वि.वि.कुलकर्णी, अधीक्षक अभियंता, वि.प्र.मंडळ, वरळी
१९) श्री. पी.के.रजपुत, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे गोरेगाव
२०) श्री. एच.एस.साने, उप अभियंता, म्हाडा
२१) श्री. बी.बी.लोहार, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.प्र.वि.आरे
२२) श्री. मि.ह.कांबळे, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.प्र.वि.वरळी,
२३) श्री. एम. एन. शिरसाठ, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास
२४) श्री. एम.डी. राठोड, उप मुख्य सुरक्षा अधिकारी, दिंडोशी विभाग
२५) श्री. लक्ष्मण टोपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे परिमंडळ १२

समितीने दिनांक १५ सप्टेंबर, २०११ रोजी आरे दुग्धवसाहत गोरेगाव मुंबई व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना दिलेल्या भेटीच्या व त्यावेळी आढळून आलेल्या बाबीच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या. (चर्चा अपूर्ण)

दुसरी बैठक
दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२
स्थळ -: आरे दुग्धवसाहत गोरेगाव मुंबई

उ प स्थि ती :
समिती प्रमुख

१) श्री.दिलीप मोहिते, वि.स.स.

सदस्य

२) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.

३) श्री.सुभाष झनक, वि.स.स.

४) श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स

५) श्री.रवींद्र वायकर,वि.स.स.

६) श्री.मोहन जोशी, वि.प.स.

७) श्रीमती निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री.अशोक मोहिते, उप सचिव,

२) श्री. भा.शं.गायकवाड, अवर सचिव (समिती)

विभागीय प्रतिनिधी

१)श्री.अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, कृषी व पदूम विभाग

२)श्री.आर.डी.शिंदे, आयुक्त, दुग्ध विकास विभाग

३)श्री.दि.का. खरात, उप सचिव, उर्जा विभाग

मुंबई महानगरपालिका

१) श्रीमती मनिषा म्हैसकर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,

२) श्री.शी.ओ.कोरी, उपजल अभियंता

आदिवासी विकास विभाग

१) श्री.उमेशचंद्र सागर, प्रधान सचिव,

२) श्री.मुकुंद शिरसाट, प्रकल्प अधिकारी

३) श्री.बी.डी.सानप, अपर आयुक्त

समितीने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी आरे दुग्धवसाहत गोरेगाव मुंबई व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना दिलेल्या भेटीच्या व त्यावेळी आढळून आलेल्या बाबीच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या. (चर्चा अपूर्ण)

तिसरी बैठक
दिनांक ४ सप्टेंबर २०१२
स्थळ -: विधान भवन, मुंबई

उ प स्थि ती :

समिती प्रमुख

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

सदस्य

२) श्री. वल्लभ बेनके, वि.स.स.
३) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
४) प्रा. विरेंद्र जगतात, वि.स.स.
५) श्री. अशोक जाधव, वि.स.स.
६) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
७) श्री. विलास लांडे, वि.स.स.
८) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.
९) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
१०) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.
११) श्री. सुभाष देसाई, वि.स.स.
१२) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स.
१३) श्री. विवेक पाटील, वि.स.स.
१४) श्री. दीपक साळुंखे, वि.प.स.
१५) श्री. अनिल भोसले, वि.प.स.
१६) डॉ. नीलम गाऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. अशोक मोहिते, उप सचिव
२) श्री. शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

विभागीय प्रतिनिधी

१) श्री. स्वाधीन क्षत्रिय, अप्पर मुख्य सचिव, महसूल
२) श्री. रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
३) श्री. संजय देशमुख, जिल्हाधिकारी, मुंबई, उपनगरे

पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभाग

१) श्री. अनिल डिग्गीकर, सचिव, पदुम
२) श्री. जयंत गायकवाड, आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास
३) श्री. अे. आर. जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत
४) श्री. श.मा.साठे, उप सचिव, पदुम
५) श्री. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक, फोर्स वन, आरे वसाहत मुंबई
६) श्री. राठोड विनयकुमार, पोलीस अधीक्षक, फोर्स वन, आरे वसाहत मुंबई
७) श्री. र. शं. शिंदे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

नगर विकास विभाग

१) श्रीमती सीमा ढमढेरे, सह सचिव, नगर विकास विभाग
२) श्री. सिताराम कुंटे, आयुक्त, मुंबई महानगरपालिका
३) श्रीमती मनिषा म्हैसकर, अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका

आदिवासी विकास विभाग

श्री. रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव, आदिवासी विकास,

समितीने दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी आरे दुग्धवसाहत गोरेगाव मुंबई व त्या परिसरातील आदिवासी पाड्यांना दिलेल्या भेटीच्या व त्यावेळी आढळून आलेल्या बाबीच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या. (चर्चा अपूर्ण)

चौथी बैठक
दिनांक : १० डिसेंबर, २०१२
स्थळ -: विधान भवन, नागपूर

उ प स्थि ती :

समिती प्रमुख

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

सदस्य

२) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
४) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
५) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.
६) श्री.विवेक पाटील, वि.स.स.
७) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.अशोक मोहिते, उप सचिव
२) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
३) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करून अहवाल संमत केला.

परिशिष्ट-ब

परिशिष्ट-क

परिशिष्ट-इ

परिशिष्ट-फ